



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार १२ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# अमरावतीत 200 कोटींच्या जमिनीचा 'महसुली' घोटाळा

## बडनेरा रोडवरील कोट्यवधींची जमीन 49 लाखात हडपली

**प्रदीप देशपांडे**

**अमरावती :** राज्याचे प्रभावशाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हेच जिल्ह्याचे पालकमंत्री असताना अमरावती महसूल अधिकाऱ्यांनी सुमारे २०० कोटी रुपये मूल्याच्या १.७३ हेक्टर आर मौल्यवान जमिनीचा गौडबंगाल व्यवहार केला आहे. बडनेरा रोड वरील ही मौल्यवान जमीन नुकतीच दोन संशयास्पद व्यक्तींना अनुक्रमे ४९ लाख आणि ४ कोटी २७ लाख ८५ हजार रुपयांना विकण्यात आली आहे.

बडनेरा रोड येथील बनारसे इंडस्ट्रीज यांच्या भूमापन क्रमांक ५६/१ ब मौजे निंभोरा खुर्द १ हेक्टर ७३ आर जमिनीचा हा गैरव्यवहार असून त्यात महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांनी बोगस कागदपत्रे व खोट्या नोंदी घेऊन ही जमीन शेषराव गोयटे याला अवघ्या ६० ते ७० हजारात हडपण्याची संधी दिली.त्यानंतर शेषराव गोयटेने ही जमीन गेल्या २९/३१ मार्च २०२५ ला राजेंद्र महादेवराव कुरळकर, रा. अमरावती याला ४९ लाख रुपयात २० आर म्हणजे २००० चौ. मी. आणि उर्वरित ४३ आर म्हणजे ४३०० चौ. मी. जमीन ४ कोटी २७ लाख ८५ हजार रुपयात ए.आर.रियाल्टर्स या भागीदारी संस्थेला ०२.०४.२०२६ रोजी विकली आहे.त्याबदल्यात गोयटेला २० लाख ९२ हजार ८५८ रुपयांचा चेक ३०.०४.२६ या खरेदीच्या तारखेचा तर उर्वरित रक्कम पोस्ट डेटेड चेक द्वारे देण्यात आली होती.ते सर्व चेक बँकेतून वटले की नाही, याबद्दल माहिती मिळू शकली नाही.

ए.आर.रियाल्टर्स या भागीदारी संस्थेतर्फे खरेदीखतावर रामदास कोल्हाजी हेकडे, रा.चिखलदरा यांचे भागीदार म्हणून नाव आहे.

पांडुरंग सीताराम बनारसे यांनी १९६२-६३ मध्ये ही १.७३ हे आर जमीन औद्योगिक व निवासी वापराची म्हणून तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेतली होती.तिथे त्यांनी आपले निवास आणि प्लास्टिक कारखाना सुरू केला होता. पुढे ते इंग्लंडला गेले व तेथेच स्थायिक झाले.जाताना त्यांनी केअर टेकर म्हणून शेषराव गोयटे याला नेमले होते.१९८८ मध्ये पांडुरंग बनारसे यांचे निधन झाले. त्यांची ३ मुले व एक मुलगी इंग्लंडमध्येच स्थायिक असल्याने त्यांनीही शेषराव गोयटेलाच केअर टेकर म्हणून पुढे सुरू ठेवले. मात्र या गोयटेनेच विश्वासाचा गैरफायदा घेत व महसूल अधिकाऱ्यांना हाताशी धरून ही मौल्यवान जमीन हडपण्याचा आणि तिची अवैध विक्री करण्याचा हा गंभीर गैरप्रकार केला आहे. (गोयटेने केलेला गैरप्रकार,महसूल खात्याचे सहकार्य,बेनामी कुरळकर व हेकडे कोण, रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स आणि स्कॉर्पियन इन्फ्रा अर्थ यांचा संबंध याबाबत उद्याच्या अंकात.)



**महसुल मंत्र्यांच्या कारकिर्दीत व्यवहार**

# गांजा पिऊन वैमानिक उडवत होता विमान



## 300 फूट खाली आले होते एअर इंडियाचे फ्लाईट, 17 प्रवासी जखमी होण्याचे कारण समोर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एअर इंडियाचं विमान AI २३७९ च्या पायलट इन कमांडचा लॅब टेस्ट मारिजुआना रिपोर्ट हा पाझिटिव्ह आला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार हे तेच फुकेत-दिल्ली फ्लाईट आहे जे ४ ऑगस्टला जवळपास ३०० फूट खाली आलं होतं. या घटनेमध्ये १७ प्रवासी आणि क्रू मेंबर्स जखमी झाले होते.

**४ ऑगस्टला घडलेली घटना काय?**

एअर इंडियाचं फुकेत-दिल्ली विमान क्रमांक AI२३७९ हे विमान ३०० फूट खाली आलं होतं. ज्यानंतर १७ प्रवासी आणि क्रू मेंबर जखमी झाले होते. याच विमानाचा मुख्य वैमानिक गांजा पिउन विमान चालवत होता ही बाब आता समोर आली आहे. कारण या वैमानिकाची मारिजुआना टेस्ट पाझिटिव्ह आली आहे. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे. ही घटना घडल्यानंतर दोन्ही वैमानिकांची सायको ॲक्टिव्ह सब्सटेन्स स्क्रिनिंग करण्यात आलं होतं. प्राथमिक तपासात काहीही समोर आलं नाही. पण याबाबतचा विस्तृत अहवाल जेव्हा समोर आला तेव्हा मुख्य वैमानिकाची मारिजुआना टेस्ट पाझिटिव्ह आली आहे अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**३०० फूट खाली आलं होतं विमान**

१४५ प्रवाशांसह प्रवास करणारे हे एअरबस ए३२० विमान ओदिशाजवळ भीषण संकटात अडकले आणि अचानक ३०० फूट खाली आलं होतं. दिल्लीत उतरल्यानंतर १३ प्रवासी आणि ४ क्रू मेंबर्सना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने या घटनेची



चौकशी केली असून, वैमानिकांची तात्पुरती ड्युटी थांबवण्यात आली आहे. नियमांनुसार, पहिल्यांदा दोषी आढळल्यास वैमानिकाला व्यसनमुक्ती केंद्रात पाठवलं जातं. दुस-यांदा दोषी आढळल्यास परवाना ३ वर्षांसाठी निलंबित होतो, तर तिस-यांदा दोषी आढळल्यास परवाना कायमचा रद्द केला जातो.

**विमान अचानक खाली आल्याने अपघात-** विमान खाली आले. विमान अचानक खाली आल्याने विमानाच्या छताला प्रवासी धडकले. यात १० प्रवासी आणि ४ कर्मचारी जखमी झाले. सुदैवाने हे विमान सुरक्षितपणे उतरविण्यात आले. दिल्लीत विमान उतरण्यापूर्वी काही वेळेआधीच ते अचानक खाली येउ लागले आणि हवेत जोरात डगेमगू लागले. यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्रवाशांनी आरडाओरड केला. काही वेळासाठी विमानात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र वैमानिकाने मोठ्या कौशल्याने आणि धैर्याने विमान सुरक्षित उतरविले .

# TET पेपरफुटीप्रकरणात सोलापूर कनेक्शन उघड, पोलीस प्रशिक्षण संस्था चालक अटकेत

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात TET पेपरफुटी प्रकरणाचे महाराष्ट्र कनेक्शन समोर आले आहे. खासगी पोलीस प्रशिक्षण आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालवणाऱ्या प्रकाश पवार याला सोलापुरातून अटक करण्यात आली आहे. TET पेपरफुटीचे तपास करणा-या विशेष पथकाने सोलापुरातून प्रकाश पवार याला अटक केली आहे. भिवंडी पोलिसांनी ही कारवाई केली. याप्रकरणी आतापर्यंत १६ जणांना अटक करण्यात आली आहे. या घडामोडींमुळे सोलापूरमधील परीक्षार्थी उमेदवारांमध्ये खळबळ उडाली आहे. सोलापुरातील कुमठे गावात प्रकाश पवार हा ध्रुव प्रतिष्ठान नावाने खासगी पोलीस प्रशिक्षण केंद्र चालवत होता. जवळपास १५-२० वर्षांपासून तो विद्यार्थ्यांना पोलीस भरती आणि विविध स्पर्धा परीक्षासाठी मार्गदर्शन करणारी अकॅडमी चालवतो. पेपरफुटी प्रकरणात या आधी अटकेत असलेल्या आरोपीशी प्रकाश पवार हा संपर्कात होता तसेच काही विद्यार्थ्यांची कागदपत्रे देखील त्याने मुख्य आरोपीना दिल्याची प्राथमिक माहिती आहे प्रकाश पवार याचा या पेपर फुटी प्रकरणात नेमका संबंध काय




होता? विद्यार्थ्यांची कागदपत्रे त्याने आरोपीना का दिली याचा तपास सध्या पोलिसांमार्फत सुरू आहे.भिवंडी येथे टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली. त्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आली. प्रकरणाचा तपास भिवंडी पोलिसांचे विशेष पोलीस पथक करत आहे. याप्रकरणातील मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता याला अगोदरच अटक करण्यात आली होती. सुरुवातीला दिल्ली, आग्रा आणि बिहारमधून आरोपींना अटक करण्यात आली होती. तर प्रश्नपत्रिका फुटीचे राज्यातील धागेदोरे समोर आले होते. तपासादरम्यान प्रकाश पवार याचे नाव समोर आल्यानंतर कारवाई करण्यात आली. त्याच्या संस्थेतून महत्त्वाची कागदपत्रे आणि पुरावे शोधण्यात येत आहे. इतर व्यक्तींचा या परीक्षेशी काय संबंध होता याचा तपास करण्यात येत होता. भिवंडी पोलिसांनी टीईटी प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणात आतापर्यंत १६ जणांना अटक केली आहे. पोलिसांनी अगोदर उत्तर भारतात कारवाई केली. तपासाची व्याप्ती वाढल्यावर महाराष्ट्रातील काही जणांवर संशयाची सुई फिरली. पोलिसांनी कडी जुळवली. त्यात प्रकाश पवार याचे नाव समोर आले. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली. तेव्हा त्यांच्या हाती सज्जड पुरावे लागले आणि त्याला अटक करण्यात आली.

# भाजपच्या झारखंड बंदला संमिश्र प्रतिसाद:

## अनेक ठिकाणी बाजार बंद; ABVP कार्यकर्ते-पोलिसांत संघर्ष






**रांची/वृत्तसंस्था-** झारखंड विधानसभेला घेराव घालण्याच्या आंदोलनादरम्यान ABVP कार्यकर्ते आणि पोलीस यांच्यात संघर्ष झाला. हे कार्यकर्ते जुन्या विधानसभा इमारतीजवळ जमले होते आणि त्यांना ताब्यात घेण्यासाठी पोलीस तिथे पोहोचले. काही कार्यकर्ते रस्त्यावर झोपले, तर काहीजण पोलीस व्हॅनसमोर बसले. पोलिसांनी त्यांना हटवण्याचा प्रयत्न केला असता झटापट आणि संघर्ष झाला.दरम्यान, पावसाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी विरोधकांवर तरुणांची दिशाभूल केल्याचा आरोप केला. ते म्हणाले, 'विरोधक गोंधळ घालत राहतील, पण आम्ही आमचे काम सुरू च ठेवू. सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे.' दुसरीकडे, भाजपने मंगळवारी राज्यव्यापी बंदची हाक दिली आहे. रांचीमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी अनेक ठिकाणी रस्ते रोखले. काही जिल्ह्यांमध्ये कार्यकर्ते दुकाने बळजबरीने बंद करताना दिसले. पोलिसांनी अनेक शहरांमध्ये काही व्यक्तींना ताब्यात घेतले आहे.भाजपचा आरोप आहे की, विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करण्याऐवजी झारखंड सरकार आंदोलकांवर लाठीचार्ज करत आहे. सोमवारी विद्यार्थ्यांनी झारखंडमधील JPSC-JSSC भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेविरुद्ध आंदोलन केले होते.विधानसभेला घेराव घालण्याच्या आंदोलनात १०० हून अधिक विद्यार्थी जखमी झाले. अनेक विद्यार्थ्यांचे हात आणि पाय फ्रॅक्चर झाल्याचे वृत्त आहे. तसेच, रांची पोलीस दलातील सुमारे १४ पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत. सरकार आणि विद्यार्थी यांच्यात आतापर्यंत तीन फे-यांची चर्चा झाली आहे, तरीही कोणताही तोडगा निघालेला नाही. मात्र, सरकारने विद्यार्थ्यांच्या नउपैकी सहा मागण्या मान्य केल्या आहेत. आता केवळ मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशीच चर्चा करू, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

**कालच्या लाठीचार्जमध्ये १०० हून अधिक विद्यार्थी जखमी-** सोमवारी रांचीमध्ये आंदोलन करणा-या हजारो विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडून विधानसभेच्या प्रवेशद्वारापर्यंत धडक दिली. ते सरकारविरोधात घोषणाबाजी करत होते. पोलिसांनी परिसर रिकामा करण्याचा प्रयत्न करूनही विद्यार्थ्यांनी तिथून हटण्यास नकार दिला. त्यामुळे पोलिसांनी वाटर कॅननचा वापर करत लाठीचार्ज केला. ➪(पान २ वर)

## ठाकरेंच्या वकिलांचा जोरदार युक्तिवाद

# निवडणूक आयोगाचा कारनामा उघडा पाडला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जर का राजकीय पक्षात फूट पडली तर तो पक्ष कुणाचा आणि चिन्ह कुणाचे याचा अधिकार हा निवडणूक आयोगाकडे असतो. पण शिवसेनेच्या प्रकरणी विधिमंडळात पडलेली फूट ही राजकीय पक्षातील फूट समजली आणि त्या आधारे निवडणूक आयोगाने चुकीचा निर्णय घेतला, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर विधिमंडळ गटात फूट पडली होती, ती राजकीय पक्षात नव्हती, असंही कपिल सिब्बल यांनी म्हटलं. शिवसेनेच्या प्रकरणात निवडणूक आयोगाने कसा चुकीचा निर्णय घेतला आणि पक्ष शिंदेंच्या ताब्यात दिला, याचा घटनाक्रम सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर मांडला.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाचे यावरील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली असून लवकरच निकाल लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी या आधी दोन वेळा युक्तिवाद केला असून आता पुन्हा त्यांनी सर्वोच्च न्यायालयात ठाकरेंची बाजू जोरदारपणे मांडली. दरम्यान, बुधवारची सुनावणी संपली असून गुरुवारी (१२ ऑगस्ट) पुन्हा यावर सुनावणी होणार आहे.




शिवसेनेच्या १९९९ च्या घटनेमध्ये मुख्य नेता असे कोणतेही पद नाही, मग एकनाथ शिंदे यांनी कोणत्या आधारे हे पद स्वतःला बहाल केले? असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. या सगळ्या गोष्टी शिवसेनेतील फुटीनंतर, बंडानंतर झाल्या. त्यामुळे या लोकशाहीविरोधी गोष्टींना कोणताही अर्थ नाही, परंतु निवडणूक आयोगाने या गोष्टी ग्राह्य धरल्या, असं कपिल सिब्बल म्हणाले. आमदारांना अपात्र करण्याचा अधिकार हा दहाव्या अनुसूचीनुसार विधिमंडळ अध्यक्षांचा असतो. परंतु त्यावेळी शिंदेंचे आमदार अपात्र ठरवण्यात आले नाहीत. या उलट हा मुद्दा निवडणूक आयोगाकडे गेला, असं कपिल सिब्बल म्हणाले. त्यावेळी निवडणूक आयोगाच्या सुनावणीवर न्यायालयाने स्थगिती द्यावी अशी मागणी ठाकरे गटाकडून करण्यात आली होती. परंतु, न्यायालयाने आयोगाच्या सुनावणीवर स्थगिती दिली नाही. परंतु, या प्रकरणात निवडणूक आयोगाला कोणताही अधिकार नव्हता, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

**निवडणूक आयोगावर निशाणा-** पक्षातून फुटीचा मुद्दा सोडवण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाला नाही, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. १ जुलै रोजी अनिल देसाईंनी निवडणूक आयोगाकडे एक पत्र दिलं होतं. त्या आधारे निर्णय न देता निवडणूक आयोगाने चुकीचा निर्णय घेतला, असा वारंवार युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. शिवसेनेच जेव्हा फूट पडली त्यावेळी निवडणूक आयोगाने मूळ चिन्ह धनुष्यबाण हे शिंदेंना दिलं, आणि मशाल हे तात्पुरते चिन्ह ठाकरेंना दिलं. शिवसेनेच्या बाबत निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला तोच निर्णय हा राष्ट्रवादीच्या बाबतीत दिला, तो नियमांना धरून नाही, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.२०१८ च्या घटनेवर आता शिंदेंच्या गटाकडून घेण्यात आला. परंतु २०१८ साली त्यावर कोणताही आक्षेप घेण्यात आला नव्हता. त्याच घटनेच्या आधारे बाहेर पडलेले सगळेजण निवडूण आले होते. जर २०१८ ची घटना ही संविधान विरोधी असेल तर, ज्यांना ज्यांना त्याच्या आधारे पदे मिळाली, लाभ मिळाला, तेदेखील अवैध किंवा लोकशाही विरोधी ठरू शकतात, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

**न्यायालयातील सुनावणीत आज काय घडलं?** ➪(पान २ वर)




# मुंबई लोकलमध्ये जेन-झीसाठी 3 डबे आरक्षित होणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** दिल्लीच्या जंतर-मंतरवर जेन-झी आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्जचे देशभर पडसाद उमटले होते. विद्यार्थी आंदोलनामुळे मोदी सरकारलाही झुकावं लागलं होतं. देशभर



पसरलेल्या आंदोलनामुळे धर्मेंद्र प्रधान यांना केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. भारतात जेन-झी मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. आता या आंदोलकांनी नाराजी दूर करून आपल्या बाजूने वळवण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत देखील तरुणांशी संवाद साधता दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील रात्री इन्स्टाग्रामवरून विद्यार्थ्यांशी संवाद साधत आहेत. आता भाजप नेतेही जेन-झी पुढे सरसावले आहेत. भाजपच्या नगरसेविका तेजस्वी घोसळकर यांनी जेन-झी पिढीसाठी महत्त्वाची मागणी केली आहे. तेजस्वी घोसाळकर यांनी कलेजला जाणा-या जेन-झी आणि जेन-अल्फा पिढीसाठी लोकलमधील १२ पैकी ३ डबे आरक्षित करण्याची मागणी केली आहे. हे डबे पहाटे ५ ते ➪(पान २ वर)

# 15 ऑगस्टपासून कॉकरोचचा मोर्चा सरकारी शाळेकडे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** छत्रपती संभाजीनगर : गावागावातील सरकारी शाळांची दुरवस्था आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांकडे होणारे दुर्लक्ष याविरोधात काकरोच जनता पार्टीने (सीजेपी) देशव्यापी अभियान सुरू करण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी येत्या १५ ऑगस्टपासून या अभियानाला सुरुवात केली जाणार असल्याचे सांगितले.



ग्रामीण भागातील सरकारी शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिक, पालक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.अभिजीत दिपके यांनी व्हीडीओद्वारे या अभियानाची माहिती दिली. महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील त्यांच्या गावापासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात येणार असून गावातील सरकारी शाळांची सद्यस्थिती सुधारण्यासाठी ते स्वतः सरपंचांशी संपर्क साधणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर देशभरातील इतर गावांमध्येही या उपक्रमाचा विस्तार करण्याचे सीजेपीचे नियोजन आहे. १५ ऑगस्ट हा भारताचा ८० वा स्वातंर्त्यदिन आहे. स्वातंर्त्याच्या आठ दशकांनंतरही ग्रामीण भागातील सरकारी शाळांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असल्याचे दिपके यांनी सांगितले. देशात मोठ्या पायाभूत सुविधा उभारल्या जात असताना गावातील सरकारी शाळांसाठी पुरेशा सुविधा का निर्माण होउ शकल्या नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ग्रामीण भागातील अनेक मुलांना आजही शाळेत जाण्यासाठी मोठे अंतर पार करावे लागते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचा दावा दिपके यांनी केला. शेतकरी आणि कामगारांच्या मुलांनाही देशाच्या भविष्यातील पीढी म्हणून समान संधी मिळायला हवी, असे त्यांनी म्हटले. ➪(पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# १ व १० वरिल उर्वरित

## भाजपच्या झारखंड बंदला

त्यात १०० हून अधिक विद्यार्थी जखमी झाले. या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी संध्याकाळी विधानसभेच्या प्रवेशद्वाराजवळ मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला. तो केक त्यांनी पोलिसांनाही वाटला. काही विद्यार्थी संध्याकाळी घरी परतले, तर काही तिथेच थांबून राहिले. रात्री परिस्थिती पुन्हा बिघडली आणि पोलिसांनी पुन्हा एकदा लाठीचार्ज केला; यावेळी विद्यार्थिनींनाही मारहाण करण्यात आली.

**दिपके म्हणाले: आम्ही झारखंडमधील विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहोत**

झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईबाबत भाष्य करताना 'कांग्रेस जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके म्हणाले, जेव्हा राजकीय पक्ष आंदोलन करतात, तेव्हा अश्रुधूर किंवा लाठीचार्ज का केला जात नाही? केवळ विद्यार्थ्यांच्या बाबतीतच असे का केले जात आहे? मी देवेंद्र महतो यांच्याशी चर्चा केली; त्यांनी मला सांगितले की, गेल्या नऊ दिवसांपासून उपोषणावर असूनही पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला. विद्यार्थ्यांना दडपण्याऐवजी सरकारला नक्की काय साध्य करायचे आहे, याचा देशातील सर्व सरकारांनी विचार केला पाहिजे; अशी क्रूरता घडायला नको. आम्ही देवेंद्र महतो यांना आमच्या पाठिंब्याची ग्वाही दिली आहे. झारखंडमधील आमची टीम विद्यार्थ्यांसोबत मिळून काम करत आहे.

## ठाकरेंच्या वकिलांचा जोरदार

कपिल सिब्बल: विधिमंडळ पक्षाची स्वतंत्र बैठक घेणे याचा अर्थ कधीही राजकीय पक्षात फूट पडली, असा होऊ शकत नाही. २१ जूनच्या पत्राचा संबंध केवळ विधिमंडळ शाखेशी होता. मात्र, निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, याचा अर्थ पक्षात फूट पडली असा होतो. मग याचा निष्कर्ष काय? या तीन पत्रव्यवहारांमुळे पक्षात फूट पडली, असा निष्कर्ष काढला जातो. जर हा तर्क असेल, तर निवडणूक आयोगाला या प्रकरणात अधिकारक्षेत्र स्वीकारता येणार नाही. आणि जर या घटनांमुळे पक्षात फूट पडली नाही, असे मानले तर परिच्छेद १५ अंतर्गतही निवडणूक आयोगाला अधिकारक्षेत्र स्वीकारता येणार नाही. कारण परिच्छेद १५ अंतर्गत अधिकारक्षेत्र तेव्हाच निर्माण होते, जेव्हा पक्षात फूट पडते आणि दोन प्रतिस्पर्धी गट अस्तित्वात येतात.कपिल सिब्बल: ते २०१८ च्या पक्षघटनेवर अवलंबून आहेत; मात्र त्यानंतरच्या टप्प्यावर ते त्याकडे पाहत नाहीत. माझ्या बाजूने असलेल्या दोन निकालांना त्यांनी आधार दिलेला आहे, तर एका निकालाचा त्यांनी वेगळा अर्थ लावला आहे. या सर्व निकालांमध्ये राजकीय पक्षातील फूट याबाबत चर्चा करण्यात आली आहे; विधिमंडळ शाखेतील फूट याबाबत नाही. निवडणूक आयोगाचा अर्थ लावण्याचा दृष्टिकोन हा परिच्छेद १५ च्या विरोधात आहे. आयोगाने विधिमंडळ पक्षातील फूट म्हणजेच राजकीय पक्षातील फूट, असे मानले आहे. मात्र, पक्षामध्ये प्रतिस्पर्धी गट निर्माण होणे याचा अर्थ राजकीय पक्षामध्येच प्रतिस्पर्धी गट निर्माण झाले, असा लावता येणार नाही.

## मुंबई लोकलमध्ये जेन-झीसाठी

सकाळी ११ वाजेपर्यंत आरक्षित ठेवण्याची ठेवण्याची मागणी तेजस्वी घोसाळकर यांनी केली आहे. तेजस्वी घोसाळकर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून मागणी केली आहे. त्यांनी मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गांवर प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन डबे आरक्षित करण्याची मागणी केली आहे. मुंबईत सध्या लोकलचे दोन डबे महिलांसाठी आरक्षित आहेत. प्रथम श्रेणीसाठी काही डबे आरक्षित आहेत. मालवाहतुकीसाठी काही डबे आरक्षित आहेत. सध्या मुंबईच्या लोकल डब्यात खच्चून गर्दी असते. लोकलच्या सर्व डब्यात एकसारखीच गर्दी पाहायला मिळते. रेल्वे डब्यात गर्दीच्या वेळेत प्रवाशांना एका पायावर उभे राहून प्रवास करण्याची वेळ येते. लोकल गर्दीत आता विद्यार्थ्यांसाठी तीन डबे आरक्षित करण्याची मागणी पुढे आली आहे. त्यामुळे सरकार ही मागणी मान्य करणार का, याकडे सा-यांचं लक्ष लागलं आहे. तीन डबे आरक्षित करावे, ही मागणी भाजपच्या मुंबईतील वॉर्ड क्रमांक १ च्या नगरसेविका आहेत. त्यांनी ठाकरे गटातून भाजपमध्ये प्रवेश केला होता. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत घोसाळकर यांनी बाजी मारली होती.

## १५ ऑगस्टपासून कॉकरोचचा

**सरकारी शाळांच्या सुधारणेला प्राधान्य-** या पार्श्वभूमीवर १५ ऑगस्टपासून सुरू होणा-या अभियानाचा केंद्रबिंदू सरकारी शाळांची स्थिती सुधारणे हा असेल, असे सीजेपीकडून सांगण्यात आले आहे. गावातील शाळांमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आहेत, कोणत्या सुविधा उपलब्ध नाहीत आणि कोणत्या बाबींमध्ये सुधारणा आवश्यक आहे, याचा आढावा घेण्यासाठी नागरिक आणि पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अभियानात गावातील सरपंच आणि स्थानिक नेतृत्वाची भूमिकाही महत्त्वाची राहणार आहे. आपल्या गावातील सरकारी शाळेची जबाबदारी स्वीकारून त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा, असे दिपके यांनी म्हटले आहे.

## बहुचर्चित अश्लील व्हिडिओकांड

मिळाल्यानंतर एड. वकार अहमद यांनी माध्यमांशी बोलताना दावा केला की, काही जनप्रतिनिधी आणि सोशल मीडिया मधील काही लोकांनी या प्रकरणाला दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण करण्यासाठी राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला.या प्रकरणाचा पुढील तपास सुरूच राहणार आहे.

## कॉंक्रीट रस्त्याच्या देयकासाठी

अटक कारवाई करण्यात येणार असल्याचे एसीबीकडून सांगण्यात आले.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक लाच लूचापक प्रतिबंधक विभाग अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली उपपोलीस निरीक्षक निलिमा सातव यांनी केली. पथकात पोलीस निरीक्षक निलिमा सातव, पोलीस उपनिरीक्षक सुधीर चर्जन, पोलीस कर्मचारी उर्वेद घोरत आदींचा सहभाग होता.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय कामासाठी अधिकारी किंवा कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास लाच न देता तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

## आमझरी व खटकली परिसरात

उपायुक्त शशिकला अहिरराव, शबरी महामंडळाचे शाखा व्यवस्थापक गणेश साखरे, वरिष्ठ सल्लागार प्रशांत ब्राह्मणकर आणि विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक नागरिक व पर्यटन समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

स्थानिकांनी पारंपरिक व उत्स्फूर्त पद्धतीने मान्यवरांचे स्वागत केले आणि आदिवासी बांधवांनी संवाद सत्रात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.बैठकीत लीना बनसोड यांनी सांगितले की शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून पर्यटन योजना राबवल्या जात आहेत.आमझरी व खटकली भागातील नैसर्गिक सौंदर्याचे संवर्धन करताना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि आदिवासी खाद्यपरंपरेला जागतिक पातळीवर ओळख देण्याचे काम आदिवासी विकास विभाग करीत आहे. त्यांनी या परिसरासाठी एक सर्वसमावेशक व आकर्षक टुरिस्ट प्लॅन तयार करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आणि पर्यटकांना भेट देण्यासारख्या स्थळांचे, अनुभवांचे व मार्गनिदर्शनाचा संपूर्ण आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या.

पर्यटकांना स्थानिक आदिवासी खाद्यसंस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव देता यावा, यासाठी पारंपरिक पदार्थांच्या रेसिपींचे अधिकृत दस्तऐवजीकरण करणे आणि त्यामुळे स्थानिक महिलांना व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा योजनेचा महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरण रक्षणसोबत परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कठोर नियमावली लागू करण्यावर भर देण्यात येत असल्याचे सांगितले. पर्यटकांनी कचरा करू नये यासाठी आचारसंहिता तयार करण्यात येईल व परिसरातील नियमित साफसफाई व्यवस्था राबवली जाईल,असे यावेळी सांगण्यात आले. त्याचबरोबर परिसरातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांची माहिती देऊन पर्यटनाला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे.

आदिवासिंची पारंपरिक कला, सांस्कृतिक कार्यक्रम आणि हस्तकला यांद्वारे पर्यटनाला अधिक प्रभावी बनवण्याचे उपक्रम राबवले जातील. पर्यटनविकासात रस्ते व कनेक्टिव्हिटीचे महत्त्व लक्षात घेऊन या भागातील रस्ते विकासावर व संबंधित पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्यात येईल, असेही यावेळी सांगण्यात आले. बैठकीत उपस्थित स्थानिक नागरिक व होम-स्टे लाभार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल सकारात्मकता व्यक्त केली आणि स्थानिक पातळीवर सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. पुढील टप्प्यांबद्दल व अंमलबजावणीच्या तांत्रिक बाबींबाबत संबंधित अधिकाऱ्यांमार्फत तपशीलवार नियोजन केले जाईल, असेही बैठकीत सांगण्यात आले.

## अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत खोटे

बंधनकारक होते. या अटीनुसार खारोळे यांनी एक अनुभव प्रमाणपत्र १५ ऑगस्ट २०२२ चे सादर केले होते.मात्र हे अनुभव प्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार त्यावेळी तत्कालीन मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आली होती, परंतु त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, असा आरोप विजेकर यांनी केला.या प्रकरणाची सत्यता पडताळण्यासाठी विजेकर यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दर्यापूर कार्यालयाकडे माहिती मागवली. त्यावर उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग दर्यापूर यांनी लेखी स्वरूपात स्पष्ट केले आहे की, त्यांच्या कार्यालयीन क्रमांक ३१५८ नुसार दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी असे कोणतेही अनुभव प्रमाणपत्र आमच्या कार्यालयाकडून देण्यात आलेले नाही.त्यामुळे खारोळे यांनी सादर केलेले पत्र खोटे असल्याचे स्पष्ट झाले आहे, असा दावा विजेकर यांनी केला आहे. नगरपरिषदेसारख्या शासकीय संस्थेची खोट्या कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करणे हा गंभीर गुन्हा आहे. प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि त्याला नगरपरिषदेच्या कामातून कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकावे,' अशी मागणी गजानन विजेकर यांनी पत्रकार परिषदेत केली.दरम्यान, या पत्रकार परिषदेनंतर अंजनगाव नगरपरिषद प्रशासन आता यावर काय भूमिका घेते आणि काय कारवाई करते, याकडे संपूर्ण शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

## गोळीबार प्रकरणातील आरोपींना

दोन व्यक्तींनी देशी कट्ट्यातून गोळीबार केला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शहर गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिसांनी परिसरासह शहरातील १०० हून अधिक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या प्रकरणाचा अवघ्या २४ तासांत छडा लावला. या प्रकरणात पोलिसांनी बादशाहसिंग अजबसिंग टांक, अजय नुरजेम भोसले, राजासिंग अजबसिंग टांक आणि चंद्रसिंग ऊर्फ शेरूसिंग जोधसिंग शाकला यांना अटक केली. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, विपुल ठाकरे याने स्वतःच्या घरावर गोळीबार घडवून आणण्यासाठी बादशाहसिंग टांक याच्याशी दीड लाख रुपयांचा व्यवहार ठरविल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्यापैकी १० हजार रुपये आगाऊ रक्कम चंद्रसिंग ऊर्फ शेरूसिंगच्या माध्यमातून शूटरपर्यंत पोहोचविण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. अटक केलेल्या चारही आरोपींना मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना १४ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणातील फरार आरोपी विपुल ठाकरे याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके कार्यरत असून, त्याच्या अटकेनंतर या कटामागील नेमका उद्देश आणि इतर बाबींचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

## सुदाम मुगल यांची सचिव पदी

सचिव पदी सुदाम मुगल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संस्थेच्या आजीवन सभासद पदी त्यांच्या सुविद्य पत्नी उषा सुदाम मुघल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती बद्दल त्यांचा प्रशांत देशमुख, ज्ञानेश्वर बारस्कर, जयंत निखारे, प्रफुल्ल घवळे यांच्यासह विविध संस्था आणि संघटनेच्या प्रतिनिधींनी त्यांच्या घरी जाऊन सत्कार केला. सुदाम मुगल यांच्या या नियुक्ती बद्दल महाविद्यालयीन कर्मचारी संघटनेमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सचिव पदी नियुक्ती झाल्यामुळे शिक्षण क्षेत्रात आणखी चांगले काम करण्याची संधी या निमित्ताने मिळाली आहे. सर्वांच्या सहकार्याने चांगले कार्य करू अशी प्रतिक्रिया यावेळी उभयतांनी दिली. उल्लेखनीय म्हणजे या संस्थेचे अचलपूर येथील जगदंब कला व वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातून सुदाम मुघल हे काही वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेले आहेत. संस्थेच्या सचिव पदी निवड झाल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला.

## रिद्धपूर घटनेच्या पार्श्वभूमीवर

तपासणी करून नियमबाह्य पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याचे धोरण परिवहन विभागाने स्वीकारले आहे.

दर्यापूर शहर व परिसरात शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी यापुढेही सुरू राहणार आहे. आवश्यक परवाने, फिटनेस, सुरक्षा निकष आणि परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

**पिवळी बस बंधनकारक-** दर्यापूर शहरातील प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या वाहतुकीबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसचा रंग पिवळा असणे बंधनकारक असल्याचे परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची कागदपत्रे, फिटनेस, परवाना आणि सुरक्षा नियमांची पूर्तता झाली आहे की नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. आरटीओच्या या कारवाईमुळे नियमबाह्य स्कूल बस चालक-मालकांचे धाबे दणाणले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासन अधिक सतर्क झाले आहे.

शहरातील शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी ग्रामिण भागातून दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी ये जा करतात खासगी स्कूल बसवर कारवाई झाल्याने वाहतुकीचा पर्याय मर्यादित होण्याची शक्यता आहे. परिणामी ग्रामिण विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मोठा नाहक त्रास सहन करावा लागणार असून पालकांच्या खिशावरही अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसोबतच ग्रामिण विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा प्रश्नही विचारात घ्यावा, अशी पालकांची मागणी आहे.

## फरार तीन आरोपी जेरबंद

आरोपी फरार झाले होते. दरम्यान, आरोपी अमरावती शहरात लपून बसल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी यास्मीन नगर परिसरात सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शेख समीर शेख बिस्मिल्लाह (वय २०, रा. उस्मान नगर, अमरावती), अख्तर शान अफसर खान (वय २३, रा. ताज नगर क्रमांक २, अमरावती) आणि शरजील बेग मोहम्मद बेग (वय १९, रा. गौस नगर, अमरावती) यांचा समावेश आहे. पोलिसांनी केलेल्या चौकशीत गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या टीव्हीएस अ?क्सेस मोपेड आणि होंडा स्प्लेंडर या दोन दुचाकींची माहिती मिळाली. त्यानंतर दोन्ही वाहने जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या वाहनांची एकूण किंमत १ लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोलंके आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके व त्यांच्या पथकाने केली. प्रकरणाचा पुढील तपास नागपुरी गेट पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

## ७१ लाखांच्या 'म्यूल अकाउंट'चा

प्रकरणाच्या तपासात यापूर्वी तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यानंतर सायबर पोलिसांनी इतर सायबर गुन्ह्यांचाही तांत्रिक पद्धतीने तपास सुरू ठेवला. याच तपासादरम्यान अप. क्र. २१/२०२६ मधील आर्थिक व्यवहारांची साखळी पोलिसांच्या हाती लागली. या प्रकरणात करण दिनेश तानोलकर, रोहन प्रभाकर वैद्य, सौरभ नितीन नेपाळे आणि अजिंक्य गजानन गिरी यांना अटक करण्यात आली. त्यानंतर अप. क्र. २३/२०२६ च्या तपासातून विजय महेशलाल झामनानी आणि मयुर हरिष मोटवानी यांनाही जेरबंद करण्यात आले.

सहा मोबाईल, सिमकार्ड जप्त-

पोलिसांनी आरोपींकडून सहा मोबाईल हँडसेट, सहा सिमकार्ड, बँक पासबुक, एटीएम कार्ड तसेच विविध बँक खात्यांशी संबंधित कागदपत्रे आणि माहिती जप्त केली आहे. या साधनांच्या आधारे पैशांचा प्रवास, खात्यांमधील व्यवहार आणि या रॅकेटशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेतला जात आहे. दोन्ही गुन्ह्यांतील सहा आरोपींना अटक करून त्यांची पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे. जप्त साहित्याच्या तपासातून या रॅकेटची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता असून, त्यामागे असलेले सूत्रधार आणि अन्य सहभागी व्यक्तींचा शोध सुरू आहे.

**'कमिशन'च्या नादात खाते देणे महागात पडू शकते-**

सायबर गुन्हेगारांच्या सांगण्यावरून स्वतःचे बँक खाते, एटीएम कार्ड, यूपीआय किंवा बँकिंगशी संबंधित माहिती दुसऱ्याला देणे धोकादायक ठरू शकते. अशा खात्यांचा वापर सायबर फसवणुकीची रक्कम वळविण्यासाठी झाल्यास खातेधारकही कायदेशीर अडचणीत येऊ शकतो. त्यामुळे कमिशनच्या आमिषाला बळी पडून 'म्यूल अकाउंट' उपलब्ध करून देऊ नये, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. सायबर फसवणूक झाल्यास विलंब न करता १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा म्ब्म्ब्म्स्ुदन्ग्ह वर तक्रार नोंदवावी. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या नेतृत्वात सायबर पोलिसांच्या पथकाने केली.

## अखेर अंजनगाव नगर परिषद

मोकाट सोडून रहदारीला अडथळा निर्माण करीत आहात. आपली मोकाट जनावरे ही सार्वजनिक रस्त्यावर रस्त्याच्या मधोमध बसत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच नागरीकांचे गंभीर अपघात होवून नागरीकांच्या जिवास धोका निर्माण होत आहे. असा अंतिम इशारा मोकाट जनावरे मालकांना नगरपरिषद प्रशासनाने जाहीर नोटीस व्दारे दिला आहे.ज्या नागरिकांची पाळीव जनावरे मोकाट फिरत आहेत, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांच्या आत आपली जनावरे स्वतःच्या मालकीच्या जागेत बंदिस्त करावीत.मुदतीत जनावरे बंदिस्त न केल्यास नगर परिषद अंजनगाव सुर्जी मार्फत सदर जनावरे जप्त करण्यात येवून गौरक्षण येथे पाठविण्यात येतील व संबंधित मालकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. ही जाहीर सूचना मुख्याधिकारी विजय लोहेकर यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आली .शहरातील महत्वाच्या वर्दळीच्या रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात होती. अखेर प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

## ८२ वर्षीय दाम्पत्याला 'डिजिटल

मानसिक खेळ. प्रकरणाची कुठेही माहिती दिल्यास अटक केली जाईल, अशी भीती दाखविण्यात आली. तपास पूर्ण होईपर्यंत पोलिसांच्या सूचनेनुसारच वागण्याचे आदेश देण्यात आले. ठगांनी डाखोडे यांच्या बँक खात्यांपासून एफडी, दागिने आणि इतर गुंतवणुकीपर्यंतची माहिती मिळवली.

**व्हिडिओ कॉलवर नजर ठेवण्याचा बनाव-** सायबर ठगांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून डाखोडे यांच्यावर सतत नजर ठेवत असल्याचा बनाव केला. दर दोन तासांनी 'I am Safe' असा संदेश पाठविण्याचे आदेश देण्यात आले. सूचनांचे पालन केले नाही तर तात्काळ अटक करण्याची धमकी देत त्यांना सतत मानसिक दबावाखाली ठेवण्यात आले. यानंतर ठगांनी डाखोडे यांच्या खात्यातील सर्व रक्कम 'तपास पूर्ण होईपर्यंत सुरक्षित ठेवण्यासाठी' एका विशिष्ट बँक खात्यात ट्रान्सफर करण्यास सांगितले. याच टप्प्यावर डाखोडे यांना काहीतरी गडबड असल्याचा संशय आला. त्यांनी पत्नी जयश्री डाखोडे यांना हा प्रकार सांगितला. जयश्री यांनी तातडीने जावई मंगेश देशमुख यांच्याशी संपर्क साधला. देशमुख यांनी क्षणाचाही विलंब न करता सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल निखिल माहुरे यांना माहिती दिली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येताच माहुरे यांनी पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे व सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांना माहिती दिली.

**पोलिसांची तत्काळ धाव; दाम्पत्याची सुटका-** यानंतर पोलीस निरीक्षक अंभोरे यांनी राजापेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्याशी संपर्क साधला. स्थानिक पोलिसांचे पथक तातडीने शिवछाया कॉलनीतील डाखोडे यांच्या घरी पोहोचले. पोलिसांनी ज्येष्ठ दाम्पत्याशी संवाद साधत त्यांना संपूर्ण प्रकार हा सायबर ठगांचा बनाव असल्याचे समजावून सांगितले. पोलिसांच्या या तत्पर हस्तक्षेपामुळे डाखोडे दाम्पत्य 'डिजिटल अरेस्ट'च्या मानसिक दबावातून बाहेर आले आणि मोठी आर्थिक रक्कम सायबर गुन्हेगारांच्या खात्यात जाण्यापासून वाचली. त्यानंतर दोघांनाही सायबर पोलीस ठाण्यात आणून समुपदेशन करण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार, पोलीस हेड कॉन्स्टेबल निखिल माहुरे आणि राजापेठ पोलीस ठाण्यातील अंमलदारांनी केली.

**'डिजिटल अरेस्ट' नावाची कोणतीही कायदेशीर कारवाई नाही!-** पोलीस किंवा कोणतीही तपास यंत्रणा फोन अथवा व्हिडिओ कॉलवरून नागरिकांना 'डिजिटल अरेस्ट' करून खात्यातील पैसे दुसऱ्या खात्यात जमा करण्यास सांगत नाही. त्यामुळे पोलीस असल्याचे सांगून अटक करण्याची धमकी दिल्यास नागरिकांनी घाबरून जाऊ नये. अशा कॉलवर कोणतीही आर्थिक किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये. तातडीने डायल ११२, जवळचे पोलीस ठाणे किंवा सायबर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## इर्विनमधील प्रयोगशाळा वैज्ञानिक

संबंधित महिला अधिकारी ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी प्रयोगशाळेत कर्तव्यावर असताना आरोपी डॉक्टरने मशीनची पाहणी करण्याच्या कारणावरून तिला बोलावले. त्यानंतर चेंबरमध्ये बोलावून दरवाजा बंद करण्यास सांगितले. यावेळी हात पकडणे, शरीराला स्पर्श करण्याचा प्रयत्न करणे तसेच शरीरसुखाची मागणी केल्याचा गंभीर आरोप महिलेने केला आहे. या प्रकारानंतर घाबरलेल्या महिलेने चेंबरमधून बाहेर पडून घरी गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर महिलेने कुटुंबीयांना माहिती दिली आणि १० ऑगस्ट रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली. तिच्या जबानीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. घटनास्थळ, संबंधितांचे जबाब, रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज व अन्य पुरावे तपासले जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भिम ब्रिगेडचे राजेश वानखडे यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना निवेदन देऊन डॉक्टरवर कारवाईची मागणी केली. प्रशासनाने चौकशीनंतर कारवाईचे आश्वासन दिले होते. त्यानुसार संबंधित डॉक्टरला कार्यमुक्त करून पुढील अहवाल वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी डॉक्टरचा शोध पोलिस घेत असून, या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार आहे.

## बंद घराचे कुलूप तोडून

सैयद मुर्तजा अली हे एमआयडीसी परिसरातील एका प्लास्टिक कंपनीत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी ते दुबई येथे नोकरीला होते.

९ ऑगस्ट रोजी ते कुटुंबासह अचलपूर येथे आयोजित कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेले होते. घराला व्यवस्थित कुलूप लावून संपूर्ण कुटुंब बाहेर गेले. हीच संधी साधून चोरट्यांनी घरावर डल्ला मारल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

दरम्यान, १० ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे २.१५ वाजता कुटुंबीय अचलपूरहून घरी परतले. घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसताच त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. घरात प्रवेश केल्यानंतर सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. बेडरूममध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटाचेही कुलूप तोडण्यात आले होते.

कपाटाची पाहणी केली असता त्यामध्ये ठेवलेले ४९८ ग्रॅम सोन्याचे दागिने, अंदाजे किंमत ९ लाख ९६ हजार रुपये, तसेच दोन लाख रुपयांची रोकड गायब असल्याचे आढळले. अशाप्रकारे चोरट्यांनी एकूण ११ लाख ९६ हजार रुपयांच्या ऐवजावर हात साफ केला. चोरट्यांनी घरात प्रवेश केल्यानंतर थेट लोखंडी कपाटाला लक्ष्य केले. त्यामुळे या चोरीपूर्वी घराची रेकी करण्यात आली होती का? तसेच घरातील मौल्यवान वस्तूंबाबत चोरट्यांना माहिती होती का? या दिशेने पोलिस तपास करीत आहेत. घटनेची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, जुन्या गुन्हेगारांची तसेच चोरीच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्या संशयितांची माहिती घेतली जात आहे. या प्रकरणी तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(३), ३३१(४) आणि ३०५(अ) अन्वये अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौलाना आझाद कॉलनीत घडलेल्या या मोठ्या चोरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवावी तसेच बंद घरांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**नावात बदल**

**ASHVINI SUSHIL WANKHADE**

**ASHWINI SUSHILRAO WANKHADE**

हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे.

---

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५००/२०२६ ने.ता.०१.०९.२०२६

**अर्जदार -**
१. **दादाराव सुर्यभान कोकने**, वय ८० वर्षे
रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. **महेंद्र दादाराव कोकने**, वय ५० वर्षे,
रा.फ्लॅट क्र.१०४ सी विंग वास्तु शुभ अपार्टमेंट फॉरेस्ट नाका, कल्याण बदलापुर रोड गणपत दाभा चिखोली अंबरनाथ ता.जि.ठाणे
३. **मिना निरंजन इंगळे**, वय ४४ वर्षे,
रा.भाईपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **रिना प्रमोद इंगळे**, वय ४० वर्षे,
रा.वार्ड क्र.२, शिवणगाव, ता.तिवसा, जि.अमरावती
५. **मनोज दादाराव कोकने**, वय ३८ वर्षे,
रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. **सिमा दादाराव कोकने**, वय ३६ वर्षे,
विट भटटी जवळ, बिच्चु टेकडी, तटस कॉलनी कॅम्प, अमरावती ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --
**(कुणीही नाही)**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २,बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र.१ हे मयत कुसुमबाई दादारावजी कोकने यांचे पती असून अर्जदार क्र.२ ते ६ चे वडिल आहे. **मयत कुसुमबाई दादारावजी कोकने यांचा मृत्यू दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे झाला.** मयत कुसुमबाई दादारावजी कोकने यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरील प्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०५.०८.२०२६ — शिक्का — **आदेशान्वये, (सहाय्यक अधीक्षक ) दिवाणी न्यायालय, मोर्शी**

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **आशुतोष थावरदास पंजवानी**, रा.जयस्तंभ चौक, नवी वस्ती, बडनेरा ता,जि.अमरावती यांनी **अनिल भिमराव वासनिक, संजय भिमराव वासनिक, उषा सुधाकर भालेराव, निर्मला दिगंबरराव गजभिये, सचिन प्रदीप वासनिक** यांचा मालकीचे मौजे वरुडा, ता.जि.अमरावती येथील **भूमापन क्र. ५/१/४६** बांधलेले घर विकत घेण्याचा सौदा केला आहे. नमुद अनिल भिमराव वासनिक, संजय भिमराव वासनिक, उषा सुधाकर भालेराव, निर्मला दिगंबरराव गजभिये, सचिन प्रदीप वासनिक यांचा व्यतिरिक्त इतर कोणाचीही हक्क, बोजा,वारस हक्क व इतर काही भानगड असल्यास त्यांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क -**
**आशुतोष थावरदास पंजवानी**
**रा.जयस्तंभ चौक, नवी वस्ती,**
**बडनेरा, ता.जि.अमरावती**
**मो.- ८६०५०६०३०**

**ॲड.हार्दिक एम.पटेल**
**मो.७३०४५५७५३७**

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५३९/२०२६ ने.ता.०७.०९.२०२६

**अर्जदार -**
१. **फमीदा बी अब्दुल रज्जाक**, वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **आल्फिया तब्बसुम अब्दुल माजीद**, वय ३० वर्षे, धंदा - घरकाम
३. **मोहम्मद आरियान अब्दुल माजीद**, वय ०९ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार नं.३ करिता अ.पा.क.आई अर्जदार नं.२
सर्व रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार क्र.१ चा मुलगा तर अर्जदार नं.२ चे पती तर अर्जदार नं.३ चे वडिल नामे अब्दुल मजीद अब्दुल रज्जाक हे दिनांक २०/०५/२०२६ रोजी Sub- District Hospital Morshi, Tq. Morshi, Dist. Amravati येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे.तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १०/०८/२०२६** — शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)** दिवाणी न्यायालय, मोर्शी

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मालेगावात गुटख्याचा 'गोडाऊन गेम' उघड!

## FDAच्या धाडीत १८.८५ लाखांचा माल आणि दोन वाहने जप्त

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरात प्रतिबंधित गुटख्याचा धंदा किती खोलवर रुजला आहे, याचा धक्कादायक पर्दाफाश अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवाईत झाला. दोन ठिकाणी अचानक छापे टाकून तब्बल १८ लाख ८५ हजार १६५ रुपयांचा गुटखा-पानमसाला आणि दोन वाहने जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे कारवाईची चाहूल लागताच या साठ्याशी संबंधित असल्याचे समोर आलेला बंडू उर्फ नंदलाल नारायण यादव पसार झाला.

अमरावती येथील अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ही कारवाई केली. भेरा रोडवरील मयूर इलेक्ट्रॉनिकसमोरील गोडाऊन आणि जोगदंड हॉस्पिटलजवळील कृष्णा ट्रेडर्स या दोन ठिकाणी एकाचवेळी धाड टाकण्यात आली. दोन्ही ठिकाणी प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याचा मोठा साठा आढळून आल्याने पथकाने तो ताब्यात घेतला.

**गोडाऊनमध्ये लाखोंचा साठा; वाहनांतून काय चालले होते?**

कृष्णा ट्रेडर्समधून ४४ हजार ७१० रुपये, तर भेरा रोडवरील गोडाऊनमधून तब्बल ७ लाख १४ हजार ३० रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे या साठ्याशी संबंधित दोन वाहनेही पोलिसांच्या ताब्यात आली. महिंद्रा मॅक्स

**कारवाईची चाहूल लागताच संशयित फरार**




वाहनाची किंमत ७७ हजार ६२५ रुपये, तर टाटा एस वाहनाची किंमत तब्बल ७ लाख ४८ हजार ८०० रुपये आहे. म्हणजेच गुटख्याच्या साठ्यासोबत त्याच्या वाहतुकीसाठी वापरली जाणारी साधनेही तपास यंत्रणेच्या हाती लागली आहेत. त्यामुळे आता हा माल केवळ साठवला जात होता की त्याची नियमित वाहतूक आणि वितरण सुरू होते, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

**धाड पडली अन् 'मालक' गायब!**

तपासात दुकान आणि गोडाऊन हे बंडू उर्फ नंदलाल नारायण यादव याच्याशी संबंधित असल्याचे समोर आले. मात्र, FDAची कारवाई सुरू झाल्याची माहिती मिळताच संशयित पसार झाल्याचे सांगण्यात येत आहे. यादव फरार असल्याने पोलिसांसमोर आता केवळ आरोपीला पकडण्याचे नव्हे, तर या संपूर्ण साठ्यामागील नेटवर्क उघड करण्याचे आव्हान आहे.

**बंदीच्या गुटख्याची 'सप्लाय लाईन' कोणती?**

राज्यात गुटखा आणि पानमसाल्यावर बंदी असताना मालेगावात तब्बल लाखो रुपयांचा साठा उभारला जातो, ही बाबच अनेक प्रश्न निर्माण करणारी आहे. माल कुठून आला? पुरवठा करणारा कोण? मालेगावात कोणाकडे माल पोहोचत होता? जप्त केलेल्या वाहनांचा यापूर्वी कुठे-कुठे वापर झाला? या व्यवहारात आणखी किती जण सहभागी आहेत? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यास मालेगावातील गुटख्याच्या कथित काळ्या बाजाराचे धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे.

**FDAच्या धाडीनंतर आता पोलिस तपासाची खरी परीक्षा**

अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम पंजाबराव दंदे यांच्या फिर्यादीवरून मालेगाव पोलिसांनी अपराध क्रमांक ५०२/२०२६ अन्वये बंडू उर्फ नंदलाल नारायण यादव याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील कलम २६(२) व ५९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अमरावती येथील अन्न सुरक्षा अधिकारी संदीप सूर्यवंशी, डॉ. विजय घोंगे आणि घनश्याम दंदे यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. वाशिमचे सहाय्यक आयुक्त भाऊराव चव्हाण, मालेगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग इंगळे तसेच पोलीस हवालदार भानुदास निवाने, गजानन लोखंडे आणि वैभव झरेकर यांनी कारवाईत सहकार्य केले. आता या प्रकरणातील फरार संशयिताच्या अटकेनंतर गुटख्याच्या या 'गोडाऊन गेम'मागे नेमकी कोणती साखळी कार्यरत होती, याचा पर्दाफाश होतो का, याकडे लक्ष लागले आहे.

# बाळापूरच्या शासकीय आयटीआयमध्ये सोलार टेक प्रशिक्षक पदांसाठी भरती

**११ महिन्यांच्या करारावर २ पदे, उमेदवारांना दरमहा मानधन**

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बाळापूर येथे सोलार टेक या नवीन अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षकाची २ पदे भरली जाणार आहेत. व्यवस्थापन समितीच्या वतीने ही भरती ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करार तत्त्वावर करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्जासह आवश्यक कागदपत्रे 'दि.१८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत' संस्थेच्या कार्यालयात जमा करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे खालीलपैकी कोणतीही एक शैक्षणिक अर्हता असणे बंधनकारक आहे. युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठातून इलेक्ट्रिकल किंवा इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या विषयातील पदवी किंवा पदविका आणि किमान १ वर्षाचा संबंधित क्षेत्रातील अनुभव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून वरील विषयातील ३ वर्षीय पदविका आणि किमान २ वर्षांचा अनुभव, एनसीव्हीटी/एससीव्हीटी अंतर्गत सोलार टेक्निशियन इलेक्ट्रिकल या व्यवसायातील प्रमाणपत्र आणि किमान ३ वर्षांचा अनुभव. तसेच उमेदवारांकडे एससीव्हीटी अंतर्गत आयटीआय प्रशिक्षक प्रमाणपत्र' असणे आवश्यक आहे. सदर पदे हे ११ महीन्यांकरिता तात्पुरत्या स्वरुपात भरवयाचे आहे. करीता आय एम सी ऑफ आय टि आय बाळापुर या नावाने रु. २००/- डि डि किंवा चेक स्वरूपात भरावे सदर निवड प्रक्रियेबाबत अंतिमनिर्णय प्राचार्य/सचिव यांचा राहील.

**निवड प्रक्रिया आणि इतर तपशील**

सादर केलेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची निवड 'दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजता' संस्थेत घेण्यात येणाऱ्या थेट मुलाखतीद्वारे केली जाईल. निवड झालेल्या उमेदवारांना मानधन दिले जाईल. सदर नियुक्ती तात्पुरती असून, त्यानंतर कायमस्वरूपी सेवेचा दावा करता येणार नाही, असे संस्थेने स्पष्ट केले आहे.

# उडी येथे पूर्व सोयाबीन पीक व्यवस्थापनावर शेतकरी प्रशिक्षण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र वाशिम व कृषी विभाग, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे उडी, ता. मालेगाव येथे दि. ४ ऑगस्ट रोजी 'पूर्व सोयाबीन पीक व्यवस्थापन व खरीप पिकांचे शास्त्रीय नियोजनङ' या विषयावर शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम प्रगतशील शेतकरी शंकर सानप यांच्या शेतावर आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतशील शेतकरी शंकर सानप उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मंडळ कृषी अधिकारी प्राजक्ता कुचेकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना खरीप हंगामातील सोयाबीन व तूर पिकांचे शास्त्रीय व्यवस्थापन, संतुलित खत व्यवस्थापन, तण नियंत्रण, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पीक संरक्षण उपाययोजना तसेच पीक उत्पादन व गुणवत्तावाढीसाठी अवलंबावयाच्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अधिवेशन उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी व अडचणीच्या वेळी पत्रकारांना मदत करणारी महाराष्ट्र राज्य पत्रका संघ मुंबईचे मराठवाडा विभागीय अधिवेशन व मराठवाडा भुषण पुरस्कार सोहळा छत्रपती संभाजी नगर येथील गेटवे हॉटेल सभागृहात ९ ऑगष्ट रोजी उत्साहात पार पडले. सदर अधिवेशनात प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मराठवाडा विभागाच्या वतीने आयोजित मराठवाडा विभागीय अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. मंचावर पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे, माजी गृहराज्यमंत्री मनसे नेते बाळा नांदगावकर, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्क

**प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांचा विशेष सत्कार**



प्रमुख वैभव स्वामी, पत्रकार हल्लाबोल कृती समिती प्रदेशाध्यक्ष अशोकराव देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, जेष्ठ पत्रकार मधुकर वैद्य, जिल्हाध्यक्ष छबुराव डाके उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्याहस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. तदनंतर संघटनेच्या वतीने सर्वांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील २६ जणांना मराठवाडा भुषण पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांच्याहस्ते नवनिर्वाचीत प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच जगदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी संस्थानच्या वतीने आशीर्वादरूपी विशेष सत्कार केला. यावेळी सामाजिक न्यायमंत्री सिरसाट, संस्थापक संजय भोकरे, मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी आपल्या विचारातून पत्रकार व त्यांच्या समस्या व आजची परिस्थीती या विषयावर विचार मांडले.कॅबिनेट मंत्री संजय सिरसाट यांनी पुढारी होणे सोपे नाही. रोज ठेचा लागतात. टिकेचा सामना करावा लागतो. पत्रकारांनी आपल्या लेखणीतून कुणाचे आयुष्य उध्दवस्त होणार नाही, याचे भान ठेवावे असे आवाहन केले. मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून आम्हाला बाळकडू मिळाले. आमचे मुळ आणि कुळ मातोश्री आहे. पूर्वी आक्रमकता होती. मात्र आता कुणाच्या विरोधात आक्रमक व्हावे हा प्रश्न आहे. कारण सर्वच पक्षात आपलेच आहेत. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी मराठवाडा मागे राहणार नाही अशी ग्वाही दिली. संस्थापक संजय भोकरे यांनी आज पत्रकारांनी आवाज उठविला की त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला तर लागणार नाही अशी भीती आहे. पत्रकार हा कधीही कुणाला घाबरत नाही. सत्य समाजासमोर आणणे आपले कर्तव्य आहे. आज कोण कोणत्या पक्षात आहे किंवा राहील याच शाश्वती देता येत नाही. त्यामुळे पत्रकारांनी निर्भिडपणे काम करोव यासाठी पत्रकारांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत असा विश्वास दिला.

दुपारच्या सत्रामध्ये लेखनीची क्रांती या विषयावर आयोजित परिसंवादाला जगदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज प्रामुख्याने उपस्थित होते.

# पात्र साहसी खेळाडूंनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने साहसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात येणाऱ्या तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार सन २०२५ साठी नामांकने मागविण्यात आली आहेत. वाशिम जिल्ह्यातील पात्र साहसी खेळाडूंनी २० ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण यांनी केले आहे. तेनझिंग नॉर्गे यांच्या स्मरणार्थ सन २००३ पासून हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. माउंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या तेनझिंग नॉर्गे यांच्या साहसी कार्यातून प्रेरणा घेऊन देशातील युवकांनी साहसी उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, हा या पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे. या पुरस्कारासाठी सन २०२३, २०२४ आणि २०२५ या तीन वर्षांतील जमिनीवरील, पाण्यातील आणि हवेतील साहसी उपक्रमांचा विचार करण्यात येणार आहे. संबंधित क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीची निवड करण्यात येईल. पुरस्कार विजेत्यास भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयामार्फत १५ लाख रुपये, तेनझिंग नॉर्गे यांची प्रतिमा आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येते. इच्छुक उमेदवारांनी https://awards.gov.in?? या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावा. अर्जासोबत मागील तीन वर्षांतील साहसी उपक्रमांचे तपशील व आवश्यक पुरावे जोडणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम येथे संपर्क साधावा.

# विद्यार्थ्यांच्या हाती 'हरित भविष्या'ची रोपे!



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विकासाच्या नावाखाली होत असलेली वृक्षतोड, वाढते तापमान आणि बिघडत चाललेले ऋतुचक्र यामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राष्ट्रीय हरित सेना, एस.एम.सी. इंग्लिश स्कूल, वाशीम यांच्या वतीने विद्यार्थ्यांना पिंक तैवान पेरूच्या रोपांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या मीना उबगडे तसेच राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक व मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ रोपे लावण्यापुरते मर्यादित न राहता त्यांचे नियमित संगोपन व संवर्धन करावे, याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण ही केवळ शासनाची किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच निर्माण व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये वृक्षलागवडीची आवड निर्माण होऊन पर्यावरण संवर्धनाची भावना रुजावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. 'आज एक रोप लावूया, उद्याचे हरित भविष्य घडवूया' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला प्रतिसाद मिळाला.

**राष्ट्रीय हरित सेनेचा उपक्रम; एस. एम. सी. इंग्लिश स्कूलमध्ये पिंक तैवान पेरूच्या रोपांचे वाटप**

# आ. श्याम खोडे यांच्या सहकार्याने यश चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

**अनसिंग ग्रामीण रुग्णालयात अखेर एक्स-रे सुविधा सुरू**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अनसिंग ग्रामीण रुग्णालयात अखेर एक्स-रे मशीन उपलब्ध झाले असून, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अनसिंगसह परिसरातील नागरिकांना एक्स-रे तपासणीसाठी खासगी केंद्रे किंवा इतर रुग्णालयांत जाण्याची गरज भासणार नाही.

रुग्ण कल्याण समितीचे सदस्य यश सतीश चव्हाण यांनी एक्स-रे मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने प्रशासनाकडे मांडून पाठपुरावा केला. यासाठी वाशिम-मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांचे सहकार्य लाभले. यापूर्वी एक्स-रेसाठी रुग्णांना बाहेर जावे लागत असल्याने तपासणीचा खर्च, प्रवासाचा खर्च आणि वेळ यांचा अतिरिक्त भार सहन करावा लागत होता. विशेषतः गरीब, वृद्ध, महिला व दुखापत झालेल्या रुग्णांची मोठी गैरसोय होत होती. आता ग्रामीण रुग्णालयातच एक्स-रेची सुविधा उपलब्ध झाल्याने रुग्णांचा वेळ, पैसा आणि प्रवासाचा त्रास वाचणार असून उपचार प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. या सुविधेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# लोकशाही जीवनमूल्यांचे संस्कार घडविणारा अनोखा उपक्रम

## श्री शिवाजी विद्यालयात शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक उत्साहात

■ प्रतिनिधी | वनोजा ■

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेचा अनुभव देत त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव, संघभावना आणि लोकशाही जीवनमूल्यांचा आदर निर्माण व्हावा, या उद्देशाने मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथिल श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वनोजा येथे शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक उत्साहात पार पडली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेचा अनुभव घेतला. इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी विविध मंत्रिपदांची निवड करण्यात आली. यामध्ये शिक्षण, परिपाठ, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, भोजन, क्रीडा व वनमंत्री अशा विविध पदांचा



समावेश होता. तसेच शाळेच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदासाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे उमेदवारी दाखल केली. निवडणुकीपूर्वी उमेदवारांना एक दिवस प्रचारासाठी देण्यात आला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत मतदानासाठी विशेष ईव्हीएम स्वरूपाची मतदान प्रणाली तयार करण्यात आली. त्यामध्ये उमेदवारांची छायाचित्रांसह यादी तयार करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी मतदान केंद्रावर जाऊन आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरील बटन दाबून मतदान केले. या निवडणुकीत २४७ विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे विद्यार्थ्यांना मतदान, उमेदवारी, प्रचार आणि निकाल या संपूर्ण लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

# पथनाट्याद्वारे कोंडाळा झांबरे येथे आरोग्य विषयक जनजागृती अभीयान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या वसुंधरा टेक्निकल इंस्टीट्युट द्वारा संचालीत स्थानिक माँ गंगा स्कुल व कॉलेज ऑफ नर्सिंग चा वतीने विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे ग्राम कोंडाळा झांबरे येथे आरोग्य विषयक जनजागृती केली.संस्थेचे डॉ. हरीश बाहेती ,डॉ सरोज बाहेती,प्रा दिपक अग्रवाल यांचा मार्गदर्शनात हे अभीयान राबवन्यात आले.यामध्ये विद्यार्थी ग्रामस्थांना स्थनपानाचे आईसाठी फ ायदे व अन्य विषयावर जनजागृती करण्यात आली. यासाठी उप.प्राचार्य अयाज पठान, पुनम चव्हान,प्रीयंका शीखरे,एलोका पाखरे,मनीशा बोरकर,स्वाती डोंगरे समवेत माँ गंगा परीवारातील सदस्यांनी पुढाकार घेतला.

# शेतकऱ्यांना युरोप, चिनच्या कृषी अभ्यास दौ-यांची संधी

**शेतकरी अभ्यास दौऱ्यासाठी २० ऑगस्टपर्यंत अर्ज करा ; कृषी विभागाचे आवाहन ;२ लाखांपर्यंत अनुदान मिळणार**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शेतीमालाची गुणवत्ता, उत्पादनक्षमता आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना देशाबाहेरील कृषी तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अभ्यास करता यावा, यासाठी सन २०२६-२७ मध्ये राज्यपुरस्कृत योजनेंतर्गत शेतकऱ्यांचे परदेशी अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत आहेत. या दौऱ्यांसाठी युरोप आणि चीन या देशांची निवड करण्यात आली आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी २० ऑगस्ट २०२६ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

जगभरात कृषी क्षेत्रात सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. या तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुसार पोहोचविणे आणि त्यांना आधुनिक शेती पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देणे, हा या अभ्यास दौऱ्यांचा प्रमुख उद्देश आहे.

**अभ्यास दौऱ्यासाठी प्रमुख पात्रता :** अर्जदार स्वतः शेतकरी असावा आणि त्याच्या स्वतःच्या नावे चालू कालावधीचा ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक आहे. शेती हे उत्पन्नाचे मुख्य साधन असल्याचे स्वयंघोषणापत्रात नमूद करावे लागेल. तसेच ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक असणे आवश्यक आहे.

एका शेतकरी कुटुंबातील केवळ एका व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. कुटुंबामध्ये पती, पत्नी व १८ वर्षांखालील मुले-मुली यांचा समावेश आहे. यासाठी शिधापत्रिकेची प्रत अर्जासोबत जोडावी लागेल. अर्जदाराचे वय अभ्यास दौऱ्यासाठी निघण्याच्या दिवशी किमान २५ वर्षे पूर्ण असावे. कमाल वयोमर्यादा नाही. मात्र, शेतकरी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे बंधनकारक असून, अर्जासोबत किमान एम.बी.बी.एस. डॉक्टरांचे तंदुरुस्ती प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अर्जदाराकडे वैध पासपोर्ट असणे आवश्यक असून, अर्ज सादर करताना पासपोर्टची वैधता किमान एक वर्ष असावी. पासपोर्टच्या वैधतेचा पुरावा म्हणून संबंधित पानाची प्रत जोडणे आवश्यक आहे. शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खासगी संस्थेत नोकरी करणाऱ्या व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, अभियंता, कंत्राटदार आदी व्यावसायिकांनाही पात्रता राहणार नाही. याबाबत स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. यापूर्वी केंद्र किंवा शासनाच्या विभागामार्फत, कृषी विद्यापीठामार्फत अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत अर्थसहाय्य घेऊन परदेश दौरा केलेला नसावा. याबाबतही अर्जदाराने स्वयंघोषणापत्र सादर करावे.

**एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा २ लाखांपर्यंत अनुदान**

शासनाकडून अभ्यास दौऱ्यासाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त २ लाख रुपये, यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान म्हणून देण्यात येणार आहे. जिल्ह्यासाठी ५ शेतकऱ्यांचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये एक महिला शेतकरी, केंद्र किंवा राज्यस्तरीय कृषी पुरस्कार प्राप्त अथवा पीक स्पर्धेतील विजेता एक शेतकरी आणि इतर तीन शेतकऱ्यांचा समावेश असेल. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरावर सोडत काढून ज्येष्ठता क्रमवारीनुसार निवड करण्यात येईल.

**अर्जासोबत ही कागदपत्रे आवश्यक**

चालू सहा महिन्यांचा ७/१२ उतारा, आधार कार्डची प्रत, शिधापत्रिकेची प्रत, डॉक्टरांकडून मिळालेले तंदुरुस्ती प्रमाणपत्र आणि वैध पासपोर्टची प्रत अर्जासोबत जोडावी. अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्यानंतर शेतकऱ्याने परदेश दौऱ्यासाठी पुन्हा शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याचे किमान एम.बी.बी.एस. डॉक्टरांचे प्रमाणपत्र सादर करावे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५६ ■ बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## केचेंना डावलण्यामागे वानखडेंची राजकीय खेळी

# आर्वीत भाजपचा अंतर्गत संघर्ष पेटला

### ज्यांच्या संघर्षावर उभे राहिलात, त्यांनाच आता बाजूला का सारता : सुमित वानखडेंच्या भूमिकेवर निष्ठावंत कार्यकर्त्यांचे प्रश्न

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आर्वी विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या अंतर्गत राजकारणाचा संघर्ष पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार दादाराव केचे यांना तळेगाव येथील कार्यक्रमापासून दूर ठेवण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कार्यक्रमाच्या बॅनरवर केचे यांचा फोटो नसणे आणि त्यांना निमंत्रण न मिळणे या पार्श्वभूमीवर विद्यमान आमदार सुमित वानखडे यांच्या भूमिकेवरच आता निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

केचे यांना जाणीवपूर्वक डावलले जात आहे का, हा प्रश्न सध्या आर्वीच्या भाजपच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ नेतृत्वाला स्थान देणे ही केवळ औपचारिकता नसून पक्षाच्या संस्कृतीचा भाग आहे. त्यामुळे एखाद्या ज्येष्ठ नेत्याचा वारंवार कार्यक्रमांपासून दूर राहणे हा निव्वळ योगायोग आहे की त्यामागे राजकीय समीकरणे आहेत, याचे उत्तर पक्ष नेतृत्वाने द्यावे, अशी मागणी कार्यकर्त्यांमधून होत आहे.




**ज्यांनी पक्षाचा पाया रचला, त्यांनाच बाहेरचा रस्ता-** दादाराव केचे यांनी आर्वी विधानसभा मतदारसंघात भाजपची संघटनात्मक ताकद उभी करण्यासाठी प्रदीर्घ काळ काम केले. गावागावात कार्यकर्त्यांचे जाळे उभे करणे, पक्षाची विचारधारा पोहोचविणे आणि प्रतिकूल राजकीय परिस्थितीत संघटना टिकविणे, यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला असल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे.

आज भाजपला मतदारसंघात मिळालेली राजकीय ताकद ही एका दिवसाची कमाई नसून अनेक वर्षांच्या संघटनात्मक परिश्रमाचे फलित आहे. त्यामुळे त्या संघर्षाचे नेतृत्व करणाऱ्या ज्येष्ठ नेत्यालाच कार्यक्रमाच्या बॅनरवर स्थान न देणे म्हणजे पक्षाच्या इतिहासालाच बाजूला सारण्याचा प्रकार असल्याचा आरोप कार्यकर्त्यांकडून होत आहे.

**वानखडेंना कार्यकर्त्यांनी घेरले प्रश्नांनी-** सुमित भाऊ, दादाराव केचे यांना वारंवार डावलण्यामागचे कारण काय असा प्रश्न आता काही निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित करत आहेत. नवीन नेतृत्वाचा सन्मान करण्यास कोणाचाही विरोध नाही; मात्र ज्येष्ठ नेतृत्वाचा अवमान करून नवीन नेतृत्व उभे करणे योग्य आहे का, असा प्रश्नही केला जात आहे.

पक्षात मतभेद असतील तर ते चर्चेतून सोडविले पाहिजेत. मात्र ज्येष्ठ नेत्यांना कार्यक्रमांपासून दूर ठेवणे, व्यासपीठावर स्थान न देणे किंवा बॅनरवरून त्यांचे अस्तित्वच गायब करणे हा जर पद्धतशीर प्रकार असेल तर त्याचा परिणाम तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मनोबलावर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**२०२४ च्या जखमेवर पुन्हा मीठ**

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारीच्या प्रश्नावरून दादाराव केचे यांच्या समर्थकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. त्यानंतरही पक्षाचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी आपली भूमिका मागे घेतल्याचे समर्थक सांगतात. त्यामुळे पक्षासाठी एवढा त्याग करणाऱ्या नेत्याला आज योग्य राजकीय सन्मान मिळत नसेल तर निष्ठेची किंमत काय, असा प्रश्न कार्यकर्त्यांमध्ये आहे. केचे यांना बाजूला सारण्याचा प्रयत्न सुरू असल्याची भावना जर कार्यकर्त्यांच्या मनात रुजली तर त्याचे परिणाम केवळ एका नेत्यापुरते मर्यादित राहणार नाहीत. आर्वीतील भाजपच्या संघटनात्मक राजकारणावर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो.

**फोटो काढून इतिहास पुसता येत नाही-** बॅनरवर फोटो नसल्याने एखाद्या नेत्याचे राजकीय योगदान संपत नाही. दादाराव केचे यांचे पक्षातील योगदान आणि आर्वीतील संघटन उभारणीतील भूमिका कार्यकर्त्यांच्या स्मरणातून पुसता येणार नाही, अशी भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे.

आता या संपूर्ण प्रकरणावर आ. सुमित वानखडे काय भूमिका मांडतात, पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व काय स्पष्टीकरण देते आणि दादाराव केचे यांच्याबाबत पक्षाची पुढील भूमिका काय राहते, याकडे आर्वी विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, वानखडे यांच्याकडून केचे यांना जाणीवपूर्वक डावलण्यात येत असल्याच्या आरोपाला स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या आरोपांवर आमदार सुमित वानखडे आणि पक्ष नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

### केचेंना डावलण्याचा आरोप; फडणवीसांच्या नावावर आर्वीकरांना गृहीत धरले जातेय का

माजी आमदार दादाराव केचे यांना डावलण्याचा प्रयत्न विद्यमान आमदार सुमित वानखेडे करीत असल्याचा आरोप राजकीय वर्तुळातून होत आहे. वानखेडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निकटवर्तीयांपैकी असल्यानेच 'फडणवीसांचे नाव आहे, मग आर्वीत काहीही खपवून घेता येईल अशी मानसिकता निर्माण झाली आहे का, हा प्रश्न आता आर्वीकर विचारू लागले आहेत. केचेंविरोधातील कथित राजकीय कुरघोडीकडे मुख्यमंत्री फडणवीस लक्ष देणार का, हा दुसरा प्रश्न आहे. भाजपच्या घरातील ही धुसफूस वेळीच थांबली नाही, तर आगामी राजकारणात पक्षालाच त्याची किंमत मोजावी लागू शकते. आज कुरघोडी, उद्या बंड आणि परवा मतपेटीत हिशेब

## बिरसा मुंडांचा पुतळा उभा होताच पोलिसांचा फौजफाटा

### वाहितपूरमध्ये तणावपूर्ण शांतता; अवैध दारूविक्रीच्या तक्रारींकडे डोळेझाक का



**सेलू जनमाध्यम :** भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीदिनी वाहितपूर गावात अज्ञात व्यक्तीने त्यांचा पुतळा उभारला आणि प्रशासनाची यंत्रणा अक्षरशः हलली. पुतळा उभारल्याची माहिती मिळताच तब्बल १५ पोलिसांचा फौजफाटा गावात दाखल झाला. गावात ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी वातावरणात तणावपूर्ण शांतता आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी गावात पुतळा उभारण्यात आला. हा पुतळा नेमका कोणी उभारला, त्यासाठी परवानगी घेण्यात आली होती का, याबाबत प्रशासनाकडून अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, घटनेनंतर गावात चर्चांना उधाण आले असून कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावला.

**दारूविक्रीच्या तक्रारी कुठे गेल्या**

पुतळा उभारल्यानंतर प्रशासनाने तत्परता दाखवल्याने ग्रामस्थांमध्ये मात्र वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. गावात मोठ्या प्रमाणावर अवैध दारूविक्री सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अवैध धंद्यामुळे तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात जात असून सामाजिक वातावरण बिघडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणी अनेकदा पोलिस आणि संबंधित प्रशासनाकडे तक्रारी केल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. मात्र, तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याने ग्रामस्थ संतप्त आहेत. एका पोलीस पाटलाच्या पुतण्याकडूनही दारूविक्री केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

**पुतळा उभा झाला अन् यंत्रणा जागी**

दारूविक्रीविरोधातील तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप असताना पुतळा उभारला जाताच १५ पोलिसांचा ताफा गावात दाखल झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गंभीर तक्रारींवर कारवाईसाठी पोलिसांची पावले का पडत नाहीत आणि एका घटनेनंतर एवढा मोठा बंदोबस्त कसा काय तातडीने उपलब्ध होतो, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. दरम्यान, गावातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेण्यात आली आहे. पुतळा उभारण्यामागील व्यक्ती कोण, या प्रकरणात प्रशासनाची पुढील भूमिका काय आणि ग्रामस्थांनी केलेल्या अवैध दारूविक्रीच्या आरोपांची चौकशी होणार का, याकडे आता संपूर्ण सेलू तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## आमगाव-माळेगाव मार्गावर अस्वलाचा गुराख्यावर हल्ला

### रमेश डोळे गंभीर जखमी; बोर व्याघ्र प्रकल्प परिसरातील नागरिकांमध्ये भीती

**सेलू जनमाध्यम :** बोर व्याघ्र प्रकल्प परिसरात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आमगाव-माळेगाव मार्गावर जनावरे चारून परतणाऱ्या गुराख्यावर अस्वलाने अचानक हल्ला केला. मंगळवारी (ता. ११) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडलेल्या या घटनेत रमेश भीमराव डोळे (वय ४८, रा. आमगाव) गंभीर जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, रमेश डोळे हे नेहमीप्रमाणे जनावरे चराईसाठी घेऊन गेले होते. सायंकाळी जनावरे घेऊन ते आमगावकडे परतत असताना आमगाव-माळेगाव मार्गावर दबा धरून बसलेल्या अस्वलाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.



घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने डोळे यांना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

बोर व्याघ्र प्रकल्पालगतच्या परिसरात वन्यप्राण्यांचा वावर सातत्याने जाणवत आहे. काही दिवसांपूर्वी सालई कला परिसरात वाघाने पाळीव जनावरांवर हल्ला केल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता अस्वलाने थेट गुराख्यावर हल्ला केल्याने शेतकरी आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या भागात नागरिकांना सतर्क करण्याबरोबरच वनविभागाने परिसराची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. जखमी रमेश डोळे यांना शासन नियमानुसार मदत मिळावी, अशीही मागणी होत आहे.

## पुलावरून कार कोसळली पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**हिंगणघाट जनमाध्यम :** झुनका परिसरात धरणाच्या पुलावरून कार पाण्यात कोसळून झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. ही घटना ९ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ११ वाजता घडली. नयन अनिल वरघणे (वय २६, रा. फुकटा) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फुकटा येथील हर्षल सुनील वरघणे (२५), नयन अनिल वरघणे (२६) आणि त्यांचा मित्र पवन हे तिघे कामानिमित्त हिंगणघाट येथे गेले होते. काम आटोपून तिघेही एमएच ३२ सी ९२६० क्रमांकाच्या कारने गावाकडे परतत होते.

झुनका परिसरातील वळण मार्गावर कार आली असता चालक नयन याचा वाहनावरील ताबा सुटला. त्यानंतर भरधाव कार धरणाच्या पुलावरून थेट खाली पाण्यात कोसळली. कारसह पाण्यात बुडाल्याने नयनचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर हर्षल आणि पवन यांनी कसाबसा कारमधून बाहेर पडत आपला जीव वाचविला. या दोघांनाही दुखापत झाली आहे. रात्रीची वेळ असल्याने अपघातानंतर तातडीने मदत मिळण्यात अडचणी आल्या. घटनेची माहिती मिळताच गिरड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पाण्यात बुडालेली कार बाहेर काढण्यात आली. या प्रकरणी गिरड पोलिसांनी नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

## कौटुंबिक वादाचा करुण अंत; वृद्ध दाम्पत्याने गिळले किटकनाशक

### पत्नीचा मृत्यू; पतीची प्रकृती चिंताजनक

**वर्धा जनमाध्यम :** कौटुंबिक वादातून वृद्ध दाम्पत्याने किटकनाशक प्राशन केल्याची धक्कादायक घटना आर्वी तालुक्यातील पिंपळगाव (भोसले) येथे घडली. या घटनेत सावित्री दुलीचंद धुर्वे (७०) यांचा मृत्यू झाला असून त्यांचे पती दुलीचंद धुर्वे (७५) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते.

सावित्री आणि दुलीचंद धुर्वे हे पिंपळगाव (भोसले) परिसरातील शेतात असलेल्या झोपडीत राहत होते. रविवारी रात्री दोघांमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. त्यानंतर दुलीचंद हे शेतातील मचानावर जाऊन झोपले.

सोमवारी (ता. १०) सकाळी दुलीचंद झोपडीत परतले असता त्यांना पत्नी सावित्री मृतावस्थेत आढळून आली. त्यांच्या जवळ एक ग्लास आढळला असून त्यामध्ये किटकनाशक असल्याचे निदर्शनास आले. पत्नीच्या मृत्यूचा धक्का बसल्यानंतर दुलीचंद यांनीही किटकनाशक प्राशन केले.

हा प्रकार लक्षात येताच ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणीनंतर सावित्री यांना मृत घोषित केले. दुलीचंद यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच खरांगणा पोलिसांनी नोंद घेतली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## बोरखेडी स्थानकावर नॉन-इंटरलॉकिंग; नागपूर-वर्धा मेमूला दोन दिवस ब्रेक

### रेल्वे मार्गाची क्षमता वाढविण्यासाठी तांत्रिक कामे; प्रवाशांची गैरसोय

**वर्धा जनमाध्यम :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे बोरखेडी स्थानकावर प्री-नॉन-इंटरलॉकिंग आणि नॉन-इंटरलॉकिंगची कामे हाती घेण्यात येणार आहेत. रेल्वे मार्गाची क्षमता वाढविणे तसेच भविष्यातील रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत करण्याच्या उद्देशाने ही कामे करण्यात येत आहेत. या कामाचा परिणाम रेल्वे वाहतुकीवर होणार असल्याने नागपूर-वर्धा मार्गावरील दोन मेमू गाड्या तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या आहेत.

बोरखेडी स्थानकावर तिसऱ्या मुख्य मार्गासाठी लूप लाईन कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

त्यासाठी विद्यमान जुने पॉइंट्स आणि क्रॉसओव्हर्स हटवून त्यांच्या जागी नवीन पॉइंट्स बसविण्यात येणार आहेत. याशिवाय अप लूप लाईनची क्षमता वाढविण्याचे कामही करण्यात येणार आहे.



रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ६११०९ वर्धा-नागपूर मेमू शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी रद्द राहणार आहे. तर गाडी क्रमांक ६१११० नागपूर-वर्धा मेमू शनिवार, २९ ऑगस्ट रोजी धावणार नाही.

नागपूर-वर्धा मार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी तसेच अन्य प्रवाशांसाठी मेमू सेवा महत्त्वाची आहे. दोन दिवस मेमू सेवा रद्द राहणार असल्याने प्रवाशांना पर्यायी रेल्वे किंवा अन्य वाहतूक व्यवस्थेचा आधार घ्यावा लागणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना रेल्वेच्या बदललेल्या वेळापत्रकाची माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, बोरखेडी स्थानकावरील प्रस्तावित कामे पूर्ण झाल्यानंतर रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढण्यास मदत होणार असून, भविष्यातील वाढत्या वाहतुकीच्या दृष्टीने या कामाला महत्त्व असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## पालिकेचा जेसीबी गरजला; अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त

### नोटीसनंतरही दाद न दिल्याने नगररचना विभागाचा थेट ॲक्शन

#### राष्ट्रभाषा मार्गावर धडक कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** बांधकाम नियमांची ऐशीतैशी करून उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाला अखेर पालिकेच्या जेसीबीने उत्तर दिले. राष्ट्रभाषा मार्ग परिसरातील गणेश मंदिराजवळील अनधिकृत बांधकामावर नगरपालिकेच्या नगररचना विभाग आणि अतिक्रमण हटाव पथकाने सोमवारी धडक कारवाई करीत बांधकाम जमीनदोस्त केले.

राष्ट्रभाषा मार्ग परिसरात बांधकाम नियमांना बगल देऊन पक्के बांधकाम सुरू असल्याची तक्रार नगरपालिका प्रशासनाकडे प्राप्त झाली होती. त्यानंतर नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित बांधकाम मालकास नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, हनुमंत महाकाळकर नामक संबंधित व्यक्तीने पालिकेच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने प्रशासनाने अखेर कठोर पाऊल उचलले.



१० ऑगस्ट रोजी नगररचना विभागाच्या प्रमुख भाग्यश्री बोरकर, अतिक्रमण हटाव पथकाचे निखील लोहवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धडक दिली. जेसीबीच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली.

दरम्यान, शहरात ठिकठिकाणी बांधकाम नियमांची पायमल्ली होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे एका-दोन कारवायांवर न थांबता शहरभर मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नियम मोडणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

## महामार्गाच्या नावाने चिखलयात्रा; संतप्त जनता रस्त्यावर

### खोदून ठेवलेल्या महामार्गामुळे चिखलाचे साम्राज्य

**वायगाव (नि) जनमाध्यम :** दहेगाव ते कात्री या राज्य महामार्गाच्या तब्बल २६६ कोटी रुपयांच्या कामाला लागलेला विलंब अखेर नागरिकांच्या संतापाचा उद्रेक ठरला. गेल्या वर्षभरापासून रस्ता दोन्ही बाजूंनी खोदून ठेवून नागरिकांना अक्षरशः मरणयातना देणाऱ्या यंत्रणेच्या निषेधार्थ संतप्त नागरिक, युवक आणि विद्यार्थ्यांनी सोमवारी सरूळ शिवारातील यशोदा नदीजवळ तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन केले. जनक्षोभाची तीव्रता लक्षात येताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी धाव घेत रखडलेले काम तातडीने सुरू करण्याचे आश्वासन दिले.



दहेगाव ते कात्री मार्ग वर्षभरापासून अर्धवट अवस्थेत असल्याने नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनधारक त्रस्त झाले आहेत. पावसाळ्यात या मार्गाची अवस्था आणखी बिकट झाली असून सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. वाहने घसरून अपघात होत असतानाच शाळेच्या बसेसही बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

#### शाळा बसेस बंद, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

या संतापाचा उद्रेक सोमवारी आंदोलनाच्या रूपाने झाला. नागरिकांनी लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. अखेर उपविभागीय अधिकारी मुत्येलवार, प्रोजेक्ट मॅनेजर सोमकुमार आणि क्वालिटी कंट्रोल अधिकारी माथूर आंदोलनस्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर रस्त्याचे काम सुरू करण्याचे आश्वासन मिळाल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.

आंदोलनात प्रवीण कात्रे, ॲड. मंगेश घुंगरूड, संदीप दिघीकर, समीर सारजे, लोमहर्ष बाळबुधे, समीर इंगोले, गजानन वड्याळकर, सुभाष इंगोले, माधव शेंडे, सुमित झोरे, गजानन ताकसांडे, किरण सरोदे आदींसह नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि युवा संघर्ष मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## पोषण आहाराच्या कामात बेरोजगार संस्थांना प्राधान्य द्या

**वर्धा जनमाध्यम :** सार्वजनिक आरोग्य विभागाने ४ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात महिला बचत गटांना आहार सेवा पुरविण्याच्या कामासाठी प्राधान्य देण्यात आले आहे. या निर्णयात सुधारणा करून सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांनाही आहार सेवा पुरविण्याच्या कामात प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत मुख्यमंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तसेच राज्य सहकार मंत्र्यांना निवेदन देण्यात आले. राज्यात २००२ पासून सुशिक्षित बेरोजगार संस्थांना काम मिळावे आणि त्यांना सक्षम करण्यासाठी विविध शासन निर्णय घेण्यात आले आहेत. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने राज्यातील आठ हजारांहून अधिक संस्था अडचणीत आल्या आहेत. वर्धा जिल्ह्यातही १५० हून अधिक बेरोजगार सेवा सहकारी संस्था असून कामाअभावी त्या बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत. २८ ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयानुसार १० लाख रुपयांपर्यंतची कामे विना निविदा बेरोजगार संस्थांना देण्याची तरतूद आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत हद्दीतील पदपथ व पायवाटांच्या जागांपैकी १० ते १५ टक्के जागा रोजगारनिर्मितीसाठी उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली. विशाल हजारे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी अजय हिवंज, चेतन चोरे, माधुरी मगर, महानंदा बनसोड, पंकज अनकर, अनिल भगत, प्रकाश वाघमारे, गुणवंत चोपडे, चंद्रशेखर घोडे, विनय डहाके, युवराज ढाले, विलास कांबळे, पंकज इंगोले, नितीन चिमोटे व अजय कांबळे उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जागतिक क्षमता केंद्रांसाठी महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचा निर्धार-मुख्यमंत्री

■ राज्यात 400 नवीन जागतिक क्षमता केंद्रे, ■ 4 लाख ऊच्च कौशल्याधारित रोजगार ■ 50 हजार कोटी रूपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी (जीसीसी) भारतातील आघाडीचे आणि सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचा राज्य शासनाचा निर्धार असून, राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे, ४ लाख ऊच्च कौशल्याधारित रोजगाराच्या संधी आणि ५० हजार कोटी रु पयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हाटेल कानराड येथे आयोजित जीसीसीप्रोज नेतृत्व शिखर परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, जीसीसीप्रोजचे मुख्य सल्लागार निलेश देशमुख, शम्मी प्रभाकर, वरिष्ठ अधिकारी तसेच विविध जागतिक क्षमता केंद्रांचे प्रमुख, उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भारतातील जागतिक क्षमता केंद्रांच्या वाटचालीची सुरु वात कुशल मनुष्यबळ, कौशल्य आणि खर्चाच्या दृष्टीने कार्यक्षमतेच्या आधारे झाली. मात्र, आता या क्षेत्राचे स्वरू प मोठ्या प्रमाणात बदलत आहे. २०३० मधील जागतिक क्षमता केंद्रे केवळ कार्यालयीन सहाय्यक कामकाजापुरती मर्यादित राहणार नाहीत. ती अभियांत्रिकी,



कृत्रिम बुद्धिमत्ता, उत्पादन विकास, सायबर सुरक्षा, वित्तीय सेवा, माहिती विश्लेषण तसेच संशोधन व विकासाची केंद्रे बनतील. या केंद्रांमधून जागतिक व्यवसायांचे महत्त्वपूर्ण निर्णयही घेतले जातील.

महाराष्ट्राकडे जीसीसीसाठी सर्वसमावेशक परिसंस्था महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात मोठी आघाडी मिळवून देणारे वैशिष्ट्य म्हणजे या केंद्रांसाठी आवश्यक असलेली सर्वसमावेशक परिसंस्था राज्यात आधीपासूनच उपलब्ध आहे. मुंबईकडे देशातील सखोल वित्तीय व व्यावसायिक परिसंस्था आहे. पुण्याकडे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन क्षेत्र, तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाचा मजबूत आधार आहे. नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यासारख्या शहरांमध्येही जागतिक क्षमतेची विशेषीकृत केंद्रे विकसित करण्याची क्षमता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात केवळ एका शहरात गुंतवणूक करण्याची संधी नसून, विविध शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रतिभा, कौशल्य आणि औद्योगिक क्षमतांचा एकत्रित लाभ घेण्याची संधी आहे. महाराष्ट्रात केवळ एक चांगले शहर नाही, तर शहरांचे, प्रतिभेचे आणि क्षमतांचे संपूर्ण जाळे उपलब्ध आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पुण्याने २०२५ मध्ये जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रातील आपली योग्यता सिद्ध केली आहे. २०२५ मध्ये पुणे भारतातील दुस-या क्रमांकाचे मोठे जागतिक क्षमता केंद्राची कार्यालयीन बाजारपेठ बनले असून, मागील वर्षाच्या तुलनेत या केंद्रांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. २०२६ च्या अखेरीस जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात पुणे देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

केवळ अधिक चांगली आर्थिक सवलत देउन महाराष्ट्राने जागतिक क्षमता केंद्रे आकर्षित करावीत, अशी शासनाची भूमिका नाही. अनुदानामुळे गुंतवणूक आकर्षित होउ शकते; मात्र दीर्घकाळ टिकणारी परिसंस्था प्रतिभावान मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, व्यवसाय सुलभता, जीवनमान, संशोधन, विद्यापीठे, दळणवळण सुविधा आणि शासन व उद्योग यांच्यातील विश्वासावर उभी राहते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्याच्या जागतिक क्षमता केंद्र धोरणामध्ये वेतनावरील अनुदान, भांडवली खर्च किंवा भाड्यासाठी सहाय्य, व्याज अनुदान, संशोधन व विकासासाठी सहाय्य तसेच अन्य आर्थिक प्रोत्साहनांचा समावेश आहे. यासोबतच उद्योगाचा दर्जा, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक क्षेत्रवापरातील लवचिकता, जमिनीची प्राधान्याने उपलब्धता, डिजिटल माहिती संग्रह, विश्वासार्ह पायाभूत सुविधा आणि चोवीस तास, सातही दिवस कार्यपद्धतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, ही सर्व साधने असून खरे उद्दिष्ट क्षमता निर्माण करणे हे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

भविष्यातील कौशल्याधारित मनुष्यबळाची निर्मिती आवश्यक

उद्योगांसमोर आज केवळ कर्मचारी उपलब्ध होण्याचा प्रश्न नाही. योग्य कौशल्य असलेले कर्मचारी उपलब्ध होतील का, हा अधिक महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेउन कुशल मनुष्यबळाची उपलब्धता साखळी निर्माण करणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगाराचे स्वरू प वेगाने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अभियंते, माहिती-विश्लेषण तज्ज्ञ, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, अर्धवाहक तंत्रज्ञान अभियंते, उत्पादन व्यवस्थापक, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान अभियंते, परिमाणात्मक वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि जीवविज्ञानविषयक तज्ज्ञ अशा विविध कौशल्यांची मागणी वाढत आहे.

## युरिया, डीएपीचे लिंकिंग करणा-यावर गुन्हे दाखल करा -कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल

**मुंबई/प्रतिनिधी :** खरीप व रब्बी हंगामात शेतक-यांना दर्जेदार व उत्कृष्ट गुणवत्तेच्या कृषी निविष्ठा प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. राज्यात कृषी निविष्ठांच्या लिंकिंगला मनाई आहे, मात्र अनेक ठिकाणी युरिया, डीएपी, रासायनिक खतांचे सक्तीने लिंकिंग केले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. लिंकिंग करणा-यांवर थेट गुन्हे दाखल करावेत, अशा सूचना कृषी, वित्त, नियोजन, मदत व पुनर्वसन, कामगार, विधि व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिल्या.

मंत्रालयातील दालनात आयोजित नागपूर जिल्ह्यातील युरिया, डीएपी खतांसोबत रासायनिक खतांच्या सक्तीने लिंकिंग विक्रीबाबत बैठकीत राज्यमंत्री जयस्वाल बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे उपसचिव संतोष कराड, निविष्ठा व गुणनियंत्रणचे संचालक सुनील बोरकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे कृषी आयुक्त सूरज मांढरे, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कृषी अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, खरीप व रब्बी हंगामात शेतक-यांना कृषी निविष्ठा प्राप्त होण्याच्या दृष्टीने नागपूर विभागात १३३ गुणनियंत्रण निरीक्षक तर ६० तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. खत खरेदी करताना लिंकिंगचा प्रकार आढळल्यास शेतक-यांनी कृषी विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ४००० किंवा ९८२२४४६६५५ वर संपर्क साधावा. शिवाय वितरक कंपनी, विक्रेते, उत्पादक यांच्यात लिंकिंगबाबत मिलीभगत असल्याचे आढळून असल्यास कृषी विभागाने कारवाई करावी. युरिया, खते, बियाणे याचे वितरण कृषी अधिका-यांनी सुरळित करावे. कृषी निविष्ठांची मागणी शेतकरी पोर्टलवर सध्या ऑनलाईन सुरू आहे, मात्र ही प्रक्रिया ऑफलाईनही सुरू ठेवावी. जेणेकरू न शेतक-यांना विनाअडथळा थेट खते मिळण्यास सोईचे जाईल, यापध्दतीने नियोजन करावे.

नागपूर जिल्ह्यातील शेतक-यांच्या तक्रारी असल्याने अधिका-यांना जबाबदारी ठरवून द्या, धाडपथके निश्चित करा. शेतक-यांना राज्यस्तरावर तक्रारी करण्यासाठी सोय उपलब्ध करू न द्या. याबाबत १५ ऑगस्टपर्यंत प्रभावी अंमलबजावणी करू न ग्रामसभेत याबाबत वाचन करावे, अशा सूचनाही राज्यमंत्री जयस्वाल यांनी दिल्या. झटका मशिनबाबत योग्य लाभार्थी निवड करावी. वन्य प्राणी असलेल्या भागातील शेतक-यांना नुकसानभरपाई द्यावी. झटका मशिन वाटपमध्ये गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

**युरिया, खते आणि लिंकिंगबाबत नागपूर विभाग सज्ज**

नागपूर विभाग पातळीवर एक तर जिल्हा पातळीवर सहा अशी एकूण सात भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. नागपूर विभागात १० जून २०२६ अखेर नागपूर जिल्ह्यात १३३५, वर्धा १३२०, भंडारा ६७०, गोंदिया १०१३, चंद्रपूर १०४४ व गडचिरोली ७०९ असे एकूण ६१९१ खत विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली आहे.

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारींच्या चौकशीसाठी समिती

एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रकल्पग्रस्त कर्मचा-यांच्या भरती व सेवाविषयक विविध तक्रारींची सखोल चौकशी करून त्यावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.या समितीने प्रकल्पग्रस्तांच्या सर्व तक्रारी तसेच संबंधित उच्च न्यायालयाच्या निकालाचा अभ्यास करून एका महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. मंत्रालयात डा पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रकल्पग्रस्तांच्या विविध तक्रारींचे निवारण तसेच विद्यापीठातील भरती प्रक्रियेत प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे प्रमाणपत्र वैध ठरविण्याबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार रणधीर सावरकर, सहसचिव संजय इंगळे तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागीय आयुक्त, अमरावती, जिल्हाधिकारी, अकोला आणि डा. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या चौकशी समितीत विभागीय आयुक्त, अमरावती, जिल्हाधिकारी, ४५१ जणांना नोकरी मिळाली असून २० जागा शिल्लक असल्याचेही न्यायालयात सांगण्यात आले आहे.



अकोला, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, विद्यापीठाचे कुलसचिव तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रकल्पग्रस्तांच्या सेवाज्येष्ठता, प्रमाणपत्रांची पडताळणी, पात्र उमेदवारांच्या याद्यांमधील त्रु टी तसेच भरती प्रक्रियेसंदर्भातील इतर बाबींची समितीमार्फत तपासणी करण्यात येणार आहे. संबंधित न्यायालयीन प्रकरणात ९४२ बाधित कुटुंबांपैकी ५० टक्के म्हणजेच ४७१ कुटुंबे नियमानुसार नोकरीस पात्र असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. त्यापैकी प्रकल्पग्रस्तांनी सेवाज्येष्ठता, दाखल्यांची वैधता व पडताळणी, पात्र उमेदवारांच्या याद्यांमधील त्रु टी आणि भरती प्रक्रियेबाबत विविध मागण्या व तक्रारी बैठकीत मांडल्या. या सर्व बाबींची वस्तुनिष्ठपणे तपासणी करून समितीने आपला अहवाल सादर करावा आणि त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करून पात्र उमेदवारांना न्याय देण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने कार्यवाही करावी, असेही मंत्री जाधव-पाटील यांनी स्पष्ट केले.

## ‘एसटी’च्या जागांवर उभ्या राहणा-या स्थानकांच्या इमारती ‘आयकॉनिक’ असाव्यात-एकनाथ शिंदे

### १४७ बसस्थानकांच्या पुनर्विकासातून एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या जागांचा सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून विकास करताना त्या ठिकाणी उभारण्यात येणारी नवीन बसस्थानके आणि इतर वास्तू केवळ आधुनिक सुविधांनी युक्त न राहता आयकानिक आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणा-या असाव्यात तसेच नागरिकांना सुविधा देखील मिळाव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. एसटीच्या जागा पीपीपी तत्त्वावर विकसित करण्यासंदर्भात सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सविस्तर आढावा घेतला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यावेळी उपस्थित होते. प्रवाशांना अत्याधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा देतानाच एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या मालमत्तांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करावा, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.यावेळी एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांनी सादरीकरण केले.

एसटी महामंडळ दररोज सुमारे ५५ लाख प्रवाशांची वाहतूक करते. महामंडळाच्या ताफ्यात १५,५०० हून अधिक बसेस असून राज्यभर बसस्थानके आणि आगारांचे मोठे जाळे आहे. मात्र, अनेक बसस्थानकांच्या इमारती ४० वर्षांहून अधिक जुन्या असून कालबाह्य पायाभूत सुविधांमुळे प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करू न देण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र एसटी महामंडळ २.० अंतर्गत आधुनिक, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित बसस्थानकांच्या विकासावर भर देण्यात येत आहे असेउपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**१४७ प्रकल्पांचा पहिल्या टप्प्यात विकास-** पहिल्या टप्प्यात १४७ बसस्थानके व एसटीच्या जागांचा



पीपीपी तत्त्वावर विकास करण्यात येईल. या माध्यमातून आधुनिक बस पोर्ट, प्रवासी सुविधा, कार्यालये, हास्पिटल, चित्रपटगृहे, नागरिक सेवा केंद्रे आदी सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. तसेच सौर उर्जा, इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा आणि एसटीच्या इलेक्ट्रिक बसेससाठी स्वतंत्र चार्जिंग व्यवस्था उभारण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना सुविधा मिळण्याबरोबरच उर्जा खर्च आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे.

**जमिनीची मालकी एसटीकडेच कायम-** या माडेलमध्ये एसटी महामंडळाच्या जमिनीची मालकी महामंडळाकडेच कायम राहणार असून जमीन कायमस्वरूपी हस्तांतरित केली जाणार नाही. विकासाचा १०० टक्के खर्च विकासकाकडून केला जाणार असल्याने शासन किंवा महामंडळावर बांधकामाचा आर्थिक भार येणार नाही असे यावेळी सांगण्यात आले. विकासकाकडून आगाउ प्रीमियम आणि नियमित वार्षिक भाडे महामंडळाला मिळणार आहे. पीपीपी प्रक्रियेत पारदर्शक ई-निविदा, एस्क्रो खात्याद्वारे निधी नियंत्रण, सुरक्षा अनामत आणि पाच वर्षांचा दोष दायित्व कालावधी ठेवण्यात आला आहे.

**आधुनिक बस पोर्ट-**महाराष्ट्रातील एसटी बसस्थानकांच्या पुनर्विकासासाठी गुजरातमधील अहमदाबाद आणि वडोदरा येथील आधुनिक बस पोर्टचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच कर्नाटकातील केएसआरटीसी च्या प्रीमियम बस सेवा, ई-तिकीट, ऑनलाइन आरक्षण, प्रवासी सुविधा, कर्मचारी प्रोत्साहन आणि व्यवस्थापन पद्धतींचाही अभ्यास करण्यात आला आहे. १४७ प्रकल्पांच्या माध्यमातून एसटी महामंडळाला व्यावसायिक क्षेत्रातील हिस्सा मिळण्याची शक्यता आहे. यातून एसटी महामंडळासाठी शाश्वत महसूलाचा स्रोत निर्माण करू न त्याचा वापर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आणि भविष्यातील नवीन उपक्रमांसाठी करण्याचा प्रयत्न आहे. परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासामुळे एसटीच्या जमिनींच्या मूल्यवृद्धीलाही चालना मिळणार आहे.

## तब्बल 27 वर्षानंतर सूर्यग्रहणामुळे भरदिवसा रात्र होणार

**नवी दिल्ली/ मुंबई** : १२ ऑगस्ट रोजी वर्षातील दुसरे आणि शेवटचे सूर्यग्रहण होणार आहे. हे सूर्यग्रहण अनेक अर्थांनी खास असणार आहे. कारण जगातील काही भागांमध्ये दिवसा आकाशात अंधार पसरलेला पाहायला मिळू शकतो आणि एक अद्भुत खगोलीय नजारा अनुभवता येणार आहे. मात्र, १२ ऑगस्टचे सूर्यग्रहण भारतातून दिसणार नाही. वर्ष २०२६ मधील दुसरे आणि शेवटचे सूर्यग्रहण होणार आहे. हे सूर्यग्रहण अनेक कारणांमुळे विशेष ठरणार आहे. असे सूर्यग्रहण पाहण्याची संधी तब्बल काही दशकांनंतर मिळत असल्याचे सांगितले जात आहे. हे ग्रहण पाहण्याची संधी हुकली, तर अशाच प्रकारच्या पुढील सूर्यग्रहणासाठी ६४ वर्षांपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते. वैज्ञानिकांच्या मते, काही भागांमध्ये ग्रहणाच्या वेळी असे वातावरण निर्माण होईल की, दिवसा अचानक रात्र झाल्यासारखे वाटेल. १२ ऑगस्ट रोजी लागणारे हे सूर्यग्रहण खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. जसजसा चंद्र सूर्याच्या समोर येईल, तसतसा सूर्याचा मोठा भाग चंद्राच्या सावलीत झाकला जाईल. ग्रहण कळसाच्या जवळ पोहोचल्यावर आकाशातील प्रकाश मोठ्या प्रमाणात कमी होईल. चंद्र सूर्याचा सुमारे ९० टक्के भाग झाकेल. चंद्र सूर्याला झाकत जाईल, तसतसा प्रकाश कमी होत जाईल आणि काही काळासाठी अक्षरशः रात्र झाल्यासारखे दृश्य दिसेल.




## 7 सर्वात महत्त्वाचे निर्णय

### मुद्रांक शुल्क माफ, सरकारचे मोठे पाउल !

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमडंळाची महत्त्वाची बैठक आज पार पडली. या बैठकीत मंत्री, अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे होते. दरम्यान, या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. सोबतच राज्याच्या विकासाला केंद्रस्थानी ठेवून मंत्रिमंडळाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

**महसूल विभाग-** भूसंपादनाचा मोबदला विलंबाने अदा झाल्यास, देण्यात येणा-या व्याज दरांत सुधारणा. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ७२ मध्ये सुधारणा करण्यात येणार. नवीकरणीय उर्जा प्रकल्पांसाठी स्थापन करण्यात येणा-या कंपन्यांचा समूह किंवा विशेष वहन यंत्रणा (Special Purpose Vehicles (SPVs) कंपन्यांमधील अंतर्गत जमीन हस्तांतरणाच्या व्यवहारांवरील मुद्रांक शुल्कात माफ करण्याचा निर्ण?.

**कृषि विभाग-** राज्याच्या कृषि विभागात कृषि संचालक, सहसंचालकांसह चार पदांच्या निर्मितीस मान्यता. कृषि विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांच्या सुधारित आकृतीबंधानुसार पदांना मान्यता. कृषि संचालक (कृषी अभियांत्रिकी, मालमत्ता व्यवस्थापन व ॲग्रीस्टॅक), कृषि सह संचालक (सांख्यिकी), कृषि सह संचालक (माहिती व तंत्रज्ञान) ही प्रतिनियुक्तीची २ पदे. अपर संचालक, ॲग्रीस्टॅक (महसूल) अशा पदांना मान्यता.

**सहकार व पणन विभाग-** लातूर जिल्ह्यातील किल्लारी (ता. औसा) येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून भांडवली खर्च व खेळत्या भांडवलासाठी कर्ज घेण्यास मंजुरी. कारखान्याचा १८ कोटी नउ हजार रु पयांच्या कर्जाचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकार विकास निगम पाठविण्यात येणार.

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग-**स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याच्या नियमांमध्ये बदल. मार्गदर्शक सुचनांमध्ये सुधारणा करण्यास मान्यता.

**उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग-** वरीष्ठ महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा, नवीन अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी सुरु करता येणार. तसेच समाजकार्य महाविद्यालयांमध्येही कायम विनाअनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी सुरू करता येणार.

**विधि व न्याय विभाग-** नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व सरकारी वकील कार्यालय होणार. यासाठी आवश्यक न्यायीक अधिकारी व कर्मचारीवृंद यांच्या पदांना तसेच खर्चाच्या तरतुदीस मान्यता.

## भूकंपाचे आतापर्यंत 200 बळी

**बोगोटा :** दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात सोमवारी रात्री आलेल्या ७.४ तीव्रतेच्या भूकंपात आतापर्यंत २०० जणांचा मृत्यू झाला असून ८०० जण जखमी झाल्याची माहिती आहे.अधिका-यांच्या मते, देशभरात ८६ इमारती कोसळल्या, तर १,५०० हून अधिक घरांचे नुकसान झाले आहे. १८ आरोग्य केंद्रे आणि ५२ शाळांनाही नुकसान झाले आहे.



याशिवाय ७ विमानतळांवरील काम थांबवण्यात आले आहे.पाच शहरांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. राष्ट्रपतींनी आपत्कालीन समितीची बैठक बोलावून मदत आणि बचाव कार्यावर लक्ष ठेवण्यास सुरु वात केली आहे. एकट्या पेरेरा शहरात १०० जणांचा मृत्यू झाला आहे. सुमारे ५ लाख लोकसंख्या असलेले हे शहर भूकंपाच्या केंद्रापासून ६४ किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर आहे. राजधानी बोगोटासह अनेक शहरांमध्येही तीव्र धक्के जाणवले. खबरदारी म्हणून लोक इमारतींमधून बाहेर पडून रस्त्यावर आले. अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षणनुसार, भूकंप सोमवारी सकाळी ७:३४ वाजता आला. याचे केंद्र चोको परिसरात सॅन जोसे डेल पालमारजवळ होते. भूकंपाची खोली १०७ किलोमीटर होती.

महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त कार्यालय
अमरावती विभाग, अमरावती

जाहीर नोटीस

[illegible]

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.मिंगाळवेल, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
यांचे न्यायालयात

जाहीरनामा/समन्स

गैरअर्जदार :- Nil

[illegible]

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर (CJJD) नांदगाव खंडेश्वर यांचे
न्यायालयामधील

गोपाल व इतर विरुध्द निरंक

१. गोपाल श्रीराम खडाळे,
२. मदन श्रीराम खडाळे,
३. प्रकाश श्रीराम खडाळे,
४. सौ अरूणा राजेश गोयल,

[illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

MAHAVITARAN
E-Tender Notice
The Executive Engineer, Morshi Division, on behalf of MSEDCL invites tender through E-tendering for
1) Annual Contract for Quarterly meter reading at Ag consumer premises through MSEDCL's Updated Mobile App & bill distribution (with mobile compatible to handle latest/Updated version of MSEDCL's Mobile App) and reading through HHU with all allied works of LT consumers (Ag.) under various Subdivision under Morshi Division.Tender No.EE/MOR/2026-27/T-04. The tender document will be available on web site from 08.08.2026 to 14.08.2026 the last date of submission of tender is 07.07.2026 up to 18.00 Hrs. please visit our web site http://works.mahadiscom.in/eTender/etender
2) Tender for the work towards laying of 3 Nos of 33kV Line Way leave/ Track Crossing works at three location under Morshi Division. Tender No EE/MOR/2026-27/T-03. The tender document will be available on web site from 12.08.2026 to 20.08.2026 the last date of submission of tender is 20.08.2026 up to 18.00 Hrs. please visit our web site http://works.mahadiscom.in/eTender/etender
PRO NO 168 Executive Engineer, O&M Dn. MSEDCL Morshi

Sipna Shikshan Prasarak Mandal's, Amravati
Sipna College of Engineering & Technology, Amravati
Sipna Campus, In front of Nemani Godown, Badnera Road, Amravati-444701.Ph-0721-2522341, Website: www.sipnaengg.ac.in
ADMISSION NOTICE FOR DIRECT SECOND YEAR (LATERAL ENTRY) OF FULL TIME POST GRADUATE DEGREE COURSE IN MANAGEMENT (MBA) FOR THE ACADEMIC YEAR 2026 - 27
Applications are invited from eligible candidates for the admission to Direct Second Year of Full Time Post Graduate Degree Course in Management (MBA/MMS) for academic Year 2026-27.

| Activity | Schedule |
|---|---|
| Issue of applications to eligible registered candidates and submission | 12-08-2026 upto 5.00 PM |
| Display of Provisional Merit List | 13-08-2026 at 11.00 AM |
| Submission of Grievances, if any | 13-08-2026 upto 03.00 PM |
| Display of Final Merit List | 13-08-2026 at 05.00 PM |
| Reporting and Confirmation of Admission | 14-08-2026 upto 05.00 PM |

Eligibility for Admission: The candidate, - (i) should be a citizen of India; (ii) should have passed B. E. or B. Tech or BBA or BMS (4 Years); (iii) Any other eligibility criteria and requirement declared from time to time by the appropriate authority as defined under the Act For Further Information visit: https://mbale2026.mahacet.org.in/mbale_26/home.
Principal
College of Engineering & Technology, Amravati

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# एकाधिकारशाहीची वाटचाल

**आधुनिक जागतिक इतिहास लिहिला जाईल तेव्हा अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा उल्लेख जागतिक राजकारणातला धरसोड करणारा राष्ट्राध्यक्ष म्हणून केलेला असेल.दीड वर्षामध्ये त्यांनी जितके निर्णय घेतले आणि फिरवले ते पाहता ही नोंद अतिशयोक्त नसेल. इराण युद्धात या धरसोडीचा कळस पाहायला मिळाला असला,तरी टॅरिफ धोरणावरील कोलांटउड्यांनी याची चुणूक दाखवली होती.रशियाकडून स्वस्त दरात तेल आयात करून आर्थिक तूट बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आणणाऱ्या भारतावर मागील काळात ट्रम्प महाशयांनी अतिरिक्त टॅरिफची कुऱ्हाड चालवली.कालौघात ती मागे घेतली,तरी आता पुन्हा त्यांनी हेच अस्त्र चालवण्याचे ठरवले आहे. अमेरिकन सिनेटमध्ये यासंदर्भातील विधेयकाला मंजुरी मिळाली आहे. इराण युद्ध सुरू झाल्यानंतर जागतिक तेल बाजारातील समतोल राखण्यासाठी याच ट्रम्प यांनी भारतासह सर्वच राष्ट्रांना रशियाकडून तेल खरेदीचे आवाहन केले होते.आता विधेयकामध्ये रशियाकडून मोठ्या प्रमाणावर खनिज तेल किंवा नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या देशांच्या अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा अधिकार ट्रम्प यांना देण्याची तरतूद आहे. ८६ विरुद्ध ११ अशा प्रचंड बहुमताने सिनेटने ते मंजूर केले. प्रतिनिधिगृहाची मंजुरी, त्यानंतर राष्ट्राध्यक्षांची स्वाक्षरी; मग प्रत्यक्ष अंमलबजावणी या प्रक्रिया यथावकाश पार पडतील, असे दिसते. यामागे व्यापारापेक्षा मोठे भू-राजकीय गणित आहे. अमेरिकेला रशियाच्या अर्थव्यवस्थेतील तेलाच्या पैशांचा प्रवाह रोखायचा आहे. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांपासून वरिष्ठ राजकीय व लष्करी अधिकाऱ्यांपर्यंत, वित्तीय संस्थांपासून ऊर्जा प्रकल्पांपर्यंत अनेकांवर निर्बंध लादण्याची तरतूदही या विधेयकात आहे. जुन्या किंवा नाव बदललेल्या तेलवाहू जहाजांच्या माध्यमातून निर्बंध चुकविण्याच्या प्रयत्नांना लक्ष्य करण्याचा प्रस्तावही त्यामध्ये आहे. २०२२ मध्ये युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिकेने निर्बंध आणल्याने युरोपीय देशांनी रशियन तेलापासून अंतर राखले. रशियाच्या अर्थव्यवस्थेला याचा मोठा धक्का बसला. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी भारत व चीन या आशियातील सर्वात आघाडीच्या तेल आयातदार देशांना सवलतीच्या दरात कच्चे तेल देण्याचा प्रस्ताव मांडला. भारत-रशिया पारंपरिक मित्र असल्याने मोदी सरकारने प्रस्ताव स्वीकारला. यामागे राष्ट्रीय हित आणि आर्थिक धोरणातील स्वायत्तता कायम राखणे ही दोन्ही उद्दिष्टे होती. २०२३-२४ या एका वर्षात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतीतील तफावत आणि सवलतीमुळे भारताने सुमारे २५ अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनात अंदाजे १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची परकीय चलनाची बचत केली. एकूण संघर्ष काळातील ही बचत १७ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे.या तेलामुळे भारतीय शुद्धीकरण कंपन्यांचा खर्च कमी झाला. देशाला तेलाचा पुरवठा सातत्याने मिळाला आणि देशांतर्गत इंधन व्यवस्थेवरील दबाव कमी झाला. भारताची भूमिका स्पष्ट होती, ती म्हणजे इंधन खरेदीचा निर्णय कोणत्याही एका महासत्तेच्या राजकीय अपेक्षांनुसार ठरविला जाणार नाही. युरोपियन माध्यमांनी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना मागील काळात यावरून घेरले असता त्यांनी युक्रेन युद्ध हा युरोपचा प्रश्न असून, भारताशी त्याचा संबंध नाही, असे ठणकावत राष्ट्र हित सर्वतोपरी असल्याचे स्पष्ट मत मांडले होते.जून २०२६ या महिन्यात भारताने रशियाकडून दररोज सुमारे २.६४ दशलक्ष बॅरल कच्चे तेल आयात केले. मेच्या तुलनेत ही वाढ ३७.४ टक्के अधिक होती. म्हणजे अमेरिकेच्या दबावानंतरही भारताने रशियन तेलाची खरेदी कमी केली नाही; उलट ती वाढवली.यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे,पश्चिम आशियातील संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाज वाहतुकीवर झालेला परिणाम.युद्धामुळे आखाती देशांच्या तेलपुरवठ्याबाबत अनिश्चितता वाढली.अशावेळी रशियन तेल भारतासाठी स्वस्त पर्यायाबरोबरच ऊर्जा सुरक्षेसाठीचा आधार ठरला.रशियन तेलामुळे अमेरिकन टॅरिफचा फारसा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला नाही. ट्रम्प यांना खरी पोटदुखी आहे ती याचीच. त्यांचा दुसरा कार्यकाळ पाहिल्यास जमेल त्या पद्धतीने भारताची कोंडी करण्याची मालिकाच सुरू आहे.अतिरिक्त १०० टक्के शुल्कामुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय मालाच्या किमती दुप्पट होऊन भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसेल. अभियांत्रिकी वस्तू, औषधनिर्मिती, रसायने, वस्त्रोद्योग आणि वाहनांचे सुटे भाग यासारख्या क्षेत्रांना याची झळ अधिक जाणवेल.२०२५ मध्ये भारताची अमेरिकेला असणारी निर्यात ९२.३ अब्ज डॉलर्स होती.किमती वाढल्यास अमेरिकन आयातदार भारताऐवजी अन्य देशांकडून माल घेतील. अशावेळी भारतीय कंपन्यांसमोर दोनच पर्याय उरतील, एक म्हणजे अमेरिकेतील व्यवसायावर पाणी सोडणे किंवा अतिरिक्त शुल्काचा काही भाग स्वतःच्या नफ्यातून भरून काढणे.दोन्ही पर्याय भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सुखावह नाहीत. कारण, काही भारतीय उत्पादनांवर २४ जुलैपासून १० टक्के अतिरिक्त शुल्क लागू आहे.आता १०० टक्के शुल्क आकारल्यास भारताच्या निर्यातवाढीच्या आकांक्षांपुढे प्रश्नचिन्ह उभे राहील. तेल कंपन्यांनी रशियन कच्च्या तेलाभोवती लॉजिस्टिक्स, पेमेंट यंत्रणा आणि शुद्धीकरण क्षमता उभी केली आहे. ही रचना रात्रीत मोडून काढणे शक्य नाही. हे अमेरिकेला ठाऊक आहे; पण भारतासोबत व्यापार करारामध्ये दबाव निर्माण करण्यासाठी टॅरिफचा वापर केला जात आहे. यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणातील निर्णय स्वातंत्र्यापुढे आणि अर्थकारणापुढे मोठा पेच निर्माण झाला आहे. अमेरिका भारतासाठी महत्त्वाची निर्यात बाजारपेठ आहे, तर रशिया महत्त्वाचा ऊर्जास्रोत आहे.ही कोंडी फोडण्यासाठी मोदी सरकारने बहुपर्यायी रचना स्वीकारण्याकडे भर देणे गरजेचे आहे. रशियन तेल स्वस्त असले, तरी उद्या हा पुरवठा थांबल्यास भारताची अर्थव्यवस्था डळमळू नये,अशी व्यवस्था आजच उभी केली पाहिजे.तशाच प्रकारे अमेरिकेने व्यापार धोरण बदलल्याने भारताची निर्यात आक्रसून कोसळता कामा नये,यासाठी युरोप, आफ्रिका, आशिया,पश्चिम आशिया आणि लॅटिन अमेरिका या बाजारपेठांमध्ये भारताची उपस्थिती वाढली पाहिजे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, विद्युत वाहने, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा कार्यक्षमता या विषयांकडे भारताने पर्यावरणीय बांधिलकी म्हणून पाहणे पुरेसे नाही. त्या आता राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत.परकीय तेलावर अवलंबून राहणाऱ्या अर्थव्यवस्थेचे राजकीय स्वातंत्र्य मर्यादित असते, हा अमेरिकेच्या निर्णयांनी आणि होर्मुझ संकटाने शिकवलेला धडा आहे. तेलाची किंमत वाढली की, महागाई वाढते; पुरवठा खंडित झाला की, उद्योग अडखळतात. अमेरिकेच्या विधेयकात राष्ट्राध्यक्षांना राष्ट्रीय हिताच्या आधारावर शुल्कमाफी देण्याचाही अधिकार आहे; पण ट्रम्प भारतासाठी या अधिकाराचा वापर करण्याची शक्यता कमीच आहे. जागतिकीकरणात व्यापार आणि राजकारण भिन्न ठेवण्याची जी कल्पना होती, ती मागे पडत आहे; पण ट्रम्प यासारख्या एकाधिकारशाही नेत्यापुढे जगाने हात टेकले आहेत. जगाला आपल्या तालावर नाचवणे, हाच त्यांचा 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'चा अर्थ असावा, असे यावरून दिसते.**

# गुंतवणुकीबाबत सुधारणांचे आव्हान



**नीती आयोगाने प्रसिद्ध केलेला २०२६चा पहिला गुंतवणूक अनुपूलता निर्देशांक हा राज्यांच्या आर्थिक क्षमतेचे वास्तव प्रतिबिंबित करणारा आहे. या निर्देशांकात गुजरात, महाराष्ट्र आणि तामीळनाडू या राज्यांनी अनुक्रमे पहिली तीन स्थाने मिळविली आहेत. मात्र, सर्वोच्च स्थानावर असलेल्या गुजरातलाही शंभरपैकी केवळ ५६.६ गुण मिळाले आहेत. महाराष्ट्र आणि तामीळनाडू यांचे गुण त्याहून कमी आहेत. म्हणजेच भारतातील सर्वाधिक सक्षम मानल्या जाणाऱ्या राज्यांनाही उद्योगस्नेही वातावरण उभारण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.**

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्रांच्या श्रेणीत पोहोचविण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण उच्च आर्थिक विकास दर, मोठ्या प्रमाणावर भांडवली निर्मिती आणि उद्योगांना पोषक वातावरण ही त्रिसूत्री अत्यावश्यक ठरणार आहे. या प्रक्रियेत केंद्र सरकारची भूमिका महत्त्वाची असली तरी प्रत्यक्ष गुंतवणूक आकर्षित करण्याची खरी स्पर्धा राज्यांमध्येच सुरू आहे. उद्योग कोणत्या राज्यात कारखाना उभारणार, सेवा क्षेत्रात विस्तार करणार किंवा परकीय भांडवल कुठे आणणार, याचा निर्णय मोठ्या प्रमाणावर त्या राज्यातील प्रशासन, पायाभूत सुविधा, धोरणांची स्थिरता आणि व्यवसाय सुलभतेवर अवलंबून असतो. त्यामुळे नीती आयोगाने प्रसिद्ध केलेला २०२६ चा पहिला गुंतवणूक अनुकूलता निर्देशांक हा राज्यांच्या आर्थिक क्षमतेचे वास्तव प्रतिबिंबित करणारा आहे.

या निर्देशांकात गुजरात, महाराष्ट्र आणि तामीळनाडू या राज्यांनी अनुक्रमे पहिली तीन स्थाने मिळविली आहेत. मात्र सर्वोच्च स्थानावर असलेल्या गुजरातलाही शंभरपैकी केवळ ५६.६ गुण मिळाले आहेत. महाराष्ट्र आणि तामीळनाडू यांचे गुण त्याहून कमी आहेत. म्हणजेच भारतातील सर्वाधिक सक्षम मानल्या जाणाऱ्या राज्यांनाही उद्योगस्नेही वातावरण उभारण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. पायाभूत सुविधा, नियामक सुलभता, संस्थात्मक कार्यक्षमता, आर्थिक व्यवस्थापन, पर्यावरणीय शाश्वतता आणि कुशल मनुष्यबळ या सर्व निकषांवर कोणतेही राज्य समान ताकदीने उभे राहू शकलेले नाही. एका क्षेत्रातील ताकद दुसऱ्या क्षेत्रातील कमतरतेमुळे कमी पडताना दिसते.

या अहवालातील आणखी एक महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे परकीय थेट गुंतवणुकीतील प्रचंड प्रादेशिक विषमता. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, दिल्ली आणि तामीळनाडू ही अवघी पाच राज्ये देशातील सुमारे ८५ टक्के परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करतात, तर ईशान्येकडील सर्व राज्यांच्या वाटय़ाला मिळून एक टक्क्यापेक्षाही कमी गुंतवणूक येते. ही आकडेवारी देशातील औद्योगिक विकासाच्या असमतोलाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. काही राज्ये उद्योग, रोजगार आणि निर्यातीत झपाटय़ाने पुढे जात असताना अनेक राज्ये अद्यापही मूलभूत औद्योगिक पायाभूत सुविधांसाठी झगडत आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय विकासाचा लाभ सर्व भागांपर्यंत समान प्रमाणात पोहोचणे कठीण ठरते.

जागतिक बँकेच्या अंदाजानुसार भारताला २०४७ पर्यंत उच्च उत्पन्न असलेला देश बनण्यासाठी पुढील दोन दशकांत सरासरी ७.८ टक्के वास्तविक आर्थिक वाढ कायम ठेवावी लागेल. हा वेग केवळ सरकारी खर्चाच्या बळावर साध्य होऊ शकत नाही. त्यासाठी खासगी आणि परकीय गुंतवणुकीचा मोठय़ा प्रमाणावर ओघ आवश्यक आहे. १९९१च्या आर्थिक सुधारणांनंतर भारताच्या विकासामध्ये भांडवली गुंतवणुकीचे योगदान निम्म्याहून अधिक राहिले आहे. २०२४-२५ मध्ये गुंतवणुकीचे प्रमाण सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या सुमारे ३० टक्क्यांपर्यंत पोहोचले असले तरी २०००च्या दशकातील उच्च आर्थिक वाढीच्या काळात हे प्रमाण अधिक होते. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी आणि रोजगार निर्मितीला गती देण्यासाठी गुंतवणुकीचा वेग आणखी वाढविणे अपरिहार्य आहे.

गेल्या काही वर्षांत देशात महामार्ग, द्रुतगती मार्ग, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती झाली आहे. त्यामुळे उद्योगांसाठी आवश्यक असलेली संपर्क व्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. मात्र, उद्योग उभारणीच्या प्रक्रियेत अनेक अडथळे अद्याप कायम आहेत. जमीन संपादनासाठी लागणारा वेळ, पर्यावरणीय मंजुरीतील विलंब, वीज व पाणी जोडण्याची गुंतागुंत, विविध विभागांकडून परवानग्या मिळविण्याची प्रदीर्घ प्रक्रिया आणि उच्च कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची कमतरता यामुळे अनेक प्रकल्प रखडतात. उद्योग जगतासाठी वेळ म्हणजेच भांडवल असते. त्यामुळे प्रशासकीय विलंब हा अनेकदा कर सवलतींपेक्षाही अधिक खर्चिक ठरतो.

याउलट, ज्या राज्यांनी डिजिटल एक खिडकी मंजुरी प्रणाली प्रभावीपणे राबविली आहे, गुंतवणूकदारांच्या तक्रारींच्या निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे आणि औद्योगिक वसाहतींमध्ये दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, त्या राज्यांबाबत उद्योगांचा विश्वास अधिक दृढ झालेला दिसतो. अशा राज्यांमध्ये गुंतवणुकीच्या घोषणा प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये रूपांतरित होण्याचे प्रमाणही अधिक असते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, केवळ नैसर्गिक संसाधने किंवा भौगोलिक स्थान उद्योगांना आकर्षित करत नाही; तर सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन हेही तेवढेच महत्त्वाचे असते.

हरित अर्थव्यवस्था आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव लक्षात घेता भविष्यातील गुंतवणुकीचे स्वरूपही झपाटय़ाने बदलत आहे. इलेक्ट्रिक वाहन निर्मिती, हरित ऊर्जा, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर्स, संरक्षण उत्पादन आणि जैव तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये जागतिक भांडवल मोठय़ा प्रमाणावर वळत आहे. या संधींचा लाभ मिळवायचा असेल तर राज्यांनी पारंपरिक औद्योगिक धोरणांच्या चौकटीपलीकडे जाऊन संशोधन संस्था, विद्यापीठे, स्टार्टअप्स आणि उद्योग यांच्यात सशक्त सहकार्याचे जाळे उभारावे लागेल. पुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि तंत्रज्ञानाभिमुख परिसंस्था हीच पुढील दशकातील स्पर्धात्मक ताकद ठरणार आहे.

आज जगभरात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी देशांमध्ये आणि राज्यांमध्ये तीव्र स्पर्धा सुरू आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या केवळ मोठी बाजारपेठ किंवा स्वस्त मजूर पाहत नाहीत, तर धोरणात्मक स्थैर्य, न्याय्य नियमन, जलद निर्णय प्रक्रिया आणि उद्योगस्नेही प्रशासनालाही तितकेच महत्त्व देतात. त्यामुळे प्रत्येक राज्याला आपल्या प्रशासनाच्या गुणवत्तेच्या आधारे स्वतःची विश्वासार्ह ओळख निर्माण करावी लागेल. सहकारी आणि स्पर्धात्मक संघराज्यवादाचा समतोल साधत सर्व राज्यांमध्ये सक्षम गुंतवणूक परिसंस्था उभारण्यात भारताला यश आले तर आर्थिक विकासाचे लाभ काही मोजक्या राज्यांपुरते मर्यादित राहणार नाहीत. त्यातून उद्योग, रोजगार, निर्यात आणि सर्वसमावेशक विकासाला नवी चालना मिळेल. विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी हीच सर्वात मोठी पूर्वअट आहे.

**संतोष घारे**

# रुपयाचे अवमूल्यन थांबेल का?



**मुळातच अब्जावधी डॉलरची व्यापारतूट हा पूर्वीपासून भारतासमोरील काळजीचा विषय बनला आहे. एकीकडे सोने आणि तेलाची प्रचंड आयात आणि दुसरीकडे घटती निर्यात, अशी स्थिती आहे.**

भारतीय रुपयाचा डॉलरच्या तुलनेत सातत्याने होणारा अवमूल्यनाचा प्रवास पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरत आहे. रुपया ९५ रुपयांच्या पुढे घसरल्यानंतर अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांवर त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. चलनाची सातत्याने होणारी घसरण ही कोणत्याही विकसनशील देशासाठी धोक्याची घंटा मानली जाती. कारण चलन त्या देशाच्या आर्थिक सामर्थ्याचे, गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे आणि वित्तीय स्थैर्याचे प्रतीक असते.

भारतीय अर्थव्यवस्था गेल्या काही वर्षांमध्ये वेगाने वाढत आहे. भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने मोठी झेप घेतली आहे; परंतु या सकारात्मक चित्राला रुपयाच्या घसरणीने काहीसे ग्रहण लागले आहे. प्रश्न केवळ रुपया घसरला याचा नाही, तर ही घसरण किती काळ सुरू राहणार आणि तिचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर किती व्यापक परिणाम होणार, हा आहे. रुपया का घसरतो, याची अनेक कारणे आहेत. सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिकन डॉलरची जागतिक ताकद. अमेरिकेची मध्यवर्ती बँक 'फेडरल रिझर्व्ह' व्याजदर वाढवते, तेव्हा जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी अमेरिकेकडे वळतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढते आणि रुपयासह अनेक देशांच्या चलनांवर दबाव निर्माण होतो. दुसरीकडे भारतासारखा देश मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, संरक्षण साहित्य, यंत्रसामग्री आणि औद्योगिक कच्चा माल आयात करतो. या आयातीसाठी डॉलरची आवश्यकता असते. डॉलरची मागणी वाढली, की रुपयाचे मूल्य आपोआप कमी होते. रुपयाच्या घसरणीचा पहिला आणि सर्वाधिक परिणाम आयातीवर होतो. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ८५ टक्के कच्च्या तेलाची आयात करतो. डॉलर महाग झाला, की त्याच प्रमाणातील तेलासाठी अधिक रुपये मोजावे लागतात. परिणामी पेट्रोल, डिझेल, एलपीजी, विमान इंधन आणि औद्योगिक इंधनाच्या किमती वाढण्याची शक्यता निर्माण होते. इंधन महागले, की वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम अन्नधान्यापासून बांधकाम साहित्यापर्यंत सर्व वस्तूंच्या किमतींवर होतो. महागाईचे चक्र वेगाने फिरू लागते.

डॉलर महागल्यामुळे औद्योगिक उत्पादनासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक चिप्स, वैद्यकीय उपकरणे आणि रासायनिक कच्च्या मालाच्या आयातीचाही खर्च वाढतो. त्यामुळे उद्योगांचे उत्पादन खर्च वाढतात. उत्पादन खर्च वाढला, की कंपन्या तो भार ग्राहकांवर टाकतात. परिणामी, सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त ताण पडतो. अमेरिकेने अलीकडे इराणवर सलग १३ दिवस हल्ले केल्यानंतर किंचित विराम घेतला आहे. इराणनेही शेजारील आखाती देशांवरील हल्ले स्थगित केले आहेत. युद्धाची वाढणारी व्याप्ती, संरक्षण सामग्रीचा घटणारा साठा, विस्कळीत ऊर्जापुरवठा आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये कच्च्या तेलाच्या दरात पाच टक्क्यांची घट होऊन ते ९१ डॉलर प्रति बॅरल दरापर्यंत पोहोचले आहे. जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या तेलमार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक लवकरच पूर्ववत होण्यास सुरुवात होईल. भारतात २५ मेपासून पेट्रोल व डिझेलचे दर स्थिर आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर, झपाट्याने विस्तारणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेला बळकट करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट कंपनी भारतात १७.५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार असल्याची कंपनीचे मुख्याधिकारी सत्या नाडेला यांनी केलेली घोषणा महत्त्वाची आहे. २०३५ पर्यंत देशातील म्युच्युअल फंडांची गंगाजळी ३०० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. असे असूनदेखील भारताच्या रुपयाची सतत घसरगुंडी होत असून, एका डॉलरला ९६ रुपयाची सीमारेषा त्याने पार केली आहे.

या पार्श्वभूमीवर रुपयाची घसरगुंडी थांबल्यास एक प्रकारचा दिलासा मिळू शकेल. अर्थात शेअर बाजारात तेजी होती, तेव्हादेखील रुपया घसरत होता. परकीय चलनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पुरवठ्यापेक्षा चलनाची मागणी जास्त होते, तेव्हा चलनाचा भाव वाढतो आणि मागणीच्या मानाने चलनाचा पुरवठा वाढतो, तेव्हा चलनाचा भाव कमी होतो. कुठलाही देश निर्यातीपेक्षा आयात जास्त करतो, तेव्हा त्याच्या चलनाचा भाव घसरत असतो. याचे कारण, निर्यात आणि आयात हे दोन्ही व्यवहार डॉलर या चलनात होत असल्यामुळे निर्यात करतेवेळी डॉलर्स मिळतात तर आयात करतेवेळी रुपया देऊन डॉलर्स विकत घेतले जातात आणि ते डॉलर्स देऊन परदेशातून वस्तू आणि सेवा या आयात करत असतो. त्यामुळे डॉलरचा भाव वाढतो आणि रुपयाचा घसरतो. वर्षानुवर्षे भारतात हेच चालल्यामुळे रुपयाचा भाव घसरत चालला आहे. एकीकडे भारतातील उद्योगधंद्यात परकीय भांडवल आकर्षित होत असले, तरी परदेशी अर्थसंस्थांनी भारतीय शेअर बाजारात गुंतवलेला पैसा काढून घ्यायला सुरुवात केलेलीच आहे. कारण त्यांना भारतापेक्षा अमेरिकेत वा अन्यत्र अधिक परतावा मिळत आहे. परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारात समभाग विकत घेतो, तेव्हा तो डॉलर्स देत असतो. याउलट ते समभाग विकतात, तेव्हा मिळालेल्या रुपयांचे डॉलर खरेदी करतात आणि परदेशी नेतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढते आणि रुपयाच्या तुलनेत डॉलरचा भाव वाढतो. म्हणजेच अशा वेळी रुपया घसरत असतो आणि हेच गेले काही महिने सुरू आहे.

१९७५ मध्ये एक डॉलर विकत घेण्यासाठी ४१ रुपये मोजावे लागत होते. २००० मध्ये त्यासाठी ४५ रुपये मोजावे लागू लागली. २०१२ मध्ये डॉलरचा दर ५३ रुपयांवर जाऊन पोहोचला. १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध तसेच दुष्काळी परिस्थिती यामुळे १९६६ अखेर भारत सरकारला प्रथमच रुपयाच्या अवमूल्यनाचा निर्णय घ्यावा लागला होता. रुपयाचे तब्बल ५७ टक्के अवमूल्यन करावे लागले. त्यामुळे ६ जून १९६६ पर्यंत एका डॉलरची किंमत ४.७६ रुपये इतकी होती. अवमूल्यन केल्यानंतर ती ७.५० रुपये इतकी झाली. डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना, जुलै १९९१ मध्ये रुपयाचे १९ टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले. सध्या मात्र रुपयाने डॉलरपुढे नांगी टाकली आहे. त्याचे प्रमुख कारण स्थानिक चलन, म्हणजेच रुपयापेक्षा अमेरिकन चलनाला जागतिक बाजारात असलेली वाढती मागणी, हे आहे. आज संपूर्ण जगाची वाटचाल बहुध्रुवीय रचनेकडे होत असल्याचा दावा केला जात असला, तरी अजूनही अमेरिकन डॉलर हेच सर्वात प्रभावी चलन आहे. डॉलरला पर्यायी चलन निर्माण करण्यात अद्याप यश आलेले नाही. त्यामुळेच अजूनही डॉलरच्या तुलनेत एखाद्या चलनाचे मूल्य काय आहे, यावरून त्या देशाची पत ठरते. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या धोरणांमुळे अमेरिकन रोखे हे गुंतवणुकीवर अधिक लाभ मिळवून देत आहेत. परिणामी, डॉलर मजबूत होत आहे. म्हणूनच परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून अलीकडील काळात १७ अब्ज डॉलर काढून घेतले आहेत. दुसरीकडे बँकांकडून वाढीव दराने डॉलरची खरेदी सुरू होती. त्यातच अमेरिकेने भारतासह अनेक देशांवर चढे आयात शुल्क लादल्यामुळे परिस्थिती चिघळली.

**हेमत देसाई**

## हत्ती वाचवा, पर्यावरण वाचवा!

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिन म्हणून साजरा केला जातो.हत्तींच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो.आशियाई आणि आफ्रिकन हत्तींसमोरील वाढते धोके, अधिवासाचा ऱ्हास, हस्तिदंतासाठी होणारी अवैध शिकार आणि मानव-हत्ती संघर्ष याकडे जगाचे लक्ष वेधणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. हत्ती हा केवळ जंगलातील एक मोठा प्राणी नाही, तर तो जंगलाच्या परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या हालचालींमुळे जंगलातील वनस्पतींची रचना बदलते, बिया दूरवर पोहोचतात, काही झाडांच्या पुनरुत्पादनाला मदत होते आणि जंगलात नैसर्गिक वाटा निर्माण होतात. त्यामुळे हत्तींचे अस्तित्व हे अनेक वनस्पती आणि इतर वन्यजीवांच्या अस्तित्वाशी जोडलेले आहे. मात्र आज हत्तींसमोर अनेक गंभीर संकटे उभी आहेत. हस्तिदंतासाठी होणारी अवैध शिकार, जंगलतोड, अधिवासाचे तुकडीकरण आणि वाढता मानव-हत्ती संघर्ष यामुळे हत्तींच्या संवर्धनाचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. जंगलांचे क्षेत्र कमी होत असताना हत्तींचा नैसर्गिक अधिवासही आकुंचन पावत आहे. परिणामी अनेक ठिकाणी हत्ती आणि मानवी वस्त्यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष केवळ वन्यजीवांसाठी नव्हे, तर स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठीही चिंतेचा विषय आहे.सरकार, वनविभाग, पर्यावरण संस्था आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे काम केले तरच हत्तींचे संवर्धन अधिक प्रभावीपणे होऊ शकते. शाळा-महाविद्यालयांमध्येही वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती वाढवली पाहिजे.आज हत्ती वाचवण्याचा प्रश्न केवळ वन्यजीवप्रेमींचा राहिलेला नाही. तो आपल्या पर्यावरणाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. जंगल वाचले तर जैवविविधता वाचेल आणि जैवविविधता वाचली तर पर्यावरणाचे संतुलन टिकेल.

**श्याम ठाणेदार**

बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## केदारेश्वर संस्थानच्या कारभाराला धर्मादाय विभागाचा दणका!

### २२ विश्वस्तांना १५ दिवसांत खुलासा करण्याचे निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** श्री केदारेश्वर संस्थानच्या आर्थिक व प्रशासकीय कारभारावर धर्मादाय विभागाने गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, संस्थानच्या २२ विश्वस्तांकडून सविस्तर खुलासा मागविण्यात आला आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, यवतमाळच्या १० ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रात दानपेट्या, देणग्या, मौल्यवान वस्तू, जमीनविक्री, दुकानांचे भाडे आणि बांधकाम खर्चासह विविध बाबींवर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. धर्मादाय विभागाच्या निरीक्षणानुसार काही दानपेट्यांना नियमानुसार विश्वस्तांचे सील नसल्याचे तसेच दानपेट्यांमधील संपूर्ण उत्पन्न संस्थानच्या बँक खात्यात जमा झाले नसल्याचे नमूद आहे. भाविकांनी अर्पण केलेल्या चांदीच्या वस्तू व मौल्यवान साहित्याच्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. संस्थानचे सचिव राजेश राव यांनी भाविकांकडून प्राप्त देणगी स्वतःच्या खात्यात वळविल्याच्या मुद्द्यावरही खुलासा मागविण्यात आला आहे. त्याचबरोबर पिंपळगाव येथील देवस्थानची जमीन विक्री करताना कलम ३६(१)(अ) अन्वये परवानगी घेतली होती का, तसेच तीन दुकाने भाड्याने देताना आवश्यक परवानगी घेण्यात आली का, याचीही विचारणा करण्यात आली आहे. मंदिर बांधकामासाठी कंत्राटदार संजय बुडे यांना आदेश, मागणीपत्र आणि परवानगीची कागदपत्रे नसल्याचे, तसेच बांधकामाची देयके धनादेशाऐवजी रोख दिल्याचे निरीक्षणात नमूद आहे.या सर्व बाबींवर १५ दिवसांत कागदपत्रांसह लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, मुदतीत स्पष्टीकरण न दिल्यास पुढील कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे भाविकांच्या श्रद्धेतून जमा होणाऱ्या निधीचा आणि संस्थानच्या मालमत्तेचा हिशेब आता निर्णायक ठरणार आहे.

## पुसद येथे पाचव्या सामुहिक ग्रामगीता पारायणाची यशस्वी सांगता

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ११ :** मानवतेचे महान पुजारी, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित 'ग्रामगीता' ग्रंथाचा ५१ सामुहिक पारायणाचा संकल्प श्री गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा पुसदच्यावतीने समन्वयाचार्य, हभप विठ्ठल महाराज भोयर यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असून पाचव्या सामुहिक ग्रामगीता पारायणाची यशस्वी सांगता सोमवारी उत्साहात करण्यात आली.

अमरनगर (श्रीरामपूर) येथील हनुमान मंदिराच्या सभागृहात आयोजित या ग्रामगीता पारायण (वाचन ) सप्ताहात दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत हभप विठ्ठल महाराज भोयर, प्रा नंदकुमार खैरे, राजेंद्र काळबांडे, रमाकांत मामीडवार, यशवंत देशमुख, माधव गव्हाणे, माया काळबांडे, भारती भोयर, कार्तिक भारती, मनस्वी देशमुख, देविका रोकडे, दिव्या चौधरी,सविता राठोड, शारदा साठे, यशोदा मस्के, शकुंतला उन्हाळे, कांताबाई अनखुळे, रखमाबाई पारडेवाल, आदींनी सक्रीय सहभाग नोंदविला.

यावेळी गुरुदेव सेवा मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा. प्रकाश लामणे, उपाध्यक्ष प्रा. नंदकुमार खैरे, प्रचार प्रमुख राजेंद्र काळबांडे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर सुरडकर, सदस्य नंदकुमार पंडित, रमेश सरागे, किसन गरडे, महिला प्रतिनिधी माया काळबांडे, भारती भोयर, आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सहावे सामुहिक ग्रामगीता पारायण येत्या सप्टेंबर महिन्यात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती विठ्ठल महाराज भोयर यांनी दिली. पसायदान, राष्ट्रवंदना व महाप्रसादाने पारायणाची सांगता झाली. यावेळी पुसद शहरासह अमरनगर व श्रीरामपूर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'हिरवेगार यवतमाळ'चा संकल्प; वृक्षलागवडीसोबत संवर्धनावर भर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** वाढती लोकसंख्या, प्रदूषण आणि झपाट्याने कमी होत चाललेली हरितक्षेत्रे यामुळे हवा, पाणी व जमिनीचे प्रदूषण गंभीर बनले आहे. त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्य, शेती आणि पर्जन्यमानावर होत असताना पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी 'हिरवेगार यवतमाळ' या व्यापक मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळ, डॉ. गायत्री काळे फाउंडेशन, यवतमाळ नगर परिषद आणि विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज चौकातून या मोहिमेला सुरुवात झाली. पाच कंदील चौक ते मेडिकल रोड दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रजातींच्या वृक्षांची ट्री गार्डसह लागवड करण्यात आली. ही मोहीम केवळ एका दिवसा पुरती मर्यादित न ठेवता वृक्षांच्या संवर्धनासाठी 'दत्तक वृक्ष' योजना राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यासाठी यवतमाळातील दानशूर नागरिकांचा सहभाग घेतला जाणार आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गायत्री काळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाचे सूत्रसंचालन सतीश काळे यांनी केले. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मोहिमेच्या यशस्वितेसाठी अनिल पाचकवडे, मृणालिनी दहीकर, नेहा पंडित, मीना काळे, रघुवीरसिंह चौव्हान, नंदू बुटे, ज्ञानेश्वर गायकवाड, राणा गायकवाड व शशिकांत खडसे यांनी अथक परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांच्या बांधावर, आमदार तोडसाम याची अतिवृष्टीग्रस्त भागात पाहणी..!

### पंचनामे व नुकसान भरपाईसाठी पाठपुराव्याचे आश्वासन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. ११ :** राज्यात ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीचा आर्णी-केळापूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. या काळात आमदार प्रा.राजू तोडसाम हे अमेरिकेतील शिकागो येथे अभ्यास दौऱ्यावर होते.

मात्र, विदेशात असतानाही त्यांनी पूरग्रस्त नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करत स्थानिक प्रशासनाला मदतीच्या सूचना दिल्या. तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश भ्रमणध्वनी वरून दिले होते. शिकागो दौरा आटोपून परतताच आमदार तोडसाम यांनी घाटंजी तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला. डांगरगाव, कोळी खु., कोळी बु., उंदरणी, कापशी (कोपरी), कवठा, मांजरी आणि मानुसधरी या गावांमध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली.पिकांचे नुकसान, शेतात साचलेले पाणी आणि अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या विविध अडचणी शेतकऱ्यांनी आमदारांसमोर मांडल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार मदत व नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. पाहणी दरम्यान आमदारांनी शेतकऱ्यांसोबत बांधावरच चटणी-भाकरीचा आस्वाद घेतला. साधेपणाने भोजन करत त्यांनी शेतीची परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी तालुका अध्यक्ष विजय बैस, रमेश धुर्वे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पवयीन कडून दोन घरफोड्या उघड..!

### उमरखेड पोलिसांच्या डी.बी. पथकाची कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ११ :** उमरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावत पोलिसांच्या डी.बी. पथकाने एका अल्पवयीन विधी संघर्षग्रस्त बालकाकडून गुन्ह्यांची कबुली मिळवली. त्याच्याकडून चोरीच्या रकमेपैकी शिल्लक असलेली ९ हजार ५०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

उमरखेड शहर परिसरात मागील काही दिवसांत चोरी व घरफोडीच्या घटना घडल्याने गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार डी.बी. पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. दरम्यान, ९ ऑगस्ट रोजी डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांना या गुन्ह्यांमध्ये उमरखेड येथील अल्पवयीनाचा सहभाग असल्याची माहिती मिळाली. वयाची खात्री करून पालकांच्या उपस्थितीत चौकशी केली असता त्याने २७ जुलै रोजी पहाटे कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील हॉटेल तसेच ९ ऑगस्ट रोजी पहाटे ढाणकी रोडवरील न्यू विदर्भ कोल्डी हॉटेल फोडल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत चोरीच्या रकमेपैकी शिल्लक ९ हजार ५०० रुपये जप्त करण्यात आले. याप्रकरणी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने केली.

## थोडक्यात

### शेताच्या बांधावरच बनवा ९० टक्के स्वस्त खते!

**मोहदा येथे 'विज्ञान संत' अंकुश पाटील यांच्या प्रशिक्षण शिबीराचे आज आयोजन**

**यवतमाळ :** बदलेलेले हवामान आणि बाजारात रासायनिक खतांचे गगनाला भिडलेले भाव पाहता शेतकऱ्यांचा शेतीखर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी 'आत्मनिर्भर शेतकरी अभियान' अंतर्गत हरिहर लिंगनवार यांच्या संकल्पनेतून आगाखान इकॉनॉमिक प्लॅनिंग बोर्ड व शेतकरी समिती यवतमाळ जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने मोहदा येथे उद्या बुधवार, १२ ऑगस्ट रोजी 'विज्ञान संत' अंकुश पाटील यांच्या मार्गदर्शनात शेतकरी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत हिंदुस्थान मंगल कार्यालय, मोहदा येथे हे शिबिर होणार आहे. या शिबीराचे प्रमुख मार्गदर्शक 'विज्ञान संत' अंकुश पाटील हे आहेत. पिकांसाठी लागणारी महागडी रासायनिक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि टॉनिक्स शेताच्या बांधावरच घरच्या घरी अगदी कमी खर्चात आणि सोप्या पद्धतीने कशी तयार करायची, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व शास्त्रीय मार्गदर्शन ते या शिबीरात देणार आहेत. या कार्यक्रमाचे उदघाटन कृषी उत्पन्न बाजार समिती पांढरकवडाचे संचालक हरिहर लिंगनवार यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी इस्माईली कौन्सिल यवतमाळचे अध्यक्ष सिराज हिराणी राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून इस्माईली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष सलिम लालाणी, इस्माईली कौन्सिलच्या संचालक झीनत बायमा काराणी, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकांत राऊत, नितीन पखाले, विवेक गावंडे, निलेश फाळके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.
जिल्ह्यातील व मोहदा परिसरातील शेतकरी बांधवांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राजाण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



### व्यसनाचा 'नाही' नशामुक्तीचा संदेश घरोघरी पोहोचवा!

**विद्यार्थ्यांनी बनावे नशामुक्तीचे 'ॲम्बेसेडर' पांढरकवडा पोलिसांचे आवाहन**

**पांढरकवडा :** व्यसनांच्या विळख्यात अडकणाऱ्या तरुणाईला वेळीच सावध करण्याची गरज असून, विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनांपासून दूर राहून नशामुक्तीचा संदेश मित्र, कुटुंब आणि समाजापर्यंत पोहोचवावा. विद्यार्थ्यांनी नशामुक्तीचे 'ॲम्बेसेडर' बनावे, असे आवाहन पांढरकवडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार एल. डी. तावरे व सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर यांनी केले.केळापूर येथील शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या 'नशामुक्त युवा' अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पोलिस अधिकाऱ्यांनी व्यसनाधीनतेचे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट करत युवकांना व्यसनांपासून चार हात दूर राहण्याचे आवाहन केले.प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नशामुक्त जीवन जगण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. यावेळी प्रा. डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. उषा राखुंडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन साक्षी भोयर व नीलम पवार यांनी केले.

## 'ये शाम मस्तानी'ने यवतमाळकरांना बांधले सुरांच्या मोहपाशात!

### गायक अभियंत्यांच्या दमदार सादरीकरणाने किशोरकुमारांच्या आठवणींना उजाळा..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** किशोरकुमार यांच्या अजरामर गीतांनी रविवारी यवतमाळकरांना अक्षरशः सुरांच्या दुनियेत नेले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील बचत भवन येथे अभियंता ग्रुपतर्फे आयोजित 'ये शाम मस्तानी' या संगीत कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हाउसफुल ठरलेल्या या मैफलीत गायक अभियंत्यांनी आपल्या आवाजाची वेगळीच छाप उमटवली. अभियंता शाम टेंभरे, नितीन खर्चे, संतोष ढवळे, रमेश गिरोलकर व अभियंता सचिन जीरापुरे यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'ये शाम मस्तानी', 'रिमझिम गिरे सावन', 'चिंगारी कोई भडके', 'पग घुंगरू', 'देखा एक ख्वाब', 'चेहरा है या चाँद खिला है', 'मुसाफिर हूँ यारों' यांसह किशोरकुमारांच्या लोकप्रिय गीतांनी वातावरण भारावून गेले. अनेक गाण्यांना रसिकांनी 'वन्स मोअर'ची दाद दिली. प्रा. अतुल शिरे, प्राची उभाळे, संजय भोकरे, गौरव पंचबुद्धे, राजेंद्र बोरकर, प्रवीण पांडे, निशा थोरात, श्रावणी काकडे, सोमेश जवादे आदी गायक अभियंत्यांनी प्रभावी सादरीकरण केले. चारू साबळे, विशाल रामनगरिया, सौरभ शहारे व पिंटू झाडे यांनी वाद्यसाथ केली. प्रमोद गजभिये यांनी सूत्रसंचालन केले.

## आदिवासी दिनीच आदिवासी मंत्र्यांची पाठ..! उईके पिता-पुत्रीवर गोंडवाना गणतंत्र पार्टीचा हल्लाबोल

### डॉ. अशोक उईके यांच्या राजीनाम्याची मागणी..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** जगभरात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा होत असताना राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके आणि यवतमाळच्या नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनी या महत्त्वपूर्ण दिनाकडे पाठ फिरवल्याचा आरोप करीत गोंडवाना गणतंत्र पार्टी जिल्हा कमिटी, यवतमाळने तीव्र संताप व्यक्त केला आहे.

डॉ. अशोक उईके यांनी आदिवासी विकास मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीप शेडमाके यांनी केली आहे. विशेष म्हणजे, याच सरकारमधील जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी बाबुळगाव येथे आदिवासी बांधवांसोबत जागतिक आदिवासी दिन साजरा केला. यावेळी त्यांनी आदिवासी महिलेचे पाय धुऊन तिचा सन्मान केला, तसेच आदिवासी बांधवांसोबत भाकर खाऊन आपलेपणाचा संदेश दिला. सरकारमधील एका मंत्र्याकडून आदिवासी समाजाशी असलेली ही नाळ जपली जात असताना, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके तसेच राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी मात्र या दिनाकडे पाठ फिरवल्याचा आरोप गोंडवाना गणतंत्र पार्टीने केला आहे. भाजपचे सुधीर मुनगंटीवार,आमदार राजू तोडसाम आणि भीमराव केराम यांसारख्या नेत्यांनी आदिवासी दिन साजरा केला असताना, आदिवासी विकास मंत्र्यांनी साध्या शुभेच्छाही न दिल्याने समाजात नाराजी असल्याचे पक्षाने म्हटले आहे. यवतमाळच्या नगराध्यक्षपदी आदिवासी आरक्षणातून विराजमान झालेल्या प्रियदर्शनी उईके यांच्यावरही पक्षाने निशाणा साधला. आदिवासी समाजाचा मान-सन्मान राखता येत नसेल, तर जात प्रमाणपत्र व जात वैधता जमा करून खुल्या प्रवर्गातून निवडणूक लढवून दाखवा,असे आव्हान देण्यात आले. ज्या मंत्र्यांना आपल्या समाजाच्या अस्मितेचा आदर नाही, ते समाजाचे हितचिंतक कसे? असा सवाल करीत डॉ. अशोक उईके यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे.

## दारूच्या बाटल्यांचा 'सफाया' ३७ गुन्ह्यांतील ३६ लाखांचा मुद्देमाल नष्ट!

### अवधूतवाडी पोलिसांची कारवाई तब्बल ४० हजार बाटल्या केल्या भुईसपाट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ११ :** अवैध दारू विक्रीविरोधातील कारवाईत जप्त केलेल्या दारूच्या बाटल्यांचा अखेर 'निकाल' लागला! अवधूतवाडी पोलिस ठाण्यात दाखल दारूबंदी कायद्याच्या ३७ गुन्ह्यांतील तब्बल ३६ लाख ७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने नष्ट करण्यात आला. यात सुमारे ४० हजार दारूच्या बाटल्यांचा समावेश होता.

अवधूतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत दारूबंदी कायद्यांतर्गत दाखल विविध गुन्ह्यांमध्ये अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात दारू जप्त करण्यात आली होती. संबंधित प्रकरणांमध्ये न्यायालयाकडून जप्त मुद्देमाल नष्ट करण्याचे आदेश मिळाल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. मंजुरी मिळाल्यानंतर मंगळवारी पोलिसांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. नऊ वर्षांतील ३७ गुन्ह्यांचा मुद्देमाल हा अवधूतवाडी पोलिस ठाण्यात २०१७ मध्ये २, २०१९ मध्ये १, २०२० मध्ये ८, २०२१ मध्ये ८, २०२२ मध्ये ३, २०२३ मध्ये ७, २०२४ मध्ये ६, २०२५ मध्ये १ आणि २०२६ मध्ये १, अशा एकूण ३७ गुन्ह्यांतील मुद्देमाल नष्ट करण्यात आला. ४० हजार बाटल्यांचा 'सफाया' नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालात १८० मिलीच्या देशी दारूच्या ३ हजार ५८७ बाटल्या, ९० मिलीच्या ७ हजार ७९२ बाटल्या, तसेच १८० मिलीच्या विदेशी दारूच्या ३५ हजार ६२२ बाटल्या आणि ९० मिलीच्या २० बाटल्या होत्या. अशा एकूण सुमारे ४० हजार बाटल्यांचा नाश करण्यात आला. पोलिस अधीक्षक कुमार चिंता , अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली. अवधूतवाडीचे पोलिस निरीक्षक अजित कदम यांच्यासह पोलिस कर्मचारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांवर सा.बां.विभागाकडून अन्याय..!

### १४ ऑगस्ट पासून साखळी उपोषण, शासन निर्णयानुसार ३४% कामे वाटप न केल्याचा आरोप.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ११ :** येथिल सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत मागील तीन वर्षापासून प्रसिद्ध केलेली निविदा सूचना शासन निर्णय नुसार सुशिक्षित अभियंत्यांना ३४ टक्के प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काम मिळत नसल्याचा आरोप सुशिक्षित इंजिनिअर अन्वर अली या अभियंत्यांनी केला आहे.

तोंडी व लेखी विनंती करून सुद्धा कामाचे काही निकष निघत नसल्याने येत्या दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर या सुशिक्षित अभियंत्यांनी साखळी उपोषणास बसत असल्याबाबत दिनांक ०७ ऑगस्ट २०२६रोजी कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांना निवेदनाद्वारे कळविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी? यांना वारंवार त्या सुशिक्षित अभियंत्याकडून तोंडी व लेखी स्वरुपाचे निवेदन सुद्धा देण्यात आले होते मात्र लेखी निवेदन विनंतीच्या पत्राला केराची टोपली दाखविण्यात आल्याचा आरोप सुद्धा निवेदनात करण्यात आला आहे. यात गंभीर स्वरुपाची बाब म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागातील शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना ३४ टक्के प्रमाणे कामे मिळत नसून, फक्त ५ टक्के काम वाटप होत असल्यामुळे समितीमध्ये सुद्धा कामे पाठवत नसल्याचा आरोप केला आहे. छोटे,लहान कामे नसल्याचे सांगून वेळ काढूपणा धोरण बांधकाम विभागाच्या अधिकार्यांनी केल्याचा आरोप केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चारही विभागात १० लाख रुपयाची खुली निविदा काढून ऑफलाइन पद्धतीने देण्यात येते हीच कामे देऊन सुशिक्षित अभियंत्यांना रोजगार मिळायला हवे, त्यातही शासन सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना फक्त १.५० कोटी रुपयाचे पंजीकरण करून देत आहे. व त्यांना १.० शासन पोकळ आश्वासन देत आहे. त्यामुळे येत्या १४ ऑगस्ट पासून इंजिनीयर सय्यद अन्वर अली, राज्य उपाध्यक्ष, राज्य अभियंता संघटना महाराष्ट्र राज्य, यांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

## जम्मू-काश्मीरच्या विद्यार्थ्याने मोघे महाविद्यालयातून पीएचडी पूर्ण..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. ११ :** स्थानिक शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील भूगोल विषयात जम्मू-काश्मीर येथील अनंतनाग जिल्ह्यातील रहिवासी हॅरीस बिन सलाम या विद्यार्थ्याने पीएचडी यशस्वीरित्या पूर्ण केली. महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने हे संशोधन पूर्ण केले. शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या भूगोल विषयातून पीएचडी प्राप्त करणारा हॅरीस हा जम्मू-काश्मीरचा दुसरा विद्यार्थी ठरला आहे.

त्याने यापूर्वी काश्मीर विद्यापीठातून एम.एस्सी. (जिओग्राफी), तर राजस्थानमधील जयपूर विद्यापीठातून एम.फिल. पूर्ण केले आहे. पीएचडी पूर्ण केल्याबद्दल हॅरीस बिन सलाम याने महाविद्यालयाचे प्राचार्य, भूगोल विभागप्रमुख डॉ.अजय सोळंके तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले

# किसान मजूर कामगारांचे जेलभरो सत्याग्रह आंदोलन

## शेकडो महिला पुरुषांना अटक

**अमरावती/का.प्र.**

संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समिती व संयुक्त किसान मोर्चा यांचे नेतृत्वामध्ये १० ऑगस्टला अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय समोर जेलभरो सत्याग्रह करण्यात आला. यामध्ये शेकडो महिला पुरुषांना अटक करण्यात आली.

वर्ष २०१४ ला सत्तेवर आलेल्या भाजपा एनडीए सरकारने 'अच्छे दिन' चे स्वप्न जनतेला दाखविले होते. प्रत्यक्षात तसे झाले नाही.याउलट शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न अधिकच तीव्र झालेत.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली. शेतमजुरांचे प्रश्न पण तीव्र झालेत.त्यांना कामाची हमी उरली नाही.असंघटित कर्मचाऱ्यांचे प्रश्न कालच्या पेक्षा अधिक बिकट झाले. कामाचे तास वाढले, सामाजिक सुरक्षा राहिली नाही. रोजगाराचे सातत्य राहिले नाही. खाजगीकरण कंत्राटीकरणामुळे मजुरांच्या गुलामीमध्ये अधिकच वाढ झाली.अशातच नेट परीक्षांमध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे उभा ठाकलेला संघर्ष देशातील समग्र जनतेने पाहिलेला आहे.ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर संवैधानिक अधिकार म्हणून लढ्याचं हत्यार उपसले तर त्यावर दडपशाही केली जाते.असे सरकारचे लोकशाही विरोधी चरित्र आहे आणि म्हणून अखेरीस देशातल्या कष्टकरी समुदायांनी जेलभरो सत्याग्रह आंदोलन केले.

सदर आंदोलनामध्ये चार श्रमसंहितांना विरोध,किमान आधारभावाच्या कायद्याची मागणी,शेतमजुरांकरता मनरेगा कायम करा,अंगणवाडी कर्मचारी,आशा वर्कर,शालेय पोषण आहार,राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी या सर्व योजना कर्मचारी,कंत्राटी कामगार



कर्मचारी,शिकवू कामगार या सर्वांना नोकरीमध्ये कायम करा व त्यांना सामाजिक सुरक्षा योजने प्रदान करा,भारत अमेरिका करार रद्द करा,वीज सुधारणाविधेयक २०२५,बियाणे विधेयक २०२५ मागे घ्या,गॅस पेट्रोल जीवनावश्यक वस्तूंची महागाई कमी करा,स्मार्ट मीटर महाराष्ट्रात लावणार नाही असा निर्णय सरकारने जाहीर करावा यासारख्या विविध मागण्यांसाठी सदर आंदोलन होते.

सिटू व आयटकच्या नेतृत्वातील अंगणवाडी,आशा कर्मचारी, शालेय पोषण आहार,ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ, बांधकाम कामगार संघटना,महाराष्ट्र राज्य किसान सभा,अखिल भारतीय किसान सभा,भारतीय खेत मजदूर युनियन,महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लाल बावटा),भारतीय महिला फेडरेशन,अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, किसान आजादी आंदोलन या संघटनांचा आंदोलनामध्ये सहभाग होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारका जवळून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर आला.त्या ठिकाणी समारोपीय सभा झाली.या सभेचो अध्यक्षस्थानी कॉ.डी. एस.पवार (कामगार नेते) संचालन संयुक्त किसान मोर्चाचे निमंत्रक अशोक सोनारकर प्रास्ताविक कॉ.सुभाष पांडे (सीटुचे नेते)यांनी केले. सभेमध्ये किसान आजादी आंदोलनाचे प्रा.साहेबराव विदळे,डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे,महादेव गार पवार,संजय मंडवदरे,दिलीप शापामोहन, ॲड.क्रांती देशमुख,कॉ.प्रांजली शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

आंदोलनामध्ये तुकाराम भस्मे,सुनील मेटकर,चंद्रकांत वळडसकर, विनोद जोशी, जया मंडवधरे ,अनिकेत वाकपांजर, प्रज्ञा बनसोड संतोष सुरजुसे, हरिदास राजगिरे,संतोष राऊत सुनील घटाळे, जयेंद्र भोगे, ज्ञानेश्वर मेश्राम, शंभरकर,माला वानखडे,मनोहर वाढनकर, निरंजन बोले, मनोज तायडे,किशोर काळे,गोविंद ढेंगे,प्रा.विजय रोडगे,उमेश बनसोड, रसूल शहा,बाळाभाऊ वाकपांजर,निळकंठ ढोके,तुळसा चंदेल ,जितेंद्र कोरडे, राजाभाऊ बाभुळकर,राम जोशी,प्रकाश सोनोणे, लता सोनारकर,कैलास ठाकरे,धनंजय मस्के,सागर दुर्योधन,रमेश सोनुले,श्याम शिंदे, देविदास राऊत,अशोक केसरखाने,दिलीप महल्ले, तुळशीराम जेठे अंबादास मते,शत्रुग्ण मगर, राजेंद्र राऊत,मोहसीन शेख,किशोर शिंदे वनिता नेवारे, लता म्हात्रे, गुणवंत टोने, प्रफुल्ल निकाळजे,अजय गारपवार रामदास कारमोरे, राजेंद्र भांबोरे, मुकुंद काळे,राम शिंदे, महादेवराव नागोसे,चंदा वानखेडे,रेहाना खान,वंदना बुरांडे, ज्योती नालट,अंकुश वाघ,संगीता चौधरी,पद्मा गजभिये, प्रतिभा मेश्राम यांचे सह शेकडो महिला पुरुषांनी सहभाग केला.

## समृद्धी महामार्गावर वाहतूक अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई- उर्मिला पवार

**अमरावती/का.प्र.**



समृद्धी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने वाहने उभी करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध परिवहन विभागाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे. समृद्धी महामार्गाच्या नोडल अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती उर्मिला पवार यांनी याबाबत वाहनधारक व वाहनचालकांना विशेष सूचना दिल्या आहेत.

समृद्धी महामार्गावर वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात असल्याने महामार्गावर वाहन बंद पडल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव वाहन थांबवावे लागल्यास ते सुरक्षित ठिकाणी हलविणे अत्यंत आवश्यक आहे. महामार्गाच्या मुख्य मार्गावर किंवा वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी वाहन उभे करणे धोकादायक असून, त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे.अशाच प्रकारची घटना वर्धा जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर घडली.९ ऑगस्ट रोजी कंटेनर वाहन क्रमांक HR ५५ BA ८५४४ च्या चालकाने मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लेनमध्ये वाहन उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याचे निदर्शनास आले. सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये नागपूर येथून पुणे येथे जाणारा माल लोड असल्याचे निदर्शनास आले. वाहन राष्ट्रीय महामार्गाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करीत असल्याचे आढळून आल्याने संबंधित वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

## धारणी-बैरागड मार्गावरील सिपना नदीवर पूल कधी होणार?

### मेळघाटवासीयांचा सवाल

**मेळघाट/वार्ताहर**

धारणी-बैरागड मार्गावरील दिया गावाजवळील सिपना नदीवर मोठा पूल उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. विशेष म्हणजे २०२१ मध्ये तत्कालीन अचलपूर कार्यकारी अभियंता म्हात्रे साहेब यांच्या कार्यकाळात या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी व जागेचे सर्वेक्षण करण्यात आले होते.ङ शासनाच्या आदेशानुसार मोठ्या पुलासाठी योग्य जागेची निवड करण्याच्या दृष्टीने ही पाहणी झाल्याचे सांगण्यात येते.

त्यावेळी तत्कालीन उपविभागीय अभियंता स्वर्गीय माळवे यांनी कार्यकारी अभियंत्यांसोबत परिसराची पाहणी करून दोन संभाव्य ठिकाणांबाबत आपली मते नोंदवली होती. मात्र म्हात्रे साहेब यांच्या बदलीनंतर या प्रस्तावाचे पुढे काय झाले? त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणती कारवाई केली? याबाबत गेल्या चार वर्षांत नागरिकांना कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही.सिपना नदीवरील सध्याच्या पुलालगत नवीन पूल उभारणे किंवा ङदिया गावाच्या पुढे सुमारे दोन किलोमीटर अंतरावर जुन्या मार्गाच्या ठिकाणी, धारम-महू गावाच्या पुढील भागात पूल उभारण्याचा पर्याय यापूर्वी विचाराधीन असल्याचे सांगण्यात येते. मात्र कागदोपत्री पाहणीपलीकडे प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, हा प्रश्न आजही कायम आहे.

**उतावळी येथील पुलाचीही तातडीने गरज**

धारणी-बैरागड मार्गासोबतच ङधारणी-चाकरदा मार्गावरील उतावळी गावाजवळ सिपना नदीवर पूल बांधणे अत्यंत आवश्यकङ आहे. उतावळी पूल झाल्यास परिसरातील अनेक गावांना थेट फायदा होणार आहे.उतावळी परिसरातून पुढे पोहरा, गोवर, कहू, चाकरदा, पाटील, चिपोली, बुलुंगाव आदी गावांसह चौराकुंड मार्गावरील अनेक गावांचा संपर्क या मार्गाशी जोडलेला आहे. त्यामुळे उतावळी येथे पूल उभारल्यास ङपावसाळ्यातील वाहतुकीची मोठी अडचण दूर होऊन अनेक गावांतील नागरिकांना वर्षभर सुरक्षित व सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध होऊ शकते.

**पावसाळ्यात मेळघाटाचा संपर्क धोक्यात**

मेळघाट हा दुर्गम व आदिवासीबहुल भाग आहे. पावसाळ्यात नदी-नाल्यांना पूर आल्यावर अनेक मार्गांवरील वाहतूक ठप्प होते. अशा परिस्थितीत रुग्णालय, शाळा, बाजारपेठ, शासकीय कार्यालये आणि इतर अत्यावश्यक सेवांपर्यंत पोहोचणे नागरिकांसाठी मोठे आव्हान बनते.त्यामुळे दिया गावाजवळील सिपना नदीवर तसेच उतावळी परिसरात आवश्यक त्या ठिकाणी पूल उभारण्याचा प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागाने युद्धपातळीवर हाती घ्यावाङ, अशी मागणी मेळघाटवासीयांकडून होत आहे.

**चार वर्षांपासून प्रस्ताव कुठे अडकला?**

२०२१ मध्ये जागेचे सर्वेक्षण झाले असेल, तर त्यानंतर प्रस्तावाची प्रशासकीय प्रक्रिया कुठपर्यंत पोहोचली? अंदाजपत्रक तयार झाले का? तांत्रिक मान्यता मिळाली का? निधीची तरतूद झाली का? याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने ङमेळघाटच्या जनतेसमोर स्पष्ट माहिती ठेवणे गरजेचे आहे. मेळघाटातील नागरिकांच्या मूलभूत वाहतूक सुविधेचा प्रश्न केवळ कागदोपत्री पाहणी व आश्वासनांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरला पाहिजे. महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन दिया गावाजवळील सिपना नदीवरील पूल तसेच उतावळी येथील पुलाचा प्रश्न मार्गी लावावा, हीच मेळघाटवासीयांची ठाम मागणी आहे.

## वीज वितरण कंपनी कार्यालयावर हल्लाबोल

**मोर्शी/वार्ताहर**

राज्यातील सर्वसामान्य घरगुती वीज ग्राहकांवर लादण्यात येत असलेली स्मार्ट मीटर योजना तात्काळ स्थगित करण्यात यावी तसेच वीज ग्राहकांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता त्वरित करण्यात यावी.या मागणी संदर्भात भारतीय कम्युनिस्ट पक्ष,महाराष्ट्र किसान सभा व तालुका कॉंग्रेस कमिटीचे कार्यकर्ते यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयावर हल्लाबोल आंदोलन केले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी विद्युत वितरण कंपनीच्या परिसरात सर्वसामान्य ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसविण्यात आल्यामुळे त्यांना जुन्या मीटरच्या तुलनेत पाचपट बिल लागून येत आहे. काही ग्राहकांना तर वीस हजार रुपयापर्यंत बिल येत असल्यामुळे सक्तीने बसविण्यात येणारे स्मार्ट मीटर तात्काळ बंद करण्यात यावे.यासाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.शेवटी एक लेखी निवेदन महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता कासट यांना देण्यात येऊन निवेदनाची प्रतिलिपी थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री म.रा.यांना रवाना करण्यात आले.



सर्वसामान्य घरगुती व इतर ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तात्काळ थांबविण्यात यावी.ग्राहकांची लेखी संमती घेतल्याशिवाय कोणत्याही ठिकाणी स्मार्ट मीटर बसवू नये.वाढत्या वीजदरांना आळा घालून सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात वीज उपलब्ध करून द्यावी.घरगुती,शेतकरी, लघुउद्योग व छोट्या व्यावसायिकांना विशेष सवलती देण्यात यावी.चुकीची किंवा अवाजवी वीज बिले तात्काळ दुरुस्त करून निरासरण करण्यात यावे.प्रत्येक विभागात प्रभावी ग्राहक तक्रार निवारण केंद्र सुरू करावे.ग्रामीण भागातील रोहित्र,वीजवाहिन्या व इतर यंत्रणेची यिमित देखभाल करण्यात यावी.शेतकऱ्यांना दिवसा पुरेसा वीजपुरवठा उपलब्ध करून त्यांचा कायमस्वरूपी प्रश्न मिटविण्यात यावा. निवेदन देतेवेळी संजय मंगळे,महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सचिव विपुल भडांगे,राहुल मंगळे,सुरज आवचार, नरेंद्र फसाटे,शेख यामीन शेख रहीम,सागर घाटोळ,राहुल भोजने,अनिल भोजने,रुपेश बाखडे, जहीरखॉं शेरखा,प्रशांत खवले,शहनान शेख बशीर यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्यातील सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लोकाभिमुख धोरणावरील सर्व मागण्यांचा शासनाने तातडीने सकारात्मक विचार करून स्मार्ट मीटर योजना व वीज ग्राहकांच्या न्याय्य हक्कांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल.

## उषाबाई साबळे यांचे निधन

**अमरावती/का.प्र.**



दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव निवासी डॉक्टर विठ्ठलराव उर्फ व्ही एस साबळे यांच्या पत्नी पूर्व श्रमीच्या उषाबाई उर्फ आसूबाई विठ्ठलराव साबळे (दर्यापूरकर महानुभाव) यांचे आज ११ ऑगस्टला पहाटे तीन वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७२ वर्ष होत.त्यांची अंतिम यात्रा आजच संध्याकाळी पाच वाजता त्यांची राहते घर नवजीवन हॉस्पिटल, दर्यापूर येथून निघणार आहे.त्या नवजीवन हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर रवींद्र साबळे यांच्या मातोश्री होत्या.

## संक्षिप्त

### पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये दामिनी पथकाचे मार्गदर्शन



**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने दामिनी पथकाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघाली गावंडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.यावेळी मेघाली गावंडे यांनी विद्यार्थिनींना महिला ,मुलींच्या व मुलांच्या सुरक्षिततेसंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. संकटाच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण कसे करावे, आजूबाजूच्या परिस्थितीबाबत सतर्क कसे राहावे, तसेच कोणतीही अडचण निर्माण झाल्यास पोलिसांची मदत कशी घ्यावी, याबाबत त्यांनी माहिती दिली.विद्यार्थिनींनी निर्भयपणे व आत्मविश्वासाने वावरावे, तसेच आपल्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहावे, असा संदेश त्यांनी दिला. दामिनी पथकाची भूमिका आणि कार्यपद्धती याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे , उपप्राचार्या सोनल निस्ताने, डॉ अंकोश राजगिरे , नीलिमा केने तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### स्वातंत्र्य दिनानिमित्त अमरावतीत



### भव्य रक्तदान शिबीर

**अमरावती-** १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन तसेच अमरावती महानगरपालिका स्थापना दिनानिमित्त अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६ रोजी श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.शिबिराच्या आयोजनाबाबत अमरावती रक्तदान समितीच्या कार्यकारिणीसोबत आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये रक्तदान शिबिराच्या नियोजनासह विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.आढावा बैठकीस वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, मध्य झोन क्र. २ चे सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पाटबागे, अमरावती रक्तदान समितीचे अध्यक्ष महेंद्र भुतडा, उपाध्यक्ष अजय दातेराव, श्याम शर्मा, सदस्य रितेश व्यास, निखील तेरेदेसाई, सचिन काकडे तसेच डॉ. पंजाबराव देशमुख स. वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### प्राणी मित्रांनी दिले कासवाला जीवदान



**तिवसा-** मासे पकडण्यासाठी जलाशयात टाकण्यात आलेला गळ एका कासवाच्या गळ्यात अडकून त्याचा जीव धोक्यात आल्याची घटना तिवसा परिसरात समोर आली.कासवाच्या गळ्यात गळ अडकल्याचे लक्षात येताच प्राणीमित्र अविनाश पांडे यांनी तत्काळ पुढाकार घेत वनविभागाला माहिती दिली. त्यानंतर वनविभागाच्या मदतीने कासवाची गळापासून सुटका करण्यात आली.वनविभागाच्या कर्मचारी आकाश माहोरे, शिव राठोड यांच्या मदतीने कासवाला सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक त्याच्या गळ्यात अडकलेला गळ काढण्यात आला. गळ काढल्यानंतर कासवाची पाहणी करण्यात आली. वेळेत मदत मिळाल्याने कासवाचा जीव वाचला. प्राणी मित्र अविनाश पांडे यांनी दाखविलेली तत्परता कौतुकास्पद ठरली. वनविभागाशी समन्वय साधून कासवाची सुटका करण्यात आल्याने एका मुक्या जीवाला जीवनदान मिळाले.

### श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयात

# विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला तंत्रज्ञानाची जोड

## मेकॅनिकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्थापित केला 'डिझाईन क्लब' : ३D मॉडेलिंग, ॲनालिसिस व ३D प्रिंटिंगचा प्रत्यक्ष सराव

**अमरावती/का.प्र.**

केवळ पुस्तकी ज्ञानावर न थांबता विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला तंत्रशिक्षणाद्वारे प्रत्यक्ष कृतीची जोड देत त्यांच्यातील सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि नवीन उपक्रमांची क्षमता विकसित करण्यासाठी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत 'डिझाईन क्लब'ची स्थापना केली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. दाळू आणि मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा. नचिकेत खेरडे यांच्या प्रोत्साहनातून विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने स्थापन केलेला हा क्लब त्यांच्या कल्पनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे. खरं पाहता, मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य नेहमी म्हणतात आगे बढो, सबसे आगे बढो, करते रहो देखा जायेगा' हा यशाचा मंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करीत एक पाऊल पुढे टाकले हे कौतुकास्पद व प्रेरणादायी ठरले आहे.

३D मॉडेलिंग, विविध डिझाईन सॉफ्टवेअर, ॲनालिसिस आणि ३D प्रिंटिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मिळत आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ तांत्रिक कौशल्यच नव्हे, तर कल्पकता, समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क, संशोधनवृत्ती आणि प्रकल्प साकारण्याचा आत्मविश्वास निर्माण होत आहे. दररोज तासन्तास विविध विषयांवरील डिझाईन तयार करून त्यावर प्रयोग करण्यासाठी विद्यार्थी मेहनत घेत आहेत ही बाब प्रेरणादायी असल्याचे मत अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. श्रीकांत चेंडके यांनी व्यक्त केले. मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. नचिकेत खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापित या डिझाईन क्लब मध्ये आर्य मेश्राम, देवांशु मेश्राम, धीरज कुशवाह, हर्ष काळकर, जान्हवी देशमुख, समृद्धी क्षीरसागर आणि विना कदम हे सात विद्यार्थी या क्लबचे संस्थापक सदस्य आहेत. विविध संकल्पनांवर काम करताना हे विद्यार्थी आधुनिक डिझाईन तंत्रज्ञानाचा अभ्यास करून आपल्या कल्पनांना प्रत्यक्ष आकार देत आहेत.



**'उद्योजक अभियंते' घडविण्याचा संकल्प-प्राचार्य डॉ. दाळू**

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात अभियंत्यांनी केवळ नोकरीच्या संधी शोधणारे न राहता, समस्या ओळखून त्यावर उपाय शोधणारे, नवकल्पना करणारे आणि रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक म्हणून पुढे यावे, हे महाविद्यालयाचे ध्येय आहे. त्यासाठी अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान, प्रकल्पाधारित शिक्षण, संशोधन, नवीन उपक्रम, तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर आणि विविध कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. 'डिझाईन क्लब'सारखे विद्यार्थी-केंद्रित उपक्रम हे याच शैक्षणिक दृष्टिकोनाचे फलित असल्याचे प्राचार्य डॉ. आर.एस दाळू यांनी सांगितले.

**प्रोत्साहन हीच काळाची गरज-प्रा. प्रणव चेंडके**

अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये केवळ सैद्धांतिक ज्ञान न राहता ते प्रत्यक्ष कृतीत आणण्याची क्षमता निर्माण होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना योग्य दिशा, व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळाले तर त्यांच्यातून निश्चितच नावीन्यपूर्ण प्रकल्प आणि संशोधन पुढे येऊ शकते. याच उद्देशाने मेकॅनिकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'डिझाईन क्लब'ची स्थापना केली आहे.विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करता यावा, त्यांच्या कल्पनांना आकार देता यावा आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करता यावी, यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रोत्साहन देत आहे. डिझाईन क्लब विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना भरारी देणारे प्रभावी व्यासपीठ ठरेल, असा विश्वास अभियांत्रिकी महाविद्यालयाचे इंडस्ट्रियल रिलेशन एंड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. प्रणव चेंडके प्रा. प्रणव चेंडके यांनी व्यक्त केला.

**विद्यार्थिनींच्या कल्पनांना स्वतंत्र व्यासपीठ 'देवी'**

अभियांत्रिकी क्षेत्रात मुलींचा सहभाग वाढविण्यासोबतच त्यांच्यातील नेतृत्वगुण, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वासाला चालना देण्यासाठी श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'देवी क्लब' या स्वतंत्र विद्यार्थी-केंद्रित व्यासपीठाची स्थापना केली आहे. विविध विभागांतील केवळ विद्यार्थिनींचा सहभाग असलेल्या या क्लबच्या माध्यमातून मुली विविध संकल्पना, तांत्रिक प्रकल्प आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांवर काम करीत आहेत.हा उपक्रम अभियांत्रिकी शिक्षणातील महिला सक्षमीकरणाचे प्रभावी उदाहरण असल्याचे मत मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी व्यक्त केले.

# क्रेडिट कार्ड कंपन्या वि युपीआय..

(**पा**डगावकरांची क्षमा मागून)....मी माझ्या बँक अकाउंटमधून यूपीआयमार्फत त्याच्या अकाउंटमध्ये पैसे ट्रान्स्फर केले;त्याने अजून तिसऱ्याच्या अकाऊंट मध्ये यूपी आय वापरून पैसे पाठवले तर तुझे काय गेले? त्याच्या आणि तिच्या पलीकडील जो तिसरा माणूस आहे तो आहे गल्लीतील दादा. भोचकपणा करणारा. तो म्हणतो. मी तुम्हाला अडवणार!

युपीआय मार्फत होणाऱ्या व्यवहारांवर तूर्तास कोणतेही शुल्क नाही.ते लावले जाऊ शकते याचे सूतोवाच केंद्र सरकारने मागच्या आठवड्यात केले आहे.त्यावर या आणि त्या बाजूने बऱ्याच चर्चा सुरू आहेत.केंद्र सरकारने जे वरील संकेत दिले आहेत त्यावर अमेरिकेचे दडपण आहे अशा चर्चा आहेत. त्याचीच शहानिशा..

गेली अनेक दशके क्रेडिट कार्ड मार्फत पेमेंट प्रणाली भारतातील शहरी मध्यम/ निम्न मध्यम वर्गात रुजली आहे.त्याचे अजून खोलीकरण करता येईल म्हणून क्रेडिट कार्ड कंपन्या जोमदार मार्केटिंग करत असतात.पण दहा वर्षांपूर्वी देशात युपीआय मार्फत पेमेंट प्रणालीने मुसंडी मारली. इतकी की क्रेडिट कार्ड कंपन्यांच्या धंद्याचा वाढीचा वेग मंदावला.

जगभरात क्रेडिट कार्ड बाजारावर व्हिसा,मास्टरकार्ड आणि अमेरिकन एक्सप्रेस या तिन्ही अमेरिकन कंपन्यांची पकड आहे. युपीआय मुळे त्यांचा भारतातील धंद्यावर विपरीत परिणाम झाला आहे त्यांची तक्रार. यासाठी सर्वात निर्णायक कारण सांगितले गेले ते युपीआयची सतत वाढणारी लोकप्रियता. आणि युपीआयच्या वाढत्या लोकप्रियतेचे कारण सांगितले गेले ते त्यावर कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

कारण क्रेडिट कार्ड वापरून पेमेंट केले की दोन ते अडीच टक्के शुल्क (मर्चंट डिस्कॉउंट रेट) विक्रेत्यांवर लागते.ती शुल्काची रक्कम विक्रेते ग्राहकांकडून वसूल करतात.युपीआय वापरताना कोणालाच कसलेच शुल्क भरावे लागत नाही.साहजिकच क्रेडिट कार्ड युपीआय बरोबर (किमान) शुल्काच्या बाबतीत स्पर्धा करू शकत नाही. क्रेडिट कार्डची स्वतःची काही सामर्थ्य स्थळे आहेत ती वेगळी.

अमेरिकन क्रेडिट कार्ड कंपन्यांची भारताबाबतची दखल अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधीच्या (USTR) २०२६ अहवालात घेतली गेली.युपीआय निःशुल्क असल्याने अमेरिकन क्रेडिट कार्ड कंपन्यांना स्पर्धा करण्यात अडथळा येतो,म्हणून त्याला अयोग्य किंवा unfair trade practices ठरवले गेले आहे. याचे टायमिंग लक्षात घ्यावयास हवे. अमेरिकेबरोबर व्यापार कराराच्या वाटाघाटी कधी थंड कधी गरम अशा पद्धतीने सुरु आहेत. व्यापार कराराच्या कलमांव्यतिरिक्त अनेक गोष्टीबाबत मागण्या वाटाघाटींच्या टेबलवर आणल्या जातात.त्यात युनोमध्ये कोणत्या ठरावावर मतदान करायचे किंवा नाही करायचे , जगतिक पातळीवर कोणाशी संबंध ठेवायचे इथपर्यंत समावेश असतो.



डिजिटल पेमेंट प्रणालीबाबत अमेरिकेने ब्राझीलवर देखील दडपण आणले आहे. PIX या नावाने अशीच डिजिटल पेमेंट सेवा ब्राझीलमध्ये २०२० मध्ये सुरु केली गेली. पिक्स आणि युपीआय मध्ये बरीच साधर्म्ये आहेत. पिक्स ब्राझीलच्या केंद्रीय बँकेने (सेंट्रल बँक) सुरु केली. अर्थात त्याची मालकी सार्वजनिक आहे. ती २४ तास ३६५ दिवस सुरु असते. ती देखील निशुल्क आहे. अल्पावधीत लोकप्रिय होऊन तिचे आता २० कोटी ग्राहक झाले आहेत. ब्राझील देशातील पेमेंट पैकी अर्धा हिस्सा पिक्स मार्फत होत असतो.त्यामुळे अमेरिकन क्रेडिट कार्ड कंपन्यांना स्पर्धा करता येत नाही असाच आरोप करत अमेरिकेने पिक्स पेमेंट प्रणालीत सुधारणा करण्यासाठी ब्राझीलवर दडपण आणले. काही दिवस वाटाघाटी देखील सुरु होत्या.ब्राझील बधत नाही असे दिसून आल्यावर अमेरिकेने २२ जुलैपासून शिक्षा म्हणून ब्राझीलमधून येणाऱ्या विशिष्ट वस्तुमालवर २५ टक्के आयात कर लावला आहे. पुन्हा तेच फेमस आयात कर अस्त्र!

मुद्दा अमेरिकन क्रेडिट कार्ड कंपन्या वि युपीआय एवढ्याच पुरता मर्यादित नाही. युपीआय व्यवहारातील ८० टक्के वाटा जीपे आणि फोनपे या दोन कंपन्यांचा आहे. ज्या दोन्ही अमेरिकन कंपन्या आहेत. मक्तेदारी तयार होऊन स्पर्धेचा लोप होऊ नये म्हणून NCPI ने मध्यंतरी जास्तीत जास्त मार्केट शेयर ३० टक्के असावा असे ठरवले. तो निर्णय जीपे/ फोनपे यांना रुचणार नव्हता.सध्या तो काही महिन्यांसाठी स्थगित केला आहे. कारणांची कल्पना करू शकतो. सर्वात महत्त्वाचा मुद्दा असणार आहे. डेटा कोणाच्या कंट्रोल मध्ये असणार, त्याला डेटा लोकलायझेशन म्हणतात. भविष्यात देखील तो डेटा भारतातील सर्व्हर वरच राहिला पाहिजे.

धूर असेल तर कोठेतरी आग असतेच असते!युपीआय संबंधित कायद्यात सुधारणा, त्यावर शुल्क आकारण्याचा प्रस्ताव या साऱ्या उजेडात बघितला की अधिक अर्थ लागतील.

**संजीव चांदोरकर**

---

**शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला. सगळे आंदोलक सेलिब्रेट करत होते.ती म्हणाली, 'मी सेलिब्रेट करणार नाही.'आणि माझ्या साथींवर गुन्हे दाखल आहेत,त्याविरुद्ध लढायला निघाली.**

# जेन-झी च्या नेतृत्वाचा आश्वासक चेहरा-नेहा बोरा

**जं**तरमंतरवरच्या विद्यार्थी आंदोलनात उपोषणासाठी बसलेल्या लोकांमध्ये एक हडकुळी, चष्मिश,स्कॉलर टाईप दिसणारी मुलगी होती. तिचे नाव नेहा बोरा आहे हे नंतर समजले. ही इतकी छोटुशी, माझ्या मुलाच्या वयाची मुलगी 'आयसा' (AISA) ह्या विद्यार्थी संघटनेची राष्ट्रीय अध्यक्ष आहे आणि ती वीसेक दिवस उपोषण करत आहे हे बघून कौतुक वाटले होते तेंव्हा.

मग तिच्याविषयी जरा माहिती शोधली.तिचे वडील सैन्यात अधिकारी आहेत. आई-वडील दोघेही पक्के भाजप समर्थक आहेत.मात्र ही मुलगी आपल्या आईवडिलांच्या इच्छेविरुद्ध,विचारसरणी विरुद्ध रस्त्यावर उतरून आपल्या आणि इतर विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आंदोलन करते आहे.तीही शांततामय मार्गाने, कायदेशीर चौकटीत राहून.





जंतरमंतरवरच्या आंदोलनामुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान ह्यांनी राजीनामा दिला.तो आपला विजय झाला हे समजून बहुसंख्य आंदोलक सेलिब्रेट करायला लागले.त्यावेळी नेहा जे बोलली ते जगावेगळे होते. ती म्हणाली की 'मी सेलिब्रेट करणार नाही. देशभर अनेक राज्यांमध्ये विद्यार्थी आंदोलकांवर, माझ्या साथींवर, गुन्हे दाखल केलेले आहेत. त्याविरुद्ध मी लढायला चालले आहे.'

एखादे आंदोलन झाल्यावर घाईत पुढे जाणारे अनेक 'नेते' असतात.पण मागे राहिलेल्यांबद्दल कळकळ असणारी व्यक्ती दुर्मिळ असते.ती व्यक्ती नेहा आहे असे जाणवले.दोनेक आठवड्यांनी ती झारखंडमध्ये गेली. तिथे आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांना समर्थन दिले. त्यांच्या मोर्चात सहभागी झाली.तिथे कोणीतरी तिच्या तोंडावर शाई फेकली.

त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ती म्हणाली की 'मी ही शाई पुसणार नाही, अभिमानाने बाळगणार आहे.पेलेट गन्स आणि अश्रुधूराचा मारा आम्हाला थांबवू शकला नाही, तर ही शाईफेक काय थांबवणार आहे.'हाच तो नव्या पिढीच्या नव्या नेतृत्वाचा आश्वासक चेहरा!तिच्याकडे बघताना मला सुरेश भटांचा एक शेर आठवत रहातो;

**ते लोक होते वेगळे, घाईत**
**जे गेले पुढे**
**मी मात्र थांबुन पाहतो, मागे**
**किती जण राहिले!**

**- प्रसाद शिरगावकर**

(बाकी एका विशीतल्या तरुणीच्या तोंडावर शाई फेकताना 'जय श्रीराम' घोषणा देणाऱ्या व्यक्तीला प्रभू श्रीरामही माफ करतील ह्याची काहीही शक्यता मला दिसत नाही.)

---

## त-ड-का

### गुंगी व गुंगारा..!

कुणाला आलीय गुंगी
व कोन देतोय गुंगारा
जनते पुढे हाच पडलाय
आज यक्ष प्रश्न खरा..!

गुंगारा देणारा धुर्त
साधून घेतो डाव
बाकी करत राहतात
नंतर फक्त कावकाव..!

लोकांचे प्रश्न सोडविण्या
कुणीच दिसेना आग्रही
तू-तू मै मै च्या वादात
खिळ
विकास कार्याला बसते
की नाही?..



**- प्रा.अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

---

# अंबाड्याच्या आध्यात्मिक वैभवाचे अधिष्ठानःपरमहंस श्री मुदगलभारती महाराज

**आ**ध्यात्म, समता आणि लोककल्याणाचा संदेश देणारे संतश्रेष्ठ संत स्वामी परमहंस श्री मुदगलेश्वर भारती महाराज होय. श्री मुदगलेश्वर भारती महाराज हे प्रथम काशीवरून माहूरगडाला आलेत,श्री.दत्तात्रेय प्रभू यांचे कडून माहूर गडावर त्यांना भारती संन्यास श्रमाची दिक्षा मिळाली व तेथून ते कपिलेश्वर महाराजांचे शिवाचे स्थान असलेल्या मौजा. खेड ता.मोर्शी ग्रामानजिक चारगड नदीच्या काठी रम्य ठिकाणी इ.स. १६५० मध्ये येऊन १२ वर्ष तपश्चर्या करीत बसले होते. तेथे भगवान प्रसन्न होऊन त्यांना भगवान शिवाचा प्रसाद मिळाला.

त्या काळात वऱ्हाडात अचलपूर हा जिल्हा होता व त्यातील करजगाव परगणा असून या परगण्यातील अंबाडा हे गाव जीवनी नदीच्या काठावर वसलेले होते, त्या काळात अंबाड्यास शाह सरवर अली शाह (शासरअली अवलिया) नावाचे साक्षात्कारी फकीर अवलिया राहत होते, त्यांच्या गावातील लोकांमध्ये फार मोठा मान होता व या अवलियास नाना तऱ्हेच्या सिद्धी अवगत होत्या. त्यांनाही मुदगलेश्वर महाराजांनी या सिद्धी जनकल्याण्यासाठी नाहीत,तर फक्त चमत्कार दाखविण्यासाठी उपयोगी आहेत व जनतेच्या आत्मसाक्षारासाठी निसिद्ध आहे हे सप्रमाण पटवून दिले.तेव्हापासून शहासरवर अली शहा अवलिया यांना सुद्धा मुदगलेश्वर महाराजाच्या अधिकाऱ्याची महती मनोमन कळली.

स्वामी मुद्गलभारती महाराजांनी शके १५७२ ई.स.१६५० साली जिवनी नदीच्या समोरील टेकडीवर झोपडी बांधून अखंड धुनी लावून वास्तव्य करीत असे. ते नित्यनियमाने दररोज ब्रह्मामुहूर्तावर उठून नदीवर स्नानास जात असत. तीर्थावर असलेल्या मोठ्या डोहावर स्नान करून लागूनच असलेल्या टेकडीवर ध्यानधारणा करीत असे.सध्या डोहाच्या जागेवर धरणाची भिंत बांधल्या गेली आहे.तलावाच्या टेकडीवर महाराजांनी धुनी मात्र अजूनही कायम आहे.एवढी महाशक्ती महाराजांच्या ठायी वास करीत होती. या व्यतिरिक्त निजाम सरकारने सन १८७० मध्ये मंदिरास मदत म्हणून शेत ईनाम करून दिले. आजही शेती मुदगलेश्वर महाराज संस्थानच्या तब्यात असून संस्थान त्याचा उपभोग घेत आहे.

कालांतराने जुन्या अंबाडा गावी महाराज वास्तव्य करीत असतांना रोगराईमुळे गाव ओसाड झाले व गावातील लोक जुने अंबाडा गाव सोडून निघून जायला निघाले.मुदगलेश्वर महाराजांनीच जुने गाव तेथून हटवून सध्या असलेल्या स्थानी गाव सिमेची आखणी करून त्याअंतर्गत नवीन अंबाडा गाव वसविले. ओसाळ अंबाडा गावाचे ठिकाणी आजही महानूभाव पंथाचे तीर्थस्थान, हनुमान मंदिर ,अप्सरा मंदिर, महाराजांची जुनी व ध्वज या खुदा जुन्या अंबाडा गावाची अस्तित्व दर्शवितात.



श्री स्वामी मुदगलेश्वर महाराजांनी अंतिम क्षणी निर्देशित केले की,त्यांच्या समाधीस्थानाच्या पूर्व दिशेला वास्तव्य करणाऱ्यांचे कल्याण होईल.त्यांनी भाकीत केल्यानुसार आजमितीस अंबाडा गावची, वस्तीची भरभराट होत आहे, अशा प्रकारे महाराज, त्यांचे कार्य पूर्ण केल्यानंतर शके १६२२ इ.स. १७०० मध्ये श्रावण शुद्ध चतुर्थी दिनी झोपडीचे जागेवर समाधीस्थ झाले.शेवटचे क्षणापर्यंत सर्व जनतेचे कल्याण करून ते आपला देह परोपकारस कष्टवित गेले.

इ.स. २००८ मध्ये मठाच्या जिर्णोद्धाराचे कार्य संस्थेच्या कार्यकारी मंडळ व गावकरी यांनी पूर्णत्वास नेले.२८ जुलै २००८ला सोमवारी श्रावण शुद्ध चतुर्थीस स्वामी परमहंस मुदगलेश्वर महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.हजारो लोकांनी या कार्यक्रमास सहभाग घेतला.या कार्यक्रमासाठी १५००० भक्तगणाकरिता पुरणपोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. श्री संत मुदगलेश्वर महाराजांच्या मंदिरात खालील देवांगणाचे दर्शन सर्व भक्तांना घडले.

श्री संत स्वामी परमहंस मुदगलेश्वर महाराजांची मूर्ती, त्यांचे समोर समाधी, श्री.प्रभू दत्तात्रेय मूर्ती, श्री. संत मुदगलेश्वर महाराजांचे शिष्य श्री संत रामभारती महाराज यांची समाधी, समाधीचे समोर हनुमानजीची मूर्ती, श्री.प्रभू रामसिता, लक्ष्मण, बालाजी यांच्या मुर्त्या,गणपती,शिवलींग,नंदी त्याचप्रमाणे दरबाराच्या आतील गाभाऱ्यात हनुमानजीचे उजव्या हातावर ईशान्य दिशेला युगदेवतांची स्थापना केली आहे.

मंदिराचे जिर्णोद्धार बांधकामात समाधीस्थळ, आध्यात्मिक कार्यक्रमासाठी भव्य सभागृह, महाप्रसादाकरिता सुविधासह स्वयंपाकगृह, पुण्यतिथी महोत्सव करिता बसण्याची व्यवस्था,खुल्या जागे करिता शेती खरेदी,खुल्यांचे बांधकाम इत्यादी व्यवस्था उपलब्ध करून दिली.श्रावण शुद्ध चतुर्थीस मंदिरात संजीवन समाधी सोहळा अलोट जनसमुदायाची उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष व कार्यकारिणीतील सर्व ट्रस्टी,गावकरी मंडळी यांचे सहकार्याने आयोजित केला जातो.

यावर्षी परमहंस श्री मुदगलभारती महाराज यांच्या ३२६ वी संजीवन समाधी पुण्यतिथी निमित्त संगीतमय श्रीराम कथेचे आयोजन केले आहे कथावाचक. परमपूज्य श्री श्यामनारायणदासजी महाराज चौबे अमरावती यांच्या सुमधुर वाणीतून श्रीराम कथेचे सुरु आहे हा कार्यक्रम ७ ऑगस्ट ते रविवार १६ ऑगस्ट वेळ दुपारी १ ते ५:३० पर्यंत सुरु राहणार आहे.एकूणच मुदगलेश्वर महाराजांचे जीवन व कार्य या संदर्भातील त्यांच्या चरित्रात्मक आढावा प्रस्तुत वर्णनामधून घेण्यात आला.



**अश्विन सिनकर**
अंबाडा,ता.मोर्शी
जि.अमरावती
९७३०४३०२२०

---

## दीप अमावस्या: मांगल्याचा आणि आनंदाचा सण

श्रावण महिन्याची सुरुवात एका अत्यंत पवित्र सणाने होते, तो सण म्हणजे 'दीप अमावस्या'! हा आपल्या संस्कृतीतील आनंदाचा आणि मांगल्याचा मोठा सण मानला जातो.आपल्या संस्कृतीत दिव्याला खूप मोठे स्थान आहे. दिवा हा अंधार दूर करून प्रकाशाकडे नेण्याचे प्रतीक आहे. दीप अमावस्येच्या दिवशी घरातील सर्व दिवे स्वच्छ धुऊन, तेला-तुपाची वात लावून मनोभावे पूजा केली जातात. घरातील सर्वजण एकत्र येऊन देवाला प्रार्थना करतात की, 'आमच्या आयुष्यातील अंधार दूर होऊन ज्ञानाचा आणि आनंदाचा प्रकाश नेहमी तेवत राहो.' या दिवशी गोडाधोडाचा नैवेद्य दाखवून सर्वजण आनंदाने एकत्र जेवण करतात.या पवित्र दिवसाला काही जण चुकीच्या पद्धतीने 'गटारी' नाव देतात, पण मुळात तो शब्द 'गत आहारी' असा आहे. 'गत' म्हणजे संपलेले आणि 'आहार' म्हणजे खाणे, म्हणजेच श्रावणात आहारावर नियंत्रण आणण्यापूर्वीचा किंवा आहाराची सांगता करणारा हा दिवस होय.

आपल्या संस्कृतीत दिव्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दिवा आपल्या घरात सुख, शांती आणि समृद्धी आणतो, असे मानले जाते.दीप अमावस्या हा सण आपल्या मनातील नकारात्मकता संपवून नवीन सकारात्मकतेने जगण्याची नवी दिशा देतो. जेव्हा घराच्या प्रत्येक कोपऱ्यात लहान-मोठे दिवे प्रज्वलित होतात, तेव्हा संपूर्ण वातावरणात एक वेगळीच प्रसन्नता पसरते.चला तर मग, यंदाच्या दीप अमावस्येला आपल्या घरात आनंदाचा दिवा तेववूया आणि पवित्र श्रावण महिन्याचे स्वागत करूया!

**प्रिया बागडदेव**

---

### सूर्योदय पारधी समाज आदिवासी आश्रम शाळा खामगांव येथे

# सरसंघचालकांच्या उपस्थितीत पारधी समाजाच्या उत्कर्ष पर्वाचा सोहळा

**पा**रधी समाज मुला मुलींच्या शिक्षण आणि स्वावलंबन साठी खामगांव येथे सूर्योदय पारधी समाज आश्रम आदिवासी शाळा कार्यरत असून पारधी समाज विद्यार्थ्यांच्या उत्कर्ष पर्वाचा सोहळा सरसंघचालक डॉ.मोहनराव भागवत यांच्या उपस्थितीत खामगांव येथे संपन्न झाला आहे.महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके व कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर या प्रसंगी उपस्थिती होते. डॉ.मोहनराव भागवत यांनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यां सोबत संवाद साधला तसेच कलागुणांना वाव देणारे क्रीडांगण आणि प्रेषकगृहाचे लोकार्पण सुद्धा केले.

श्री सद्गुरूदत्त ट्रस्टचा पुढाकार महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भात पारधी समाज मोठ्या प्रमाणात आहे. दुर्लक्षित असलेल्या पारधी समाजा कडे शिक्षणाची सोय तर सोडाच साधे आधार कार्ड किंवा रेशन कार्ड सुद्धा नव्हते शिक्षणापासून कोसो दूर व उपेक्षित असलेल्या पारधी समाजाच्या उत्थानासाठी मध्यप्रदेश व महाराष्ट्रात विविध सेवा प्रकल्प







तथा समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या श्री सद्गुरू दत्त धार्मिक व पारमार्थिक ट्रस्ट इंदोर यांनी पुढाकार घेऊन खामगाव येथे सर्वोदय पारधी समाज आश्रम शाळा वर्ष २००८ मध्ये सुरू केली.याच काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरीष्ठ प्रचारक सुनील देशपांडे यांचा संस्थेला परिसस्पर्श होऊन संघ कार्याची नवीन दृष्टी मिळाली. एखाद्या संस्थेला संघ कामाची दृष्टी मिळाल्यास संस्थेमध्ये काय बदल होतात कसा उत्कर्ष होतो याच आदर्श उदाहरण पारधी समाज आश्रमशाळा आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव सजनपुरी येथे सत्तावीस एकराच्या निसर्गरम्य जागेवर आज पहिली ते दहावी पारधी समाज निवासी आश्रम शाळा उभी आहे. पारधी समाजातील मुलामुलींना शिक्षण सोबतच स्वावलंबी प्रशिक्षण देणारा प्रकल्प महाराष्ट्रात नावलौकिकास प्राप्त ठरला आहे. श्री सद्गुरू दत्त धार्मिक ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ. आयुर्षी देशमुख तेथील मुलामुलींना आईच्या मायेने जीव लावतात तसेच शाळेचो मुख्याध्यापक सुचित राठोड हे संस्थेचे केवळ सेवक नव्हे तर एक कुटुंब प्रमुख म्हणून तेथे सेवा देतात.निवासी असलेल्या आश्रमशाळा भोजन पासून वैद्यकीय सेवा सुद्धा त्यांना आसाम शाळेतचा देण्यास येतात अनमोरायेस फाउंडेशचे उत्तरदायित्व पुणे हडपसर येथे अमनोरा येस फाउंडेशन प्रसिद्ध सामाजिक सेवा संस्था असून त्याच वंचित व दुर्लक्षित समाजाच्या उत्थाना साठी शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण क्षेत्रात भरीव काम आहे तसेच त्यांच पर्यावरण आणि पाणी संवर्धन गरीब व वंचित समाज घटकांसाठी विविध शिबिरे, सामाजिक उपक्रम राबवले जातात. आरोग्य शिबिरा द्वारे मोफत तपासणी, औषधे सुद्धा वितरीत केले जातात.अमनोरा येस फाउंडेशन सिटी ग्रुप पुणे संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांनी वर्ष २०१४ मध्ये उपरोक्त आश्रम शाळेचे उत्तरदायित्व स्वीकारले आहे.त्यांच्या सोबतीला विवेक कुलकर्णी सेवाभावी प्रवृत्ती उभे असतात.सतत दुर्लक्षित असलेल्या पारधी समाजातील मुलामुलींना शिक्षणा द्वारे राष्ट्रीय मुख्य प्रवाहा मध्ये आणण्या साठी आपल्या महापुरुषांचे स्मरण करण्याचे कार्यक्रम घेतले जातात. प्रयत्न आहे. तसेच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण सोबत त्यांच्यामधील सुप्त गुणांना विकसित करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविले जात असतात.

श्री सद्गुरू दत्त धार्मिक एवंम पारमार्थिक ट्रस्ट अध्यक्षा डॉ. आयुषी देशमुख व अनमोरा येस फाउंडेशन प्रमुख अनिरुद्ध देशपांडे दोघेही गीते मधील निष्काम कर्म या शुद्ध भावनेमधून आश्रम प्रकल्प चालवित आहेत. आता आश्रम शाळा मध्ये जवळपास ७०० विध्यार्थी असून त्यांना शिक्षणा सोबत स्वावलंबी व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण दिले जाते.सर्वात महत्वाची बाब म्हणजे आश्रम शाळे मधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी शासकीय, निमशासकीय आणि पोलिस नोकरी करीत असून संरक्षण क्षेत्रात देशसेवा करीत आहेत.हॉलीबॉल सह वेगवेगळ्या खेळा मध्ये प्राविण्य मिळवून विभाग तथा राज्य स्तरावर सुद्धा विद्यार्थ्यांनी पारधी समाज आश्रम शाळेला नावलौकिक मिळाला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक संघ स्थापने पासूनच समाजाच्या विविध आघाड्यांवर सामाजिक काम करत आहे. अत्यंत दुर्गम भागातील जनजाती समाज,घुमुंतु समाज यांच्या वस्त्या,पाडे आणि तांडे येथे जाऊन सेवा कार्य करीत आहेत. संघाचे उच्च शिक्षित स्वयंसेवक जेथे विजेचे खांब पोहचले नाहीत किंवा बैलगाडी जाण्यास रस्ता नाही अशा ठिकाणी जाऊन घुमंतू जनजाती समाजाच्या आरोग्य आणि शिक्षणा कडे लक्ष देऊन आहेत.त्यामुळेच ख्रिश्चन मिशनरीच्या बाटवाबाटवीला लगाम लागला आहे. खामगाव येथील सर्वोदय पारधी समाज आदिवासी आश्रम शाळा सज्जनशक्तींनी एकत्र येऊन पारधी समाजाच्या उत्थाना केलेला प्रयोग आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक सुनील देशपांडे यांची संघ दृष्टी तथा मार्गदर्शन आणि डॉ आयुषी देशमुख, अनिरुद्ध देशपांडे यांचे निष्काम कर्म ईत्यादि मुळे खामगांव सजनपुरी येथील पारधी समाज आदिवासी शाळा उत्तरोत्तर प्रगती करीत आहे.

**अशोक राणे**
भ्र.९४२३६५८३८५

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# शिंदेंच्या शिलेदाराच्या उपोषण मंडपावर मनपाचा 'सर्जिकल स्ट्राईक'!

**सागर भारुकांचे साहित्य जप्त; फलक हटविले;**
**शिवराय, भगतसिंगांच्या प्रतिमांच्या विटंबनेचा गंभीर आरोप**
**पवन महल्लेंचे थेट आव्हान; '१५ दिवस आमरण उपोषण करून दाखवा!'**



■ प्रतिनिधी | अकोला ■

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत १५ दिवसांसाठी निलंबित करण्यात आलेले शिंदे सेनेचे नगरसेवक सागर भारुका यांनी निलंबनाच्या निषेधार्थ मनपाच्या प्रवेशद्वारासमोर पुकारलेल्या उपोषणाने मंगळवारी महापालिकेतील राजकीय वातावरण चांगलेच तापले. उपोषण मंडपातील विद्युत पुरवठा खंडित केल्यानंतर मनपा कर्मचारी व पोलिसांनी मंडपात धडक देत साहित्य जप्त केले. आंदोलनाचे फलकही हटविण्यात आल्याने भारुका यांनी संताप व्यक्त केला. या कारवाईवरून आता आरोप-प्रत्यारोपांची 'जुगलबंदी' सुरू झाली आहे.

मदर डेअरीच्या स्टॉलसाठी देण्यात येणाऱ्या जागेच्या मुद्द्यावरून झालेल्या सर्वसाधारण सभेत भारुका यांनी विरोधाची भूमिका घेतली होती. सभागृहात मोठ्या आवाजात आणि अयोग्य पद्धतीने बोलल्याचा आरोप करीत महापौर शारदा खेडकर यांनी ६ ऑगस्ट रोजी भारुका यांना १५ दिवसांसाठी निलंबित केले. या कारवाईविरोधात तसेच मदर डेअरीच्या जागेच्या निर्णयाच्या निषेधार्थ भारुका यांनी मंगळवारी मनपा प्रवेशद्वारासमोर एकदिवसीय उपोषण सुरू केले.

उपोषणस्थळी ध्वनिक्षेपक लावण्यात आला होता. त्याचा आवाज मनपा परिसरात येत असल्याने कर्मचाऱ्यांना त्रास होत असल्याचे सांगण्यात आले. दुपारी साडेबाराच्या सुमारास मंडपाचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर भारुका यांनी जनरेटरच्या माध्यमातून ध्वनिक्षेपक सुरू केला. काही वेळातच मनपा कर्मचारी व पोलिस कर्मचारी आंदोलनस्थळी दाखल झाले. मंडपातील साहित्य ताब्यात घेण्यात आले, तर आंदोलनस्थळी लावण्यात आलेले फलकही हटविण्यात आले.

एका सर्वसाधारण सभेतील शाब्दिक संघर्षातून सुरू झालेला वाद आता थेट उपोषण मंडपाच्या कारवाईपर्यंत पोहोचला आहे. भारुका यांचे निलंबन, मदर डेअरीचा जागेचा मुद्दा, ध्वनिक्षेपकाचा आवाज आणि त्यानंतर मंडपातील साहित्य जप्ती यामुळे महापालिकेतील सत्ताधारी आणि विरोधी गटातील संघर्ष उघडपणे रस्त्यावर आला आहे. आता भारुकांच्या आरोपांवर मनपा प्रशासन काय भूमिका घेते आणि पुढील राजकीय 'डाव' कोणता पडतो, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

### 'शिवरायांच्या मूर्तीची विटंबना'; भारुकांचा खळबळजनक आरोप

कारवाईनंतर सागर भारुका यांनी मनपा प्रशासनावर गंभीर आरोप केले. आपण शांततेच्या आणि लोकशाही मार्गाने उपोषण करीत असताना मनपा कर्मचारी व पोलिसांनी मंडपात घुसून कारवाई केली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची तसेच क्रांतिकारक भगतसिंग यांच्या छायाचित्राची विटंबना झाल्याचा आरोप त्यांनी केला.

याशिवाय आंदोलनस्थळी लावलेल्या होर्डिंगवरील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या छायाचित्राचीही विटंबना केल्याचा आरोप भारुका यांनी केला. 'या कारवाईचा बोलविता धनी कोण?' असा सवाल उपस्थित करीत त्यांनी मनपा प्रशासनावर निशाणा साधला.

### 'हे कसले उपोषण?'; महल्लेंचा घणाघात

भारुकांच्या आंदोलनावर भाजपचे गटनेते पवन महल्ले यांनी जोरदार हल्लाबोल केला. 'हे कुठल्या प्रकारचे आंदोलन आहे, हे अकोलेकरांना चांगले माहीत आहे,' असा टोला लगावत त्यांनी भारुकांना १५ दिवस आमरण उपोषण करून दाखविण्याचे थेट आव्हान दिले. देशासाठी लढलेल्या सैनिकांच्या विरोधात भूमिका घ्यायची आणि देशभक्तीची गाणी लावून आंदोलन करायचे, ही भूमिका जनतेच्या लक्षात येत असल्याचे महल्ले यांनी म्हटले. गुटखा-तंबाखूचे सेवन करीत देशभक्तीची गाणी लावून उपोषणाला बसणे अशोभनीय असल्याची टीकाही त्यांनी केली.

'कोण पैसे खात आहे, कोण प्रश्न विचारत आहे आणि कोण मूग गिळून गप्प बसले आहे, हे जनतेला माहिती आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी प्रश्न उपस्थित करणाऱ्या व्यक्तीचे निलंबन योग्यच आहे,' असा घणाघाती पलटवार महल्ले यांनी केला.

---

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. २रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांच्या न्यायालयात**
**'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'**
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट व क्र. २

दावा रु. /-
नि. दि.दा.नं.३७१/ २०२५
चौ. ता.: २८/०८/२०२६

**साई कन्स्ट्रकशन ... विरुध्द ... रमेश**

**बनाम :-** 1.Shri. Ramesh Bakade 2. Smt. Shabupta Yasmin Mohd. Raik Both R/o- 1743 Kalal ki Chawl, Akola Tq. Dist. Akola

ज्याअर्थी वादी यांनी ' SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT' यासाठी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे. की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र.प्रस्तु.-२/कावि-१४९६/२०२६ दिनांक ३०.०७.२०२६

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यांत येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनाक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म मृत्यु नोंदणी करीता अर्जदार संतोष उत्तमराव सुर्यवंशी, देशमुख फैल दुर्गा चौक अकोला यांचे आजोबा नागे मारोती लक्ष्मण सुर्यवंशी यांचा मृत्यु अकोला येथे दिनांक २१.०७.१९७९ रोजी झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग अकोला महानगरपालिका, अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, संतोष उत्तमराव सुर्यवंशी, देशमुख फैल दुर्गा चौक अकोला यांचे आजोबा जामे मारोती लक्ष्मण सुर्यवंशी यांच्या मृत्युची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हथा कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्थळ : -अकोला
दिनांक :-

शिक्का

**कुणाल झाल्टे**
तहसिलदार अकोला

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९७/२०२६ प्रोसेस नं.८९३/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ दिनांक : १५/०७/२०२६

**अर्जदार :** १. पुष्पा माणिकराव बराटे वय ६३ वर्षे धंदा - घरकाम २. नितेश माणिकराव बराटे वय ४३ वर्षे धंदा - शेती नं. १ व २ रा. देउळगांव ब्राम्हण ता. पातुर जि. अकोला ३. कोमल गोपाल तराळे वय ३६ वर्षे धंदा - घरकाम रा. शहापूर ता. खामगांव जि. बुलढाणा ४. शीतल निलेश घेंगे वय ३९ वर्षे धंदा - घरकाम रा. मोखा ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : माणिकराव चंद्रभानजी बराटे
**पत्ता :-** रा. देउळगांव ब्राम्हण ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत माणिकराव चंद्रभानजी बराटे यांचा मृत्यु दि. ०२/१२/२०२५ रोजी ओझोन हॉस्पिटल अकोला ता. जि. अकोला येथे झाला. तसेच मयताचे आई नामे भिकाबाई चंन्द्रभानजी बराटे त्यासुध्दा दि.०५/०३/१९६९ रोजी मयत झाल्या आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :-
पातुर

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

---

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२८५/२०२६ प्रोसेस नं.१०१८९/२०२६
चौ.ता. १७/०९/२०२६ दिनांक : ०७/०८/२०२६

**अर्जदार :** १. फरीदा बानो नजीर अहेमद रा. व्दारा राशीद खान मेहबुब खान, खदान, जेतवन नगर, अकोला. मो नं. ९०२१८४८७४९ २. आफरीन्निसा जहूर अहेमद रा. रमाबाई आंबेडकर नगर, शिवनी, ता. जि. अकोला. ३. मुबीन अहमद नजीर अहमद रा. मुल्लानी चौक, मोहम्मदीया मस्जीद के पास, खदान, चांदूर, गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. जुनेद अहमद नजीर अहमद रा. मुल्लानी चौक, खदान, खदान, चांदूर, गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला. ५. अब्रार अहेमद नजीर अहेमद रा. मुल्लानी चौक, खदान, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९०२८४८०३१३

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नजीर अहेमद शेख इब्राहीम
**पत्ता :-** रा. जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नजीर अहेमद शेख इब्राहीम यांचे दि. १७/११/२०२१ रोजी मुल्लानी चौक, खदान, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२७०/२०२६ प्रोसेस नं.९८३४/२०२६
चौ.ता. ११/०९/२०२६ दिनांक : ३१/०७/२०२६

**अर्जदार :** १. प्रशांत विश्वासराव गावंडे रा. केशव नगर समोर, विद्युत कॉलनी, पाण्याच्या टाकीमागे, गांधी नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. प्राजक्ता अतुल देशमुख रा. ०४, लक्ष साई गार्डन, बायरासांद्रा मेन रोड. जी. एम. पाल्या, बॅंगलोर नॉर्थ, न्यु थिप्पासांद्रा बॅंगलोर, कर्नाटक. ३. सौ. वैजंती विजय देशमुख रा. लोखंडे हॉस्पिटल बाजुला, सर्कस ग्राउंड जवळ, रामनगर, वर्धा, ता. जि. वर्धा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विश्वासराव रामराव गावंडे २. विमल विश्वासराव गावंडे
**पत्ता :-** रा. केशव नगर समोर, विद्युत कॉलनी, पाण्याच्या टाकीमागे, गांधी नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विश्वासराव रामराव गावंडे यांचे दि. २९/१२/२०१८ रोजी व मयत विमल विश्वासराव गावंडे यांचे दि. २१/०६/२०२४ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०८/२०२६ प्रोसेस नं.१००५/२०२६
चौ.ता. २१/०९/२०२६ दिनांक : १०/०८/२०२६

**अर्जदार :** १.गंगा वामन भोकरे, वय ४९ वर्ष, धंदा - घरकाम २. हर्षा अजय भोकरे. वय २३ वर्ष, धंदा - घरकाम ३. रुद्रा अजय भोकरे, वय ०३ वर्ष, धंदा- निरंक (अर्जदार क. ३ तर्फे अ.पा.क. अर्जदार क. २ आई ) सर्व रा. गोंधळवाडी, पोस्ट मेडशी, ता. पातुर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : अजय वामन भोकरे
**पत्ता :-** रा. गोंधळवाडी, पोस्ट मेडशी, ता. पातुर जि. अकोला.

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अजय वामन भोकरे यांचे दि. २०/०२/२०२६ रोजी सहारा हॉस्पीटल किटीकल केअर सेंटर, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.'

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- १०/०८/२०२६
पातुर

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

---

**Civil Judge Sr.Dn. Akola**
**IN THE COURT OF Smt. R.N. Bansal**
**3rd Jt Civil Judge Sr.Dn. Akola, Akola, Akola.**

SUMMONS FOR SETTLEMENTOF ISSUES (0.5, R. 1, 5.)

R.C.S./382/2025
Sai Construction And Developers LLP THr. Shanky Rajendrakumar Jaiswal Vs Kashinathappa Shankarappa And 1
NEXT DATE: 04.09.2026

To,
Kashinathappa Shankarappa And 1
R/o. 1791, Kalal Ki Chawl, Akola, Tq. Dist. Akola, AKOLA, MAHARASHTRA

Whereas Sai Construction And Developers LLP THr. Shanky Rajendrakumar Jaiswal has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **04-09-2026 at 11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement

Take notice that, in defast of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of the Court, this 21-07-2026

**3rd Jt Civil Judge**
**Sr.Dn. Akola**

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र.प्रस्तु.-२/कावि-१४९६/२०२६ दिनांक ३०.०७.२०२६

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यांत येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनाक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म मृत्यु नोंदणी करीता अर्जदार संतोष उत्तमराव सुर्यवंशी, देशमुख फैल दुर्गा चौक अकोला यांचे आजोबा नागे मारोती लक्ष्मण सुर्यवंशी यांचा मृत्यु अकोला येथे दिनांक २१.०७.१९७९ रोजी झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग अकोला महानगरपालिका, अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, संतोष उत्तमराव सुर्यवंशी, देशमुख फैल दुर्गा चौक अकोला यांचे आजोबा जामे मारोती लक्ष्मण सुर्यवंशी यांच्या मृत्युची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हथा कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्थळ : -अकोला
दिनांक :-

शिक्का

**कुणाल झाल्टे**
तहसिलदार अकोला

---

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८/२०२६ प्रोसेस नं.८७८/२०२६
चौ.ता. ०३/०९/२०२६ दिनांक : १४/०७/२०२६

**अर्जदार :** १. निर्मला महादेव मानकर वय ७० वर्ष धंदा - घरकाम २. स्वप्नील महादेव मानकर वय ३२ वर्ष धंदा - शेती रा. कढोने वाडी पातुर ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक.
**मयताचा पत्ता :-** मयत : महादेव जयराम मानकर
**पत्ता :-** रा. पातुर ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महादेव जयराम मानकर यांचा मृत्यु दि. १४/०५/२०२६ रोजी पातुर ता. पातुर जि. अकोला येथे झाला. तसेच मयत महादेव जयराम मानकर यांची आई तुळसाबाई जयराम मानकर हया मयताचे लहानपणी मरण पावल्या. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- १४/०७/२०२६
पातुर

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

---

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०६/२०२६ प्रोसेस नं.९८८/२०२६
चौ.ता. १७/०९/२०२६ दिनांक : ०३/०८/२०२६

**अर्जदार :** १. माया रामदास जामकर वय ३९ वर्ष धंदा - घरकाम २. अर्णव रामदास जामकर वय १९ वर्ष धंदा - शिक्षण ३. अदिती रामदास जामकर वय १५ वर्ष धंदा - शिक्षण अ. पा. क. अर्जदार क्र. ०१ आई ४. अंतकला उर्फ विमल नथ्थुजी जामकर वय ६६ वर्ष धंदा - घरकाम नं.१ ते ४ रा.आलेगांव ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास नथ्थु जामकर
**पत्ता :-** रा. आलेगांव ता. पातुर जि. अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास नथ्थु जामकर यांचा मृत्यु दि.०८/०७/२०२६ रोजी एस.एम.बी.टी हॉस्पीटल धामनगांव ता. इगतपुरी जि.नाशिक येथे झाला. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त हरकत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- ०१/०८/२०२६

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

---

## जाहीर नोटीस

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.१०.०७.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल राजिक अब्दुल गफ्फार** त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **०८.१२.१९७०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.**०५.०५.२०२६** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **जवेरिया अनम जमील खान** त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **०५.०६.२००५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.**०१.०७.२०२६** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **तस्लिमा बानो शेख हारुण** लग्नापुवीचे नांव **तस्लिमा बानो शेख भिकू** त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **१५.०८.१९७५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,**
**जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ३७२/२०२६ ने.ता.२१.०९.२०२६

**अर्जदार :** १. ज्ञानेश्वर पांडुरंग वानखडे, वय ६० धंदा - मजुरी
रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. प्रभाकर पांडुरंग वानखडे, वय ५३ धंदा - मजुरी
रा.इंदिरा नगर, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक पांडुरंग भोनाजी वानखडे** यांचा मृत्यू दिनांक **०३.०७.१९९८** रोजी सोनगांव, अंजनगांव सुर्जी येथे झाला. तसेच **मृतक लिलाबाई पांडुजी वानखडे** हिचा दि.**२९.१२.२०१९** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं.३७२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०८.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.**१३.०७.२०२६** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **महेश विठ्ठलराव बेहरे** त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **२४.०९.२०२३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) ------------------------------------------------------------------------

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.०१.०७.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **निशात अंजुम मोहम्मद दानीश** लग्नापुवीचे नांव **निशांत अंजुम मोहम्मद युनूस** त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **०२.०२.२००१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.**२९.०६.२०२६** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्जदाराचे नांव **अनिल रामाजी कुऱ्हाडे** यांनी त्यांच्या मुलाच्या नामे **हर्ष अनिल कुऱ्हाडे** जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **१५.०४.२००९** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि.**१५.०५.२०२६** रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **विद्या राजेंद्र इंगोले** त्यांच्या स्वतःच्या जन्म दाखल्याबाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **१७.०५.१९९६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) | सौ.पद्माताई सं.मेसकर (प्रशासक) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर | श्री.अतुल सा.दारोकर |
| ३) इजाजोद्दीन मो.इनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर | श्री.नंदकिशोर भि.वासनकर |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### दैनिक जनमाध्यमच्या वृत्ताचा इम्पॅक्ट; अचलपूरमध्ये स्कूल बस तपासणी मोहीम

# एका दिवसात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७ स्कूल बसवर कारवाई

## अग्निशमन यंत्र, प्राथमिक उपचार पेटी व सीसीटीव्हीची तपासणी

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित करणारे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये १० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होताच स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेने तत्काळ दखल घेत अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील खाजगी व शासकीय शाळांच्या स्कूल बसची तपासणी मोहीम सुरू केली आहे.

स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी निरीक्षक विजय गराड यांच्या नेतृत्वाखाली चिखलदरा मार्ग, अंजनगाव सुर्जी मार्ग तसेच बैतूल मार्गावर स्कूल बसची तपासणी करण्यात आली. या कारवाईत अवघ्या एका दिवसात शासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७ स्कूल बसवर कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान काही वाहनांकडे आवश्यक कागदपत्रांचा अभाव असल्याचे, तर काही बसमध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवास करत असल्याचे गंभीर प्रकार समोर आले. अचलपूर तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण




भागातून जुळ्या शहरातील विविध खासगी शाळांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी दररोज स्कूल बसने ये-जा करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येक स्कूल बसमध्ये महिला मदतनीसची नियुक्ती आहे का?, विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये बसविणे व घरी उतरविण्याची व्यवस्था केली जाते का, याचीही तपासणी सुरू करण्यात आली आहे.

यासोबतच स्कूल बसची आवश्यक कागदपत्रे,सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशमन यंत्र, प्राथमिक उपचार पेटी, आसन क्षमता आदी सुरक्षा बाबींचीही तपासणी केली जात आहे. पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडूनही या संदर्भात आवश्यक तपासणी केली जात असल्याची माहिती आहे.

**स्कूल बस धोरणाच्या अंमलबजावणीवर भर**

अमरावती जिल्ह्यातील विविध भागांत मागील काही वर्षांत स्कूल बस अपघातांमध्ये विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर शासनाने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी स्कूल बस धोरण व मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. मात्र,अचलपूर तालुक्यातील काही खासगी शाळांकडून या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा मुद्दा दैनिक जनमाध्यम ने आपल्या वृत्तातून मांडला होता.



त्यानंतर वाहतूक नियंत्रण शाखेकडून स्कूल बसची आसन क्षमता, कंत्राटी स्कूल बसचा निर्धारित रंग, शाळेचे नाव, प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तसेच घरापासून शाळेपर्यंतच्या प्रवासाची माहिती यासह विविध नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केली जात आहे.

मोहीम कायम सुरू ठेवण्याची पालकांची मागणी मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर येथे घडलेल्या घटनेनंतर पालक व विद्यार्थी वर्गात सुरक्षिततेबाबत चिंतेचे वातावरण आहे. भविष्यात अचलपूर तालुक्यात अशा प्रकारची दुर्घटना घडू नये, यासाठी स्कूल बसची तपासणी केवळ एक-दोन दिवसांपुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण शैक्षणिक वर्षभर नियमितपणे सुरू ठेवावी, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून होत आहे.

दैनिक जनमाध्यमच्या वृत्ताची तत्काळ दखल घेत सुरू झालेल्या या मोहिमेमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या स्कूल बस चालक व संबंधित व्यवस्थापनाचे धाबे दणाणले असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वपूर्ण ठरत आहे.

---

## संक्षिप्त



### महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात पंडित भातखंडे जयंती साजरी

**अमरावती-**अस्मिता शिक्षण संस्था द्वारा संचालित, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती येथे पंडित विष्णू नारायण भातखंडे यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाची सुरुवात पंडित भातखंडे यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे उपस्थित होत्या.याप्रसंगी म्हणाल्या की पंडित भातखंडे यांनी भारतीय संगीतासाठी केलेले कार्य अमूल्य असून त्यांनी भारतीय संगीताला विकसित करण्यासाठी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ.जगन्नाथ इंगोले, संचालन प्रा.डॉ.सोनाली आसरकर,आभार प्रा.डॉ.गजानन काळे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमोल वाडवे यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला संगीत विभागातील बहुसंख्य विद्यार्थी व महाविद्यालयीन शिक्षक उपस्थित होते.



### विद्युत कामगार पतसंस्थेतर्फे हेमंत निखाडे यांचा गौरव

**अमरावती-**महाराष्ट्र शासनाचा स्व. वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्काराने तिवसा येथील पत्रकार हेमंत निखाडे यांना नुकतेच मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. कृषी सामाजिक राजकीय अशा विविध विषयांवर सातत्याने लेखन करणारे पत्रकार हेमंत निखाडे यांना विद्युत कर्मचारी कामगार सेना सहकारी पतसंस्था अमरावतीच्या वतीने त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्युत कर्मचारी कामगार सेना सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण चिखलकर,प्रतिभा साहित्य संघाचे प्रांताध्यक्ष मंगेश वानखडे, सामाजिक कार्यकर्ता निलेश गाठे व प्रगती माहुरे हे उपस्थित होते.

---

## स्मार्ट मीटरच्या अवाढव्य बिलाने अचलपूर-परतवाड्यात ग्राहक त्रस्त!

### एका महिन्याचे ४ ते ५ हजारांचे वीज बिल भरायचे कसे? ग्राहकांचा सवाल; जुने मीटर पुन्हा बसविण्याची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

महावितरणकडून गेल्या तीन महिन्यांपासून अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील वीज ग्राहकांच्या घरांमध्ये व दुकानांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर अनेक ग्राहकांना अपेक्षेपेक्षा अवाढव्य वीज देयके येत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या असून, यामुळे सामान्य वीज ग्राहक आर्थिक भुर्दंडाने त्रस्त झाले आहेत.

एका महिन्याचे ४ ते ५ हजार रुपयांचे वीज बिल भरायचे तरी कसे?असा सवाल आता अनेक ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीज वापराचे युनिट कमी असतानाही जादा रक्कम आकारली जात असल्याचा आरोप ग्राहकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे स्मार्ट



मीटरच्या जागी जुने मीटर पुन्हा बसविण्याची मागणीही जोर धरत आहे.

अचलपूर तालुक्यात महावितरण विभागाकडून मोठ्या संख्येने स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. दरम्यान,जुळ्या शहरातील अनेक नागरिकांनी लाखो रुपये खर्च करून आपल्या घरांवर सोलर यंत्रणाही बसविली आहे. मात्र स्मार्ट मीटर, सोलर यंत्रणा, रीडिंग, प्रोसेसिंग फी, अर्थिंग तसेच इतर आकारणीमुळे वीज देयकांमध्ये विविध त्रुटी निर्माण होत असल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून करण्यात येत आहेत.

काही ग्राहकांच्या मीटरचे प्रत्यक्ष रीडिंग न घेता मनमानी पद्धतीने बिल आकारण्यात आल्याचा आरोपही करण्यात येत आहे. तसेच टी.डी.,पी.डी.व सिक्युरिटी फीच्या नावावर आकारण्यात आलेल्या रकमेबाबतही ग्राहकांमध्ये नाराजी आहे.या सर्व तक्रारींची तातडीने दखल घेऊन वीज देयकांची तपासणी, चुकीची आकारणी दुरुस्ती आणि ग्राहकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

'स्मार्ट मीटरचे बिल अचूक येत आहे. कार्यालयात येणाऱ्या ग्राहकांच्या वीज देयकासंदर्भातील तक्रारींचे निराकरण केले जात आहे.'

**-संजय खटके**

'राज्यातील वीज विभागाचे खासगीकरण झाल्याने स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सामान्य माणसाची आर्थिक लूट सुरू असल्याचा आमचा आरोप आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरचा मुद्दा अत्यंत गंभीर झाला आहे. याविरोधातील आमचा लढा सुरूच राहणार आहे.'

**-विजय पोटे**

'स्मार्ट मीटरची सक्ती नाही, असे सांगितले जाते; मग जुळ्या शहरात स्मार्ट मीटर लावले कसे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी याबाबत निवेदने देऊन लढा दिला आहे. या प्रश्नावर लवकरच अचलपूरमध्ये मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल.'

**-अमोल गोहाड**

'जुळ्या शहरात स्मार्ट मीटर ग्राहकांच्या घरी त्यांच्या परवानगीशिवाय लावण्यात येऊ नयेत. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर अनेक ग्राहकांना दुप्पट-तिप्पट वीज देयक येत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे सामान्य माणसावर आर्थिक बोजा पडत आहे. महावितरणने स्मार्ट मीटरची पूर्ण तपासणी व दुरुस्ती केल्यानंतरच ते ग्राहकांच्या घरी बसवावेत. यासंदर्भात लवकरच संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे.'

**- श्रीकांत झोडपे**

'जुळ्या शहरातील स्मार्ट मीटरसंदर्भात अनेक ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. येत्या दोन-तीन दिवसांत अचलपूर महावितरण विभागीय कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन जाब विचारला जाणार आहे. ग्राहकांची स्मार्ट मीटरमुळे होणाऱ्या अडचणींतून मुक्तता झाली नाही तर आंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल.'

**-सागर वाटाणे**

---

## 'हर घर तिरंगा' अभियानात अमरावतीकरांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा-आ.प्रविण पोटे पाटील

**अमरावती/का.प्र.**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानात अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन आ.प्रविण पोटे पाटील यांनी केले आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवून राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना व्यक्त करावी, असे त्यांनी सांगितले.

'हर घर तिरंगा' हे अभियान केवळ घरावर राष्ट्रध्वज फडकविण्यापुरते मर्यादित नसून, देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची तसेच राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशाभिमानाची भावना अधिक दृढ करण्याची ही एक महत्त्वपूर्ण संधी आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक घरासोबतच शाळा,महाविद्यालये,शासकीय व निमशासकीय कार्यालये, विविध सामाजिक संस्था आणि संघटनांनीही या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. युवक,विद्यार्थी,महिला,ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन 'हर घर तिरंगा' अभियानाला व्यापक स्वरूप द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

तिरंगा हा भारताच्या सार्वभौमत्वाचा, स्वाभिमानाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली प्रतीक आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने तिरंग्याचा सन्मान राखत राष्ट्रभक्तीची भावना मनामनात जागवावी आणि 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी होऊन देशाच्या गौरवात आपले योगदान द्यावे, असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

## प्रज्ञा प्रबोधिनी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**अमरावती-**प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती संस्थेची वर्ष २०२५-२६ची वार्षिक सर्वसाधारण सभा विवेकानंद छात्रावासातील कर्मयोग सभागृहात झाली. आमसभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अविनाश देशपांडे होते. सुरवातीला सस्थेचे अध्यक्ष अविनाश देशपांडे व सचिव मुकुंद पांडे यांनी दीपप्रज्वलन केले. यानंतर आमसभेचे संचालन अजय देशपांडे यांनी केले. मागील वर्षीच्या आमसभेच्या इतिवृत्ताचे वाचन मुकुंद देशपांडे, उपाध्यक्ष यांनी केले. सनदी लेखापाल सुनिल महाजन यांचे फेरनियुक्तिचा ठराव वर्ष २०२६-२७चे लेखापरीक्षण करण्यासाठी सचिव मुकुंद पांडे यांनी सादर केला व ठरावास अजय देशपांडे यांनी अनुमोदन दिले.वर्ष २०२६-२७च्या जमाखर्चाचे अंदाजपत्रक जयंत देशपांडे, कार्यकारिणी सदस्य यांनी सादर केले.आमसभेने या सर्व कार्यवाहीस एकमताने मान्यता दिली.यानंतर अध्यक्षांचे परवानगीने पारधी विकास परिषदेच्या युवक अभ्यासवर्गाचे वृत्तकथन पारधी विकास परिषदेचे सहमहामंत्री प्रशांत पवार यांनी केले. वैयक्तिक गीत मुकुंद पांडे यांनी गायिले.यानंतर अध्यक्ष अविनाश देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार अमृता वडवेकर, कार्यकारिणी सदस्य यांनी केले.

## ओम शांती मतिमंद विद्यालयात जागृती महिला मंडळाचा सामाजिक उपक्रम



**अमरावती/का.प्र.**

जागृती महिला मंडळाने दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजसेवेचे सातत्य ठेवून रहाटगाव येथील ओम शांती मतिमंद विद्यालयाला भेट देऊन तेथील मुलांना भेटवस्तू व मिठाईचे वाटप केले.विद्यालयाच्या संचालिका इंगोले यांनी त्यांच्या कार्याविषयी थोडक्यात ओळख करून दिली. मतिमंद मुलांना चांगले संस्कार देणे,चांगले शिक्षण देणे व त्यांचे आयुष्य घडविणे हे कार्य तितकेच सोपे नाही.
त्यासाठी त्यांना अनेक सामाजिक समस्येतून जावे लागते.तरी सुद्धा इंगोले सर गेली १६ वर्षापासून हे कार्य निरंतर करताहेत.या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना अजूनही सरकारी अनुदान लागू झालेले नाही. त्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. पण तूर्तास तरी विद्यालयाला लागणारा सर्व खर्च त्यांना स्वनिधीतून करावा लागतो आहे,असे त्यांनी मनोगतातून सांगितले. कार्यक्रमाला जागृती महिला मंडळाच्या सविता डोळके,वर्षा जाधव, मंजुषा जाधव,शुभा देशपांडे,सविता गोमेकर,प्रणिता देशपांडे व अनिता गोमेकर उपस्थित होत्या. संचालन व आभार प्रदर्शन शुभा देशपांडे यांनी केले.

---

## जबाबदाऱ्या पार पाडल्यानेच व्यवस्था सुधारेल

### संत डॉ.संतोष देव महाराज यांचे प्रतिपादन

**अमरावती/का.प्र.**

कुटुंबातील प्रत्येक सदस्याने आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तरच कुटुंब सुरळीत चालते.असे प्रतिपादन परमपूज्य संत डॉ. संतोष देव जी महाराज यांनी केले.सिंधू नगर येथील पूजनीय शिवधारा आश्रमात सुरू असलेल्या श्री शिवधारा झुलेलाल चालिहाच्या २७ व्या दिवशी आयोजित सत्संगात ते बोलत होते.

महाराज म्हणाले की, कुटुंबातील वडीलधारी मंडळी प्रेम, मार्गदर्शन आणि आधार देण्याची जबाबदारी पार पाडतात.ज्या मुलांसाठी वडीलधारी मंडळी आयुष्यभर कष्ट घेतात,त्या मुलांना चांगले शिक्षण मिळण्यासोबतच योग्य संस्कार मिळणे आवश्यक आहे.त्यातूनच वडीलधाऱ्यांचे कष्ट आणि स्वप्ने सार्थकी लागतील. समाजाच्या विकासासाठीही प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे



गरजेचे आहे. सामाजिक अथवा आध्यात्मिक संस्था असोत, त्यांनीही सामाजिक संतुलन राखण्यासोबतच समाजाला योग्य विचारांची दिशा देण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. देश आक्रमकांच्या राजवटीखाली असताना समर्थ गुरु रामदास स्वामींनी गावोगावी व शहरांमध्ये हनुमान मंदिरे आणि व्यायामशाळा उभारण्याचे कार्य केले. शिवधारा आश्रमात मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तज्ञ त्वचारोगतज्ज्ञ डॉ. अंशु चंदक यांनी या शिबिरात रुग्णांची तपासणी करून सेवा दिली.या शिबिराचा अनेक नागरिकांनी लाभ घेतला.

---

## वन्यप्राण्यांच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याने १२ एकर तुरीवर फिरविला ट्रॅक्टर

### निलगाय व हरणांच्या कळपाने उभे पिक उद्ध्वस्त, लाखोंचा खर्च पाण्यात, नुकसानभरपाईची शेतकऱ्याची मागणी

**खल्लार/वार्ताहर**

वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरीवर्ग अक्षरशः हवालदिल झाला आहे. शेतकरी चंदन गायगोले यांनी निलगाय व हरीण या सारख्या वन्य प्राण्याच्या त्रासाला कंटाळून त्यांच्या १२ एकर शेतातील उभ्या तुरीच्या पिकावर ट्रॅक्टर फिरविला. त्यांच्या शेतातील तूर या पिकात निलगाय व हरणांच्या कळपाने धुडगूस घातला. पिकाची मोठ्या प्रमाणात नासाडी झाल्याने हतबल झालेल्या चंदन गायगोले या शेतकऱ्याने अखेर उभ्या तुरीच्या पिकावर ट्रॅक्टर फिरवून पिक मोडून टाकले.

चंदन गायगोले यांनी मोठ्या अपेक्षेने १२ एकर शेतात तुरीची पेरणी केली होती. बियाणे, खते, मशागत, नांगरणी, वखरणी आणि पेरणीसाठी मोठा खर्च झाला. मात्र,गेल्या काही दिवसांपासून निलगाय व हरणांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दिवस-रात्र वन्यप्राणी शेतात घुसून सोयाबीन, तूर आणि इतर पिकांची नासाडी करतात. मात्र याकडे वनविभाग लक्ष का देत नाही? वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.त्याला जबाबदार कोण?

सदर घटनेची वन विभाग व महसूल प्रशासनाने तातडीने दखल घेऊन घटनास्थळी पाहणी करावी १२ एकर तुरीच्या पिकाचा पंचनामा करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून होत आहे. तसेच वन्यप्राण्यांचा शेतातील वाढता वावर रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी आता जोर धरत आहे.



'मोठ्या कष्टाने आणि खर्च करून १२ एकरात तूर पेरली होती. पिक चांगले येत असल्याने यंदा उत्पन्नाची आशा होती. मात्र, निलगाय आणि हरणांच्या कळपाने शेतात घुसून संपूर्ण पिक उद्ध्वस्त केले.अखेर नाईलाजाने ट्रॅक्टर फिरवून पिक मोडून टाकावे लागले. आता दुबार पेरणीसाठी पैसा कुठून आणायचा? शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी आणि वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा.'

**चंदन गायगोले,** शेतकरी

# बहूचर्चित अश्लील व्हिडिओकांड प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमदला जामीन

## अचलपूर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचा दिलासा -सर्व ८ आरोपी जामिनावर

**परतवाडा/प्रतिनिधीः-** गेल्या काही महिन्यापूर्वी जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या अल्पवयीन मुलींच्या शोषण आणि अश्लील व्हिडिओ प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याला अचलपूरच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.अचलपूर जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक- १ मध्ये झालेल्या सुनावणीनंतर अयान अहमदला जामीन देण्यात आला. त्याला तपासात सहकार्य करण्याच्या अटीवर ही सवलत देण्यात आली आहे. यापूर्वीच या प्रकरणातील इतर सर्व आरोपींना देखील जामीन मिळाला होता. त्यामुळे आता या प्रकरणात सर्व ८ आरोपी जामिनावर बाहेर आहेत.

माहितीनुसार सोशल मीडियावर कथित अश्लील व्हिडिओ आणि त्यांच्याशी संबंधित लिंक व्हायरल झाल्यानंतर हे प्रकरण समोर आले होते. यामुळे मोठ्या प्रमाणात राजकीय आणि सामाजिक प्रतिक्रिया उमटल्या होत्या.



तक्रारीच्या आधारे पोलिसांनी सायबर सेलच्या मदतीने तपास करून भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायदा आयटी ॲक्टच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान पोलिसांनी अयान अहमदसह इतर आरोपींना अटक केली होती. अटकेच्या वेळी अयान अहमदला या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानण्यात आले होते. प्रकरणातील एका नंतर एक आरोपींना जामीन मिळाल्यानंतर न्यायालयाने शेवटी अयान अहमदला पण जामीन दिली.आरोपींच्या वतीने एड. वकार अहमद यांनी न्यायालयात बाजू मांडली. त्यांनी युक्तिवाद केला की, अभियोजन पक्ष आरोपींच्या विरोधात ठोस आणि प्रत्यक्ष पुरावा सादर करू शकलेला नाही. आरोपी तपासात पूर्ण सहकार्य करत आहेत आणि फरार होण्याची शक्यता नाही. तसेच फिर्यादी पक्ष कोणतेही मोठे षडयंत्र किंवा व्यापक शोषण झाल्याचे पुरावे सादर करू शकले नाही.न्यायालयाने सर्व युक्तिवाद आणि कागदपत्रे तपासल्यानंतर अयान अहमदला जामीन मंजूर केला.जामीन ☞(पान २ वर)

# काँक्रीट रस्त्याच्या देयकासाठी २ हजारांची लाच

## अंजनगाव सुर्जीत विस्तार अधिकारी एसीबीच्या जाळयात



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** काँक्रीट रस्त्याच्या बांधकामाचे देयक अदा करण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारताना अंजनगाव सुर्जी पंचायत समितीतील विस्तार अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाच्या जाळ्यात अडकला. रविंद्र बाजीराव दारसिंबे (वय ४८ वर्षे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) असे कारवाई झालेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या विकासाच्या योजनेंतर्गत (दलित वस्ती सुधार योजना) मंजूर असलेल्या काँक्रीट रस्ता बांधकामाचे देयक मिळण्यासाठी पंचायत समितीच्या ग्रामपंचायत विभागाकडे कागदपत्रे सादर केली होती. या देयकाच्या टिपणीवर सही करून पुढील कार्यवाही करण्यासाठी आरोपी विस्तार अधिकारी दारसिंबे याने तक्रारदाराकडे २ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. सापळा कारवाईदरम्यान तक्रारदाराकडून २ हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना रविंद्र बाजीराव दारसिंबे याला ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.आरोपीला ताब्यात घेऊन पुढील ☞(पान २ वर)

# आमझरी व खटकली परिसरात पर्यटन संकुल उभारा

## आयुक्त लीना बनसोड यांचे निर्देश, -ग्रामस्थ व होम-स्टे लाभार्थ्यांशी संवाद



**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा तालुक्यातील आमझरी व खटकली या गावात पर्यटन विकासासाठी मोठ्या संधी असून स्थानिक आदिवासी समाजाला नव्या रोजगाराच्या मार्ग उपलब्ध करून देण्याच्या हेतूने



येथे पर्यटन संकुल उभरण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश आदिवासी विकास आयुक्त व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी दिले. येथील वनविभागाच्या आमझरी संकुलात आयोजित संवाद बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.या बैठकीला प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, सह आयुक्त दिगंबर चव्हाण, उपायुक्त संतोष ठुबे, उपायुक्त विनिता सोनवणे, ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत खोटे प्रमाणपत्र देऊन कोट्यवधींची कामे लाटल्याचा आरोप

## कंत्राटदार गोपाल खारोळे यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषद प्रशासनाची दिशाभूल करून बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांची विकासकामे मिळवल्याचा गंभीर आरोप कंत्राटदार गोपाल खारोळे यांच्यावर करण्यात आला आहे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गजानन विजेकर यांनी



पत्रकार परिषद घेऊन केली आहे.

अंजनगाव नगरपरिषद अंतर्गत सन २०२४ मध्ये विविध विकासकामांसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. यातील सुमारे १३ कामे, ज्यांची एकूण किंमत सुमारे ४ कोटी रुपये आहे, ती गोपाल झी. खारोळे या कंत्राटदाराला देण्यात आली.नगरपरिषदेच्या निविदेच्या नियम व अटीनुसार, संबंधित कंत्राटदाराला सार्वजनिक बांधकाम विभागाचे (PWD) काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे ☞(पान २ वर)

> आरोप करणाऱ्यांना जे पत्र आले आहे त्याबाबत मला कोणतीही कल्पना नाही. तसेच मला याबाबत संबंधित विभागाचे कोणतेही पत्र अजून पर्यंत प्राप्त झाले नाही. सदर हे आरोप राजकीय सूडातून करण्यात आले आहे.
> **-गोपाल झी खारोळे** -शासकीय कंत्राटदार

# गोळीबार प्रकरणातील आरोपींना १४ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

## कटाचा सूत्रधार निलंबित तलाठी विपुल ठाकरे फरार



**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अर्जुननगर येथे स्वतःच्याच घरावर गोळीबार घडवून आणल्याच्या खळबळजनक प्रकरणात अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींना न्यायालयाने १४ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचा पोलिसांचा आरोप असलेला निलंबित तलाठी विपुल ठाकरे अद्याप फरार असून, त्याचा पोलिसांकडून कसून शोध सुरू आहे. ९ ऑगस्ट रोजी अर्जुननगर येथील विपुल ठाकरे यांच्या घरावर बुरखाधारी ☞(पान २ वर)

# सुदाम मुगल यांची सचिव पदी नियुक्ती



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी व विविध संघटनेशी संबंधित असलेले सुदान ओंकरराव मुगल यांची श्री जगदंब विणकर शिक्षण संस्थेच्या सचिपदी नुकतीच निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. अचलपूर येथील सुप्रसिद्ध श्री जगदंबा शिक्षण संस्था या प्रसिद्ध संस्थेच्या ☞(पान २ वर)

# रिद्धपूर घटनेच्या पार्श्वभूमीवर दर्यापुरात स्कूल बसवर कारवाई

## ७ ते ८ वाहन आगारात जमा, नियमबाह्य वाहतुकीला लगाम

**खल्लार/प्रातिनिधीः-** शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी स्कूल बस वाहनांविरोधात दर्यापूर शहरात आरटीओ विभागाने आज (दि. ११) धडक मोहीम राबविली. एकाच दिवसात ७ ते ८ स्कूल बसवर धडक कारवाई करून संबंधित वाहने दर्यापूर आगार बसस्थानकात जमा करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांना दंड



ठोठावण्यात आला असून या कारवाईत परिवहन विभागाकडून लाखो रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. रिद्धपूर येथे घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीचा प्रश्न गंभीरपणे घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहनांची ☞(पान २ वर)

# फरार तीन आरोपी जेरबंद

## -नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार असलेल्या तीन आरोपींना नागपुरी गेट पोलिसांनी शिताफीने शोधून अमरावती शहरातील यास्मीन नगर परिसरातून ताब्यात घेतले. आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या टीव्हीएस अ?क्सेस मोपेड आणि होंडा स्प्लेंडर अशा दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, त्यांची एकूण किंमत सुमारे १ लाख ४० हजार रुपये आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील तक्रारदार विक्की प्रदीप पटेल (वय २२, रा. पहिली गल्ली, सुकळी, ता. जि. अमरावती) यांनी ९ ऑगस्ट रोजी तक्रार दाखल केली होती. त्यावरून नागपुरी गेट पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ११८(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर ☞(पान २ वर)

# ७१ लाखांच्या 'म्यूल अकाउंट'चा पर्दाफाश

## सायबर पोलिसांच्या तपासातून आंतरराज्यीय रॅकेटचा छडा; सहा आरोपी अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वतःच्या बँक खात्याचा वापर इतर कोणाला करू देणे आणि त्याबदल्यात कमिशन घेणे काहींना सहज पैसे कमावण्याचा मार्ग वाटला; मात्र, याच खात्यांमधून सायबर फसवणुकीची रक्कम फिरू लागली आणि सहा जण थेट पोलिसांच्या रडारवर आले. अमरावती शहर सायबर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे दोन स्वतंत्र प्रकरणांतील सहा आरोपींना अटक करून तब्बल ७१ लाख रुपयांच्या सायबर आर्थिक व्यवहारांचा माग



काढला आहे.

सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीतून मिळणारी रक्कम स्वतःच्या खात्यात न ठेवता इतरांच्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची पद्धत अवलंबली होती. ही खाती पुढे अन्य खात्यांमध्ये रक्कम वळती करण्यासाठी वापरली जात होती. पोलिसांच्या तपासात काही खात्यांचा वापर ऑनलाइन गेमिंग आणि क्रिप्टोकरन्सी व्यवहारांसाठीही झाल्याचे समोर आले आहे.

तांत्रिक विश्लेषणाने उलगडली खात्यांची साखळी-

सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अप. क्र. २५/२०२६ ☞(पान २ वर)

# अखेर अंजनगाव नगर परिषद प्रशासन ॲक्शन मोडवर

## मोकाट जनावरे पकडून पाठवणार गौरक्षणमध्ये

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी शहरातील मुख्य रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक रस्त्यावर, रस्त्याच्या मधोमध जनावरे बसून राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून गंभीर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर अखेर नगर परिषद अंजनगाव सुर्जी प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे.नगर परिषद कार्यालयाकडून याबाबत जाहीर



सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.नगर परिषदेने प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेत म्हटले आहे की,आपण आपली गुरेढोरे पाळीव जनावरे ☞(पान २ वर)

# ८२ वर्षीय दाम्पत्याला 'डिजिटल अरेस्ट'चा बनाव

## -पैसे वळते करण्याआधी सायबर पोलिसांची धाव

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलीस अधिकारी असल्याचे सांगून 'डिजिटल अरेस्ट'चा बनाव रचत ८२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला सायबर ठगांनी अक्षरशः मानसिक कैदेत ठेवले. मात्र, रक्कम ट्रान्सफर करण्यापूर्वी कुटुंबीयांना संशय आल्याने त्यांनी सायबर पोलिसांना माहिती दिली आणि पोलिसांनी तातडीने केलेल्या 'रेस्क्यू ऑपरेशन'मुळे ज्येष्ठ दाम्पत्यावर ओढवलेले मोठे




आर्थिक संकट टळले.

शिवछाया कॉलनी, शंकरनगर येथील ८२ वर्षीय विजय डाखोडे यांना १० ऑगस्ट रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास अनोळखी क्रमांकावरून फोन आला. समोरच्या व्यक्तीने आपण पोलीस अधिकारी असल्याचे सांगत डाखोडे यांच्या नावाने नाशिक येथील कॅनरा बँकेत खाते उघडण्यात आल्याचा दावा केला. या खात्याचा वापर मनी लॉन्ड्रिंग, सायबर फसवणूक आणि देशविरोधी कृत्यांसाठी झाल्याचे सांगून डाखोडे यांना अटक करण्याची धमकी देण्यात आली. यानंतर सुरू झाला 'डिजिटल अरेस्ट'चा ☞(पान २ वर)

# इर्विनमधील प्रयोगशाळा वैज्ञानिक महिला अधिकाऱ्याचा विनयभंग

## प्रशासनाकडून डॉक्टर कार्यमुक्त, पोलिसांकडून शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा सामान्य रुग्णालयातील प्रयोगशाळेत कार्यरत महिला वैज्ञानिक अधिकाऱ्याचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून सिटी कोतवाली पोलिसांनी वरिष्ठ डॉक्टर डॉ. अमित क्षार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, रुग्णालय प्रशासनाने संबंधित डॉक्टरला कार्यमुक्त केले असून, प्रकरणाचा अहवाल वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांकडून आरोपी डॉक्टरचा शोध सुरू आहे. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, ☞(पान २ वर)

# बंद घराचे कुलूप तोडून १२ लाखांचा ऐवज लंपास

## ४९८ ग्रॅम सोन्यासह २ लाखांची रोकड चोरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत बंद घराला चोरट्यांनी लक्ष्य करून तब्बल ११ लाख ९६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी घराचे मुख्य कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि बेडरूममधील लोखंडी कपाट फोडून ४९८ ग्रॅम सोन्याचे दागिने व दोन लाख



रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. या घटनेमुळे मौलाना आझाद कॉलनी परिसरात चोरट्यांची दहशत निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मौलाना आझाद कॉलनी येथील मोहम्मद मुज्तबा अली ☞(पान २ वर)